रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ५ मे २०२४




# काँग्रेसची भूमिका ओबीसी आरक्षण विरोधी

आधुनिक केसरी

**काँग्रेसचे पंडित नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी राजीव गांधी हे तिन्हीही पंतप्रधान जातीय जनगणनेच्या विरोधात होते. काँग्रेसने सत्तेत असताना दहा वर्षे "ओबीसी' आरक्षणाचा अहवाल गुंडाळून ठेवला! पक्षाचे नेते राहुल गांधी हे जातीयजनगणना, ओबीसी. आरक्षण प्रश्नावर कळवळा दाखवत आहेत! त्यांची ही भूमिका मतांचे धृव्रीकरणासाठी आहे. काँग्रेस भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यास उतावीळ आहे. दुसरीकडे पंतप्रधान मोदी यांनी धर्माच्या आधारावर आरक्षण देणार नाही, असे ठाम भूमिका घेतली आहे.**

देशात १९८९ बोफार्स घोटाळा, पंजाबात दहशदवादी घटनेत वाढ झाली. काँग्रेस पक्षातही अंतर्गत वाद वाढत गेला.यामुळे पक्षाने विश्वार्हतता व लोकप्रियता गमावली. राजीव गांधींनी व्ही.पी. सिंग यांना मंत्रिमंडळातून बरखास्त केले. सिंगांनी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला व ते शांत बसले नाहीत! सिंगांनी राजीव गांधी नेतृत्वाला पराभव करण्याचा चंग बांधला. त्यांनी पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे मोठे नेते




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

अरुण नेहरू व आरिफ मोहम्मद खान यांचे मदतीने त्यांनी ११ जून १९८८ ला राष्ट्रीय मोर्चाची स्थापना केली.तसेच जनता पार्टी, लोकदल, काँग्रेस एस. आदी प्रादेशिक पक्षसह जनता दलाची स्थापना केली. राष्ट्रीय मोर्चा,भाजपा,माकप, भाकपची आघाडी झाली. १९८९ च्या नवव्या लोकसभा निवडणुकीत आघाडीचे काँग्रेसच्या विरोधात उमेदवार उभे केले.काँग्रस पक्षाला १९७ जागेवर विजय मिळाला पण बहुमत मिळविता आले नाही. या निवडणुकीपासून काँग्रेस दुबळा होत गेला पक्षाची मताची  टक्केवारी ३९.५३ घसरली व ती २०१९ मध्ये १९.५ टक्यापर्यंत पोंहचली भाजपाच्या जागांचा आलेख वाढत गेला, या निवडणुकीत  ८७ व आता तो ३०३ पर्यंत गेला आहे. जनता दलाला १४३ तर माकपला ३५ भाकपाला १३ जागा व तेलगू देशम १३ जागा जिंकल्या होत्या.हा आघाडीचा प्रयोग काँग्रेस मोदी सरकार विरोधात करू पहात! पण तेंव्हा भ्रष्टाचारामुळे काँग्रेसची प्रतिमा मलिन झाली होती,या उलट मोदींची प्रतिमा  देशात आणि आंतरराष्ट्रीय उंचावलेली आहे. हा फरक आहे. भाजपा व डाव्या पक्षांनी बाहेरून पाठिंबा दिल्यामुळे विश्वनाथ प्रतापसिंह हे दि.२ डिसेंबर १९८९ रोजी देशाचे दहावे पंतप्रधान, देवीलाल हे उपपंतप्रधान केले गेले. व्ही.पी. सिंग हे १२ महिने पंतप्रधान राहिले. त्यांनी इतर मागासवर्गीयांना (ओ.बी.सी.) आरक्षण देण्याचा क्रांतिकारीघेतला. तत्पूर्वी राष्ट्रपतींनी घटनेच्या कलम ३४० च्या पालन करत प्रथम मागासआयोगाची २९ जानेवारी १९५३ निर्माण केला होता. तो काका कालेलकर आयोग ३० मार्च १९५५ समजला जातो!या आयोगाने २३९९ मागास जाती शोधल्या! तसेच १९६१ मध्ये जातीय प्रगणना करावी, असे सूचित केले होते. तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी आयोगाचा अहवाल स्विकारण्यास व जातीयजनगणना करण्यास नकार दिला. देशातील ५२ लोकसंख्येत ओ.बी.सी.समाजाचा समावेश आहे. या वंचित समाजाला आरक्षण मिळावे,म्हणून माजी पंतप्रधान मोराराजी देसाई यांनी १९७९ मध्ये  बी.पी.मंडल आयोगाची स्थापना केली. या आयोगाचा अहवाल १९८० सादर केला गेला. तेव्हा केंद्र सरकारने ओ. बी, सी.समाजाला १२.५ नोकरीत संधी दिली होती. आयोगाने ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली. तत्कालिन पंतप्रधान व्हि.पी सिंग यांनी१३ ऑगस्ट १९७९ रोजी  आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा आदेश काढला.बी.पी मंडल हे ओबीसींचे खरे मसिहा आहेत. त्यांनी अतिशय मेहनत करून आयोगाचा अहवाल तयार केला. या आयोगाचा अहवाल लागू होण्यापूर्वी त्यांचे १९८२ मध्ये निधन झाले. ओबीसी आरक्षणाला तीव्र दिल्ली तरुणांनी विरोध केला! तेंव्हा राजीव गोस्वामी या विद्यार्थ्यांने आत्मदहन केले! त्यानंतर आत्महत्या करण्याची मालिका सुरु झाली. यावेळी शंभर विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.त्यात ६० जण मृत पावले. यानिर्णयामुळे सामाजिक तणाव निर्माण झाला पण सिंगांनी माघार घेतली नाही काँग्रस नेते स्व.राजीव गांधी यांनी संसदेत मंडल आयोगास विरोध दर्शविता तेंव्हा ते म्हणाले, आम्ही जातीयमुक्त समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करत असताना या निर्णयामुळे समाजात तेढ निर्माण होईल देशाचे, समाजाचे मोठे नुकसान होईल. सरकारने असे निर्णय टाळले पाहिजे' तेंव्हा काँग्रेसची ओबीसी विरुध्द होती. १९८० ला श्रीमती गांधीं यांना तर 'ना जातपर, ना पातपर मोहर लगाओ हातपर' असा नारा दिलेला होता. तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरु, श्रीमती गांधी, राजीव गांधी हे जातीयगणनेच्या विरोधात होते. मग काँग्रेसचे जातीयजनगणनेची मागणी करण्यामागे कारण काय? श्रीमती गांधी व राजीव गांधी पंतप्रधान असताना त्यांनी दहा वर्षे मंडल आयोगाचा अहवाल धूळखात ठेवला,ही वस्तुस्थिती आहे.मग नकली गांधी घराण्याचे शेंडेफळ राहुल गांधींना याचे ज्ञान नाही काय? काँग्रेसची ही मागणी वरकरणी असून हिंदु मतांची विभागणी व्हावी,याच उद्देशाने केली जात आहे. मोदी सरकार आणि आर.एस.एस  हे आरक्षण समाप्त करतील, अशी भीती दाखविली जात आहे.पण मोदीचा काय? कोणीही आरक्षण समाप्त करू शकणार नाही.आर. एस. एस. प्रमुख मोहन भागवत यांनी संघाचा आरक्षणाला विरोध नाहीये.असे स्पष्ट करत म्हणले 'आरक्षण दिले असल्याने हे सामाजिक न्याय मिळेपर्यंत आरक्षण चालू राहील' तरीही नकली गांधी मात्र मोदी व आर.एस.एस आरक्षण विरोधी असल्याचे तुणतुणे वाजवितच आहेत,हे गांधी बहुसंख्य मुस्लिम व दहशदवादी पी.एफ. आय,सारख्या राष्ट्र विरोधी संघटनेचा पाठिंबा घेवून वायनाड मतदार संघातून लोकसभा निवडणूक लढवित आहेत. ते मुस्लिम वोट बँक मजबूत व्हावी,त्यासाठी रोज आर.एस.एस च्या विरोधात गरळ ओकत असतात! परंतु ते मुस्लिम लिग, पी.एफ.आय. या इतर मुस्लिम राष्ट्रीय विरोधी संघटनेच्या ब्र" शब्द काढत नाहीत!कारण त्यांची मजबूरी आहे!यात पक्ष तीन तलाक , कलम ३७०, सी.ए.ए. च्या विरोधी भूमिका घेत आहे. अल्पसंख्याकांसाठी छप्परफाड आश्वासनाची खैरात दिली जात आहेतधर्माच्या आधारावर आरक्षण देणे घटनाबाह्य आहे. यात वोट जिहाद ची नारा दिलाजात आहे. देशाचे मुस्लिम लिगच्या याच मानसिकतेमुळे विभाजन झाले! नकली गांधी परिवाराला भारतीय मुस्लिम बांधवाची शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी, तसेच धर्मातील कुप्रथा बंद व्हाव्यात,या समाज सुधारवादी व्हावा,असे का वाटत नाही? तो कट्टरवादी विचासरणीचा राहिला तरच काँग्रेसचा राजकीय फायदा आहे. भाजपाने १९७९ मध्ये अयोध्या राममंदिर उभारण्याचा विषय राजकीय अजेंड्यावर घेतला. तेव्हा काँग्रेसने तांडव माजविले होते. भाजपाचे नेते लालकृष्ण अडवाणी यांचे नेतृत्वाखाली सोमनाथ ते अयोध्या रथयात्रा दि २३ सप्टें. १९९० मध्ये काढली गेली एका बसचा रथ नेते प्रमोद महाजन यांच्या सूचनेनुसार प्रकाश नलावडे यांनी सुंदर असा रथ बनविला होता. या राम रथाचा चालक सलिम मक्कानी होता. त्यांना अडवाणी सोबत अटक झाली होती. सलिम यांचे २०२० मध्ये निधन झाले.या रथयात्रेत गुजरात ते दिल्ली भाजपा पक्षाचे मिडीयाचे काम पाहणारे नरेंद्र मोदींचा यांचा सहभाग होता.

भाजपाच्या या यात्रेला स्वत: व्ही.पी सिंगाचा विरोध होता. त्यांनी बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांना अडवाणी यांची रथयात्रा रोखण्यास सांगितले. तेव्हा लालूंनी पोलिस उपायुक्त अफजल अमानुल्लाह यांना तसे आदेश दिले. त्यांनी आदेशाचे पालन करण्यास नकार दिला. ते सय्यद शहाबुद्दीन यांचे जावाई आहेत.        लालू यादव यांचेत अडवाणींची रथ यात्रा








रोखण्याचे धाडस केले नाही.  त्यांची अटकेसाठी कपट कारस्थान रचले! अडवाणी हे समस्तीपूर विश्रामगृहावर थांबले होते.त्या दिवशी २३ ऑक्टों.१९९० रोजी रात्री २ वाजता पत्रकाराच्या नावाने फोन करुन अडवाणी असल्याची खात्री केली गेली.त्यानंतर रात्रीच अडवाणी यांना अटक केल्याचे सांगितले गेले. अडवाणी यांना अटकेची  जबाबदारी पोलिस अधिकारी आर. के.सिंग यांनी काम केले होते.निवृत्तीनंतर ते भाजपाचे गेले व नेते झाले. अटकेनंतर अडवाणींनी भाजपाचा सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला.सिंग सरकारचा विश्वास ठरावात पराभव झाला व ते सरकार कोसळले! नंतर जनता दलात फूट पडली. चंद्रशेखर यांनी ६४ संसदेच्या मदतीने समाजवादी जनता पार्टी निर्माण केली.काँग्रेसने बाहेरून समर्थन देण्याचे वचन दिले होते. चंद्रशेखर हे पंतप्रधान झाले.काँग्रेसने राजीव गांधींची जासूसी केली जात करत असल्याचा आरोप करत चंद्रशेखर सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे चंद्रशेखर यांना राजीनामा द्यावा लागला. चंद्रशेखर हे २२३ दिवस पंतप्रधानपदावर राहिले. काँग्रेसने माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंगांना असेच अपमानीत करुन पायउतार होण्यास भाग पाडले. काँग्रसने बळी गेले चंद्रशेखर दुसरे माजी पंतप्रधान आहेत.

मोदी सरकारने २०१८ मध्ये १०२ घटनादुरुस्ती करुन राष्ट्रीय मागास- वर्गीय आयोगाला घटनात्मक दर्जा दिला. तसेच १०५ व्या घटना दुरुस्ती राज्य आयोगाला मागास जाती शोधण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच ओबीसीला समाजातील सर्वांना समान आरक्षणाचा लाभ मिळावा,त्याचे  निकष ठरविण्यासाठी न्यायमूर्ती रोहिणी आयोग २ ऑक्टो. २०१७ मध्ये स्थापन केला. या आयोगाने २०२३ मध्ये राष्ट्रपती अहवाल सादर केला. मोदी सरकार काय निर्णय घेते, हे पहावे लागेल !पण काँग्रेस पक्ष सत्तेवर असताना ओबीसी समाजाचा हिताचा मंडल आयोग व शेतकरी हिताचा स्वामीनाथन आयोग गुंडाळून ठेवलेला,ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्रात काँग्रस व राष्ट्रवादी पक्ष  ५५ वर्ष  सत्तेत मराठा समाजाला आरक्षण देऊ शकलेला नाही. या पक्षाच्या नेत्यांना जाब विचारला जात नाही,याचे आश्चर्य वाटते! शिंदे -फडणवीस सरकारने मराठा समाजाला आरक्षणाबाबत निर्णय घेतला, ते आरक्षणाबाबत सकात्मक असतानाही त्यांचा बदला घेण्याची भूमिका घेतली गेली. हे कितपत योग्य आहे.केवळ मराठा समाजाच्या मताची विभागणी व्हावी, याच उद्देशाने ही राजकीय खेळी गेली.यामागे शरद पवार व काँग्रेस नेते आहेत! हे नंतर उजेडात येईलच! मराठा संघटनेची राजकीय पक्षावरच नाराजी असती तर समाजाचे स्वतंत्र उमेदवार निवडणुकीत उभे करून स्वत: ची ताकद दाखविली असती.मोदींनी "भकटता आत्माचा'किस्सा सांगितला! त्यांनी कोणाचे नाव घेतले नाही,मोदी हे आपल्यावरच बोलले, हे पवारांना कसे ओळखले! चोराच्या मनात चांदणे! असे असावे.पवार म्हणाले,माझा आत्मा शेतकऱ्यासाठी अवस्थ आहे! लबाड नेता ! मग पवार हे देशाचे कृषी मंत्री असताना देशात २००४ शेतकऱ्यांनी सर्वाधिक आत्महत्या का केल्या? स्वामीनाथन आयोग गुंडाळून का ठेवला ? शेतकऱ्यांच्या कर्जमाफीत करोडो रूपये कोणी लाटले? राज्यातील सहकार क्षेत्र कोणी लुटून खाल्ले ? सहकारी बँका कोणी बुडविल्या? राज्यात खंडणी वसूल, हत्या करणारे नेते व समर्थक कोण होते? भूखंडाचे श्रीखंड कोणी केले? पुरोगामी महाराष्ट्रात बिनचिपळ्याच्या या नारदाने पक्ष फोडणे व घरे फोडणे व जाती- जातीत भांडणे लावण्याचे कार्य  केले! आज त्याच बारामतीत मतदार संघात पवारांच्या घरात वाद पेटला आहे. 'यालाच म्हणतात! जैसी करणी, वैसी भरणी' ते येथेच फेडावे लागते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी हा महाराष्ट्र मराठ्यांचा नाही तर मराठी भाषिकांचा राहिल, असे वचन दिले आणि तसे वागले.त्याच महाराष्ट्रात आज जातियतेचे गिधाडे घिरट्या घालत आहेत, हे दुर्देव आहे. १९९१ च्या लोकसभा निवडणुकी- नंतर गांधी परिवाराशिवाय काँग्रेस पक्षाचा नेता देशाचा पंतप्रधान झाला, त्यांची माहिती पुढील भागात.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी


काही पालकांना वाटते की तेथील अन्न आरोग्यासाठी चांगले असेल का ? तिथे स्वयंपाक करणारी लोकं तेल कुठलं वापरत असतील, भांडी अल्युमिनियमची वापरत असतील का , ते सॅनिटायझर तरी वापरत असतील का ? मुलं नेमकी कुठं आहेत त्यांचं तासातासानं लोकेशन कळेल का ? तिथे कमोडची सोय असेल का ? वगैरे वगैरे . एवढ्या अपेक्षा जर पालक करत असतील तर त्यांनी असल्या शिबिराला मुलांना पाठवायचेच कशाला ? वरील गोष्टीतील आपल्या मुलाला सुखाने आपल्या घरी लाडाने वाढवणाऱ्या जमीनदारासारखे आपल्या घरीच ठेवून सर्व सुखसुविधा उपलब्ध करून द्याव्या. या लेखाच्या सुरुवातीला उल्लेख केलेल्या मूळ मुद्द्याकडे मी पुन्हा येतो. आपण जेवढे स्वतःला बंदिस्त करून घेऊ, जेवढे निसर्गापासून दूर जाऊ, तेवढी स्वतःची हानी आपण करून घेऊ. आपल्या नैसर्गिक क्षमता, जाणिवा हरवून बसू. प्रगती आणि विकास होताना जर आपल्या नैसर्गिक क्षमता, संवेदना यांच्यापासून दूर जाणार असू, निसर्गापासून फारकत घेऊन कृत्रिम जीवनातच धन्यता मानायला शिकणार असू तर खरोखरच आपण विकासाच्या मार्गावर जात आहोत का याचा विचार नक्की व्हायला हवा.




## हितगुज

पुष्प ५५वे





**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## दैत्यांचा विनाश करणारे मार्तंड भैरव

"ध्यायेन्मल्लारिदेवं कनकगिरिनिभं म्हाळसा-भूषिताङ्कम्। श्वेताश्वं खड्गहस्तं विबुधबुधगणैः सेव्यमानं कृतार्थै। युक्तांघ्रिं दैत्यमूर्ध्नि डमरुविलसितं नैशचूर्णाभिरामम्। नित्यं भक्तेषु तुष्टं स्वगणपरिवृतं नित्येमोंकाररूपम्॥ हा श्लोक कुलदैवत श्री खंडोबाचे ध्यान करण्यासाठी नित्योपासनेत समाविष्ट आहे. या श्लोकातून गद्यार्थ रूपात श्री खंडोबा-म्हाळसा यांचे दिव्य रूप मनःश्चक्षूंसमोर अशाप्रकारे अवतीर्ण होते - "सुवर्ण पर्वतासारखी कांती असलेल्या श्री खंडोबापुढे श्री म्हाळसा देवी विराजमान आहे." पांढर्या शुभ्र घोड्यावर आरूढ असलेल्या खंडोबाच्या हातात तलवार आहे. देव व ज्ञानी खंडोबाची उपासना करतात. श्री खंडोबाचा एक पाय दैत्याच्या मस्तकी आहे. खंडोबाच्या हाती डमरू असून, हळदीने माखलेला खंडेराया सुशोभित दिसतो आहे. सदैव भक्तांवर संतुष्ट असणारा, कुत्र्यांनी वेढलेला, ओंकारास गम्य अशा श्री मल्लारीदेवाचे मी ध्यान करतो." महाराष्ट्र व कर्नाटकात बहुतांशी जनांचे कुलदैवत श्री खंडोबा आहे. हे जागृत दैवत आहे. प्राचीन काळापासून परंपरेने प्रत्येक कुळात, कुटुंबात या देवतेची आराधना केली जाते आहे. कुलदैवत खंडोबाची महाराष्ट्र व कर्नाटकातील एकूण 12 स्थाने मूळस्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. जेजुरी, निमगाव, पालीपेंबर, नळदुर्ग, शेगुड, सातारे, माळेगाव, मैलारपूर पेंबर, मंगसुळी, मैलारलिंग, देवरगुड्ड, मठमैलार या ठिकाणचे कुलदैवत परंपरेने लाभले आहे. भारतीय समाजाची जीवन-संरचना धर्ममय असल्यामुळे भारतीय मानसिकता जगण्यात उदात्त हेतू व भाव अनुभवणारी बनली आहे. ही उदात्तता प्रगाढ विश्वास व आस्था यातून आकारास आली आहे. त्यानुसार सामुदायिक सहजीवनाचे पोषण करणारी मनोभूमिका विकसित झाली आहे. भारतीय संकल्पनेनुसार अस्तित्वाचा आस व्यक्ती नसून कुटुंब-जीवन आहे व परीघ विश्वात्मक आहे. म्हणून कुळाचे रक्षण करणार्या देवतांची उपासना व्यक्तीला स्व-स्वार्थाकडून सर्वात्मक समन्वयाकडे अग्रेसर करणारी आहे. यासाठी आजही कुलाचार, सणवार प्रासंगिक व उपयुक्त आहेत. कृतयुगात धर्मपुत्र सप्तऋषी मणिचूल पर्वतावर तप करीत असताना मणी व मल्ल दैत्यांनी त्या पर्वतावर हल्ला करून सप्त-ऋषींचे तपोवन उद्‌ध्वस्त केले, तेव्हा शोकाकुल ऋषी दाद मागण्यासाठी इंद्राकडे गेले. ब्रह्मदेवाच्या वराने अजिंक्य झालेल्या दैत्यांचा पाडाव करण्यास असमर्थ इंद्राने समस्येच्या निराकरणासाठी ऋषींना विष्णुकडे पाठवले. श्री विष्णुने त्यांना शिवाकडे नेले. दैत्यांच्या अत्याचाराच्या कथा ऐकून भगवान शिव संतप्त झाले. दैत्यांच्या विनाशासाठी त्यांनी मार्तंड भैरवाचे रूप धारण केले.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## श्री साईबाबा

आधुनिक केसरी



श्री साईबाबांच्या काळात तत्कालीन ब्रिटीश सरकारने सर्वप्रथम आपल्या अहमदनगर कलेक्टरेट सर्व्हेमध्ये तसेच विकली रिपोर्टस ऑफ क्रिमिनल इंटेलिजन्स ऑन पॉलिटीकल सिचूएशन या महत्वपूर्ण दस्तऐवजांमध्ये श्री साईबाबांची नोंद केलेली आहे. श्री साईबाबांना तत्कालीन लोक आपापल्यापरीने साधू, अवतार, फकीर तसेच अवलिया मानत असे महत्वपूर्ण निरीक्षण या दस्तऐवजात पाहण्यास मिळते. क्रांतिकारक श्री गणेश श्रीकृष्ण खापर्डे, सन्मानीय हरी सीताराम दीक्षित, पूर्वी खान्देशात असलेले भाटे नावाचे एक मामलतदार, चांदोरकर ई. अशा उच्चशिक्षित साईबाबांच्या भक्तांची नोंद या दस्तऐवजांमध्ये केलेली आढळून येते. तसेच बाबांनी कोणत्याही उपासनापद्धतीचा अवलंब केला नसल्याचेही यात नमूद केले आहे. हे तीन रिपोर्ट जानेवारी सन १९११, जुलै सन १९१२ तसेच ऑगस्ट सन १९१२ मध्ये लिहले गेले होते. याहून आधी अहमदनगर कलेक्टरेटच्या कोपरगाव सेकंड सेटलमेंट सर्व्हे मध्ये श्री साई अवलिया फकिरांच्या सन्मानार्थ सुरू झालेल्या उरुसाची पार्श्वभूमी आणि त्याचे महत्व अधोरेखित होते. हा सर्व्हे सन १९०७ साली पूर्ण झाला होता. तसेच बाबांच्या महासमाधीनंतर २४/१०/१९१८ रोजी कलेक्टर सी.ए.बेट्स यांनी हरी सीताराम दीक्षित यांच्या पत्रावर उत्तर देताना दिलेल्या ऑर्डरमध्ये श्री साईबाबांचा मोहम्मदन ऑफ अननॉन ओरिजिन असा उल्लेख करून बाबांचे मूळ अज्ञात असल्याचे स्पष्ट केले आहे.



आधुनिक केसरी

## श्वसाचा मालक | विश्वंभर ||

**कर्म ज्ञान भक्तीची | करू नको थट्टा ||**
**लावु नको बट्टा | कुळाला तू ||१||**
**ज्ञाना-तुका सांगे | त्रिसूत्री मुक्तीची ||**
**जाण जगण्याची | हीच रीत ||२||**
**मृगजळ नदीचा | सापडे का घाट ? ||**
**उगा फरपट | नको वेड्या ||३||**
**आभासी जगणे | सत्ता प्राप्ती होता ||**
**दुःख भाळी येता | कोण तुझे ? ||४||**
**करावा विचार | सारासार एक ||**
**श्वासाचा मालक | विश्वंभर ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## विकल्प निरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

अतिशय विचार करायला लावणारा व वाचत जावे तसं गुढ वाढत जाणारा विषय म्हणजे आज आपण अभ्यासत असलेला समास "विकल्प निरसन" समास होय. मनुष्य जन्माला आले आहे तर त्यांच्या विषयी कुतूहल, आश्चर्य, जिज्ञासा, वाढत जाणारा गुंता या सर्वांचा उहापोह या समासात आपण अभ्यासणार आहोत. जन्माला आलेला देह हा अंतःकरणं असलेला देह आहे. माया ममता, रागलोभ, इर्षाद्वेश, भावभावनांचा कल्लोळ मनामध्ये निर्माण होणे ही सर्व देह व अंतःकरणं असलेल्या मनुष्य देहाची लक्षणे आहेत.

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

**कवन आनन्द अपूर्ब है, भोगे जगत उदास ।**
**सम्मराट पद तुच्छ है, आश न भोग विलाश ।।१४।।(स्ववेंद चतुर्थ मण्डल पंचम अध्याय) ०४/०५/१४**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**असा कुठला अपूर्व आनंद आहे, ज्याचा उपभोग संसारातून विरक्त झाल्यावर होतो. ज्यामध्ये भोग विलासाची कुठल्याही प्रकारची आशा किंवा कामना राहात नाही. तोच त्यागी पुरूष त्या परमानंद महान सुखाला प्राप्त करतो. या आनंदाच्या उपभोगापुढे सम्राटाचं पदही हीन अर्थात छोटं आहे.**



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


..........

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# मध्यम स्थितीतली माणसे संगतीला चांगली

आधुनिक केसरी

एका गावात चोरांची एक सभा भरली. तीत काही चोर म्हणाले की, लूट करायची ती हानी करून करावी; तर काहींचे असे म्हणणे पडले की, कुणाला उगीच मारायला नको, नुसतीच लूट करावी; पण लूट करावी असे सर्वांचेच ध्येय होते ! तसे आपले होते. एक म्हणतो, व्यवहारदृष्ट्या प्रपंच करावा; दुसरा म्हणतो, तसे नव्हे, योग्य-अयोग्य पाहून प्रपंच करावा; तर तिसरा म्हणतो, स्वतःचा स्वार्थ साधून प्रपंच करावा; परंतु देवाचे अधिष्ठान ठेवून प्रपंच करावा असे कुणीच म्हणत नाही ! सगळ्यांना प्रपंच 'हवा' आणि देव असला तरी चालेल. म्हणजे प्रपंच तेवढा खरा असे ते मानून चालतात, देवाविषयी मात्र त्यांच्या मनात संशय असतो. वृत्ती कितीही अस्थिर असलेली त्यांना चालते. दारू पिऊन बेहोश झालेला माणूस मनाला येईल ते गाणे गातो. असा एक दारुडा गाणे गात असताना दुसरा दारुडा त्याला म्हणू लागला की, 'अरे, हे असले गाणे काय म्हणतोस ? तुला काही कळत नाही.' नंतर काही वेळाने तोच प्रश्न पहिल्या दारुड्याने दुसऱ्या दारुड्याला



विचारला ! त्याप्रमाणे, प्रपंचामध्ये ज्यांची वृत्ती स्थिर नाही अशा लोकांनी वाटेल ती मते प्रतिपादन करावीत असे घडते आणि मग ते एकमेकांना नावे ठेवतात. आपला प्रपंचातला व्यवहार हा असा असतो. 'आम्हाला बंधने नकोत' असे म्हणणारे लोक वेडेच समजले पाहिजेत. समाज हा बंधनांशिवाय राहूच शकत नाही. खरोखर, नोकरीमध्ये फार त्रास नसेल तर ती मालकाइतकीच सुखाची असते; उलट कित्येक वेळा मालकीमध्येच फार त्रास असतो. व्यवहारामध्ये आपण दुसऱ्याची लबाडी ओळखून वागावे एवढीच लबाडी आपल्यामध्ये असावी. पण स्वतः लबाडी करू नये; म्हणजेच, आपले डावपेच किंवा लबाडी लोकांना फसविण्यासाठी नसावी. लोकांकडून न फसण्याइतकेच आपण व्यवहारी असावे. व्यवहाराच्या दृष्टीने बघितले तर मला मध्यम स्थितीतली माणसेच जास्त भेटली. ती व्यवहाराला आणि संगतीला फार चांगली असतात, कारण ती सर्व बाजूंनी मध्यम असतात; त्यांचे पाप मध्यम, पुण्य मध्यम आणि परमार्थदेखील मध्यमच असतो. असा मनुष्य वेळप्रसंगी कर्जबाजारी झाला तरी चालतो पण कर्ज किती असावे, तर या महिन्यात देऊन टाकता येईल इतकेच.

**६९. नीतिधर्माचे आचरण ठेवता यावे, मुलाबाळांचे रक्षण करता यावे, अब्रुने जगता यावे, इतका पैसा जवळ असला की तो मनुष्य श्रीमंत समजावा.**

## निरूपण

आधुनिक केसरी

**तेणें गुणें भंगे मन । या नांव आदिभूतिक ॥ ६१ ॥**
**प्राणी बंदी सांपडला । यातने वरपडा जाला ।**
**नाना दुःखें दुःखवला । या नांव आदिभूतिक ॥ ६२ ॥**
**प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत ।**
**दरेमार तळवेमार होत । या नांव आदिभूतिक ॥ ६३ ॥**
**कोरडे पारंब्या फोक । बहुप्रकारें अनेक ।**
**बहुताडिती आदिभूतिक । या नांव बोलिजे ॥ ६४ ॥**
**मोघरीमार बुधलेमार । चौखुरून डंगारणेमार ।**
**बुक्या गचांड्या गुढघेमार । या नांव आदिभूतिक ॥ ६५ ॥**
**लाता तपराखा सेणमार । कानखडे दगडमार ।**
**नाना प्रकारींचे मार । या नांव आदिभूतिक ॥ ६६ ॥**
**टांगणें टिपर्या पिछोडे । बेडी बुधनाल कोलदंडे ।**
**रक्षणनिग्रह चहूंकडे । या नांव आदिभूतिक ॥ ६७ ॥**
**नाकवणी चुनवणी । मीठवणी रायवणी ।**
**गुळवण्याची जाचणी । या नांव आदिभूतिक ॥ ६८ ॥**
**जळामध्यें बुचकळिती । हस्तीपुढें बांधोन टाकिती ।**

रविवार, ५ मे २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २४७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 5 MAY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-247 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# सर्व भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होणार

## पंतप्रधान मोदी : झारखंडमधील सभेत ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**पलामू : जिथे सरकारे भ्रष्ट असतात तिथे निधीची कितीही तरतूद केली तरी विकास शक्य नाही, म्हणूनच आम्ही भ्रष्टाचार हटविण्याचा संकल्प करतो, तेव्हा इंडी आघाडीचे लोक भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी मोर्चे काढतात. येत्या पाच वर्षात अशा सर्व भ्रष्ट लोकांवर वेगाने कडक कारवाई केली जाईल आणि भ्रष्टाचार खणून काढला जाईल अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी झारखंडमधील पलामू आणि लोहरदगा येथे आयोजित केलेल्या विशाल जाहीर विजय संकल्प सभांमध्ये बोलताना दिली.**



झारखंड भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी, झारखंडचे विरोधी पक्षनेते व ज्येष्ठ नेते अमर कुमार बाउरी, विद्यमान खासदार व पलामूचे उमेदवार विष्णू दयाल राम, राज्यसभा खासदार सुदर्शन भगत, लोहरदगा उमेदवार व भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. समीर उरांव, आजसू पक्षाचे अध्यक्ष सुदेश महतो आणि इतर नेते यावेळी मंचावर उपस्थित होते. आपल्या तडाखेबंद भाषणात पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा काँग्रेस आणि इंडी आघाडीवर जोरदार शरसंधान केले. इंडी आघाडीचे नेते जनहित आणि विकासाच्या मागणीसाठी नव्हे तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी रॅली काढतात, असे सांगून ते म्हणाले की, काँग्रेसने गेल्या 60 वर्षांत केवळ घराणेशाही, भ्रष्टाचार आणि तुष्टीकरण केले आहे. काँग्रेसच्या डावपेचांनी देशाला नक्षलवाद आणि माओवादाच्या रक्तरंजित हिंसेचा तडाखा दिला, पण आम्ही सत्तेवर आल्यानंतर देशाचा मोठा भाग माओवाद्यांच्या हिंसेतून मुक्त केला. आपली मते वाचवण्यासाठी काँग्रेस दहशतवाद्यांवर कारवाईही करत नाही, असा आरोपही श्री. मोदी यांनी केला. घुसखोरांना प्रोत्साहन देण्याचा आणि आदिवासींच्या जमिनी बळकावण्याचा घातक खेळ झारखंडमध्ये सुरू आहे. पीएफआयसारख्या बंदी घातलेल्या संघटना संथालमध्ये त्यांचे रॅकेट चालवत आहेत आणि आदिवासी महिलांवर अत्याचार करत आहेत. जेव्हा लोक या विरोधात आवाज उठवतात, तेव्हा इंडी आघाडी व्होट जिहादचे आवाहन करू लागते. काँग्रेसने कितीही जिहाद केले तरी हा देश मागे हटणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. झामुमो-काँग्रेसच्या नेत्यांनी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अमाप संपत्ती गोळा केली आहे. मालमत्ता असो, राजकारण असो, ते आपल्या मुलांसाठी सर्व काही कमवत असतात. त्यांचा वारसा म्हणून ते बराच काळा पैसा मागे ठेऊन जातील, असा गंभीर आरोप याप्रसंगी बोलताना पंतप्रधानांनी केला.

# पँथर नेते माजी मंत्री गंगाधर गाडे काळाच्या पडद्याआड

## आज अंत्यसंस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकर चळवळीतील अग्रणी नेते, पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी राज्यमंत्री गंगाधर सुखदेव गाडे (७६) यांचे आज सकाळी ४.३० वाजता निधन झाले. त्यांचे पार्थिव रविवार दिनांक ५ मे रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत उस्मानपुरा पीर बाजार येथील त्यांच्या नागसेन विद्यालयाच्या प्रांगणात अंत्यददर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर शिक्षण संस्थेच्या परिसरातच दुपारी ४ वाजता अंत्यविधी केला जाणार आहे. गाडे यांच्या मृत्यूचे वृत्त समजताच शहरातील अनेक नेते, कार्यकर्ते यांची त्यांच्या निवासस्थानकडे धाव घेतली होती. माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांनीही त्यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात पत्नी सौ सूर्यकांता गाडे, मुलगा डॉ. सिद्धांत गाडे, सून डॉ. भावना वंजारी गाडे, बहिण निर्मला गवई, मेहुणे गुणवंत गवई, नातवंडे असा परिवार आहे. गंगाधर गाडे यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९४७ रोजी कवठाळ तालुका मोर्शी जिल्हा अमरावती येथे झाला होता. दहावीनंतर ते १९६५ ला मिलिंद महाविद्यालयात आले होते. विद्यार्थी दशेपासूनच त्यांना नेतृत्वाची आवड होती. विद्यार्थी चळवळीतील आंदोलनानंतर १९७२-७३ मध्ये त्यांनी दलित पँथर मध्ये राजा ढाले यांचे नेतृत्वाखाली काम करण्यास सुरुवात केली. शहरातील बहुतेक मागासवर्गीय वसाहती त्यांनी वसविल्या होत्या. आंबेडकरी चळवळीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून विद्यापीठ नामांतर चळवळीत त्यांचा मोठा सहभाग होता. आणीबाणीच्या काळात त्यांना आठ महिने तुरुंगवासही भोगावा लागला होता. छत्रपती संभाजीनगर महापालिकेमध्ये नगरसेवक आणि स्थायी समितीचे सभापती म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. राजा ढाले यांनी दलित पँथर बरखास्त केल्यानंतर १९९१ मध्ये त्यांनी भारतीय दलित पँथरच्या स्थापनेत पुढाकार घेतला. १९९९ मध्ये त्यांना परिवहन राज्यमंत्री पदाची जबाबदारी मिळाली होती त्या काळात त्यांनी एसटी साठी उल्लेखनीय कार्य केले. सध्या ते पँथरस रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण संस्थेची स्थापना करून शैक्षणिक कार्य केले आहे. सध्या त्यांच्या पत्नी सूर्यकांता गाडे मुलगा सिद्धांत गाडे आणि सून भावना गाडे या शिक्षण संस्थेची धुरा सांभाळत आहेत.

# धनुभाऊ, पवार साहेबांचा नाद करू नका : ॲड. उषाताई दराडे

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** मोदी, शहा आणि दादांना खुश करण्यासाठी बारामतीत जावून पवार साहेबांवर बेछुट आरोप करणं धनुभाऊ आपल्याला शोभलं नाही. कदाचित आपली ती लायकीच नाही. भविष्यात अशी चुक करू नका, अन्यथा आपली लायकी निष्ठावंत राष्ट्रवादीसह सामान्य जनता चव्हाट्यावर आणल्याशिवाय शांत बसणार नाही असा थेट इशारा राष्ट्रवादीचे माजी आमदार ॲड.उषाताई दराडे यांनी दिला आहे. धनंजय मुंडे जेव्हा भाजपामध्ये आणि मुंडे फॅमिलीमध्ये राजकीयदृष्ट्या अडचणीत होते, त्यांना दुसरा कोणताही पक्ष विचारात घेत नव्हता त्यावेळी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेबांनीच राजकीय राजाश्रय दिला. धनुभाऊ तुमचा वाढदिवस साहेबांनी स्वतःच्या घरात प्रतिभा वहिनींच्या साक्षीने तुमचा केक कापून साजरा केला. तुम्हाला एवढं प्रेम दिलं, ओबीसीतील एक तरूण नेतृत्व पुढे येत आहे म्हणून तुमची लायकी नसतानासुध्दा तुम्हाला विधानसभेत पराभूत झाल्यानंतरही आमदार केलं. विरोधीपक्ष नेता केलं. मंत्री केलं. पालकमंत्री केले. तुम्हाला अजुन काय द्यायचं होते? एवढे असतानासुध्दा तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडण्यामध्ये काय भूमिका बजावली? पवार साहेबांना किती त्रास दिला? हे सर्वश्रुत झालेले आहे. एवढे खालच्या पातळीवर जावून राजकारण करूनसुध्दा लोकसभा निवडणूकीत बारामतीसह राज्यभरात तुमच्या फुटीर उमेदवारांना मतदारांनी नाकारल्यामुळे तुमची आता पायाखालची वाळू सरकत आहे. त्यामुळेच बारामतीत जावून आपण बेताल वक्तव्य केले, साहेबांविषयी यापुढे आपण टिका करताना तोंड सांभाळावे. अन्यथा जशास तसे उत्तर दिले जाईल असा थेट इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या माजी आमदार ॲड.उषाताई दराडे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिला आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक पुरातत्त्वीय स्थळे होत आहेत नष्ट

## चंद्रपूर जिल्ह्यातील एकमेव डायनोसोर जीवाश्म स्थळ झाले नष्ट

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. श्याम हेडाऊ

चंद्रपूर : जगात सर्वत्र पुरातत्वीय आणि वारसा स्थळे जपली जात असून पर्यटन आणि अभ्यासासाठी ती संरक्षित केली जाते परंतु भारतात मात्र राजकीय, प्रशासकीय आणि जनतेच्या उदासंतेमुळे राज्यातील अनेक स्थळे नष्ट होत आहेत. ह्याचेच एक उदाहरण म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील ६५ मिलियन वर्षापूर्वीच्या विशालकाय डायनोसोरचे एकमेव जीवाश्म स्थळ आज नष्ट झाले असून भावी अभ्यासक आणि विध्यानासाठी ते आता उपलब्द राहणार नाही अशी माहिती आणि खंत येथील भूशास्त्र संशोधक प्रा सुरेश चोपणे ह्यांनी व्यक्त केली आहे. आज जिल्ह्यात केवळ तेम्भूर्डा-पिसदुरा ह्या एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर डायनोसोर चे जीवाश्म आढळतात. ह्याच परिसरात भद्रावती तालुक्यात देखील अल्प अवशेष मिळाली आहेत ,परंतु पिसदुरा येथे त्यांची हाडे,विष्ठा,शाख-शिंपले आणि वनस्पती जीवाश्मे मोठ्या प्रमाणावर आढळत होती .प्रा.सुरेश चोपणे ह्यांनी १९९९ पासून आजपर्यंत ह्या परिसरात संशोधन करून काही महत्वाचे पुरावे गोळा केले होते. २७ एप्रिल २०२४ रोजी चोपंने ह्यांनी ह्या परिसराला सर्वेक्षणाच्या दृष्टीने भेट दिली असता येथील सर्व जीवाश्मे जवळ जवळ नष्ट झाली असल्याचे निदर्शनास आले. आतापर्यंत त्यांनी गोळा केलेले हे अमूल्य पुरावे संशोधक आणि विध्यार्थ्या साठी त्यांनी व्यक्तिगत अश्म संग्रहालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहेत . तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी मा भोगे साहेब ह्यांना एक प्रस्ताव सादर करून पिसदुरा येथे डायनॉसोर पार्क आणि भद्रावती येथे मोठे पुरातत्व संग्राहलय उभारण्याचा प्रस्ताव दिला होता आणि तो मजूर झाला होता. परंतु तत्कालीन सरकारने मजुरीला वेळ लावल्याने डायनोसोर स्थळ, जिल्ह्यातील पुरातत्वीय आणि ऐतिहासिक वारसा स्थळांचे संरक्षण होऊ शकले नाही. चंद्रपूर जिल्हा ऐतिहासिक दृष्ट्या समृद्ध असूनही आज सुद्धा पुरातत्व विभागाचे संग्रहालय होऊ नये ही खेदाची बाब आहे .त्यामुळे जिल्ह्यातील अनेक ऐतिहासिक मुर्त्या चोरी जात असून ही स्थळे अतिक्रमित होत आहेत.

जिवती येथील जीवाश्मस्थळ असेच काही संशोधक आणि भूशास्त्र विध्यार्थ्यांनी अभ्यासाठी जीवाश्मे गोळा करून संपवून टाकले. पिसदुरा हे स्थळ संरक्षित न केल्याने डायनोसोर चे जीवाश्मे विविध कारणाने आज गायब झाली आहेत, त्यात शेतीची कामे, शेतीसाठी अतिक्रमण, बाहेरून येणाऱ्या संशोधक आणि लोकांनी जीवाश्मे घेवून जाणे आणि विकणे अश्या गतीविधीचा समावेश आहे .प्रा सुरेश चोपणे ह्यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या पुरातत्वीय पुराव्यांना गोळा करून घरी एक शैक्षणिक संग्रहालय उभारले असून विसापूर येथे नुकतेच सुरु झालेल्या बोटनिकल गार्डन येथे संग्रहालयात, डायनोसोरची जीवाश्मे, विविध प्रकारची अश्म आणि पाषाण युगील अवजारे भेट दिली आहेत, तसेच शहरात पुरातत्वीय संग्रहालय झाल्यास इतर सर्व पुरावे सुद्धा दिली जातील असे त्यांनी सांगितले. संशोधक, नागरिक आणि शासनाने अश्या सर्व स्थळांचे जतन करावे आणि मोलाचा हा ठेवा भावी पिढीला पाहण्यासाठी आणि अभ्यासाठी संरक्षित करण्यात यावा, असे आवाहन सुरेश चोपणे ह्यांनी केले आहे.



डायानोसॉर प्राण्यांच्या विष्ठा



पूर्वी मिळालेली शंख जिवाष्मे



पूर्वी मिळालेली दायानोसॉर प्राण्यांची हाडे

६५ दशलक्ष वर्षापूर्वी एका विशाल उल्केच्या पृथ्वीवर आदळल्याने आणि त्याच दरम्यान पृथ्वीवर अनेक ठिकाणी ज्वालामुखी उद्रेक होऊ लागले . हाच लावारस उत्तर-पश्चिमेकडून चंद्रपूर कडे वाहात आला . आणि त्याखाली त्यावेळेस विकसित झालेले प्रचंड आकाराचे डायनोसोर प्रजातीचे अनेक प्राणी इथे आणि महाराष्ट्रात मृत्युमुखी पडले . एका मागोमाग एक बेसाल्ट खडकांचे थर साचल्याने पश्चिम महाराष्ट्रात ते खूप खाली गाडल्या गेले तर चंद्रपूर कडे बेसाल्ट खडकाचा थर जाड नसल्याने तो लाखो वर्षात क्षरण झाला आणि ६ कोटी वर्षापूर्वीचे डायनोसोर जीवाश्म रूपाने बाहेर येवू लागले . डायनोसोरची जीवाश्मे वर्धा, गडचिरोली आणि उमरेड परिसरात सुधा मिळाली आहेत परंतु तीथेसुधा आता अवशेष शिल्लक राहिली नाही ही गंभीर बाब आहे अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे . **प्रा . सुरेश चोपणे, भूशास्त्र आणि पर्यावरण अभ्यासक**


# राजकीय संस्कृती



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**राजकीय संस्कृती हा विषय त्या देशातील सामाजिक प्रथा, धारणा, रूढी आणि मूल्यांशी संबंधित आहे. ज्या एखाद्या राज्यकर्त्याच्या अधिपत्य, सत्ताकारण, शासन व्यवस्थेचे नियोजन आणि संचालन निर्धारित करतात. यामध्ये व्यक्तींच्या राजकीय विचारांचा, वर्तनाचा आणि संघटनांचा समावेश होतो जे समाजाच्या राजकीय व्यवस्थेची दिशा आणि रूपरेषा ठरवतात. भारतीय राजकीय संस्कृती, उदाहरणार्थ, विविधतेत एकता हा विचार घेऊन चालते.**



## क्षितिजापल्याड

ज्यामुळे विविध धार्मिक, भाषिक आणि सांस्कृतिक गटांच्या लोकांमध्ये सामंजस्य आणि ताळमेळ ठेवण्याची कला प्रदान करते. तसेच, पश्चिमी देशांच्या राजकीय संस्कृतीशी तुलना केल्यास, भारतीय राजकीय संस्कृतीत आदर्शवाद, नैतिकता आणि समाजसेवा यांचे महत्व अधिक आहे,असे आपण गृहीत धरतो. राजकीय संस्कृतीचा विकास आणि प्रभाव यामध्ये इतिहास, भूगोल, अर्थव्यवस्था आणि समाजाच्या अन्य क्षेत्रांचा समावेश होतो. यामुळे समाजाच्या विकासाला नवीन दिशा मिळते आणि त्याचे परिणाम देशाच्या सामाजिक-आर्थिक घडामोडींवर होतात. एक उदाहरण म्हणून, भारतीय राजकीय संस्कृतीतील निवडणुकांचे स्वरूप भारतीय लोकशाहीच्या मजबूतीचे प्रतीक आहे. निवडणुका जनतेच्या आकांक्षा आणि अपेक्षांचे प्रतिबिंब मानली जातात आणि यामुळे शासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी वाढते. असे म्हणता येईल की, राजकीय संस्कृती हे केवळ एक राजकीय चर्चेपेक्षा काहीतरी अधिक आहे; हे समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेला दिशा देणारा एक अभिन्न भाग आहे. त्यामुळे एका देशाच्या राजकीय संस्कृतीचे अध्ययन आणि समज यातूनच त्या देशाच्या लोकांच्या जीवनशैलीचे, समस्यांचे आणि संघर्षांचे गूढ उलगडता येते. राजकीय संस्कृतीचा अभ्यास केल्याने देशातील सत्ताधाऱ्यांच्या धोरणांचा आणि त्यांच्या वर्तनाचा अभ्यास करता येतो, तसेच ते जनतेच्या प्रतिसादाचे आणि त्याच्या प्रतिक्रियांचे स्वरूप समजून घेण्यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. यावरून जनतेच्या राजकीय जाणिवा आणि त्यांचा सत्तेशी असणारा संबंध समजून घेता येतो. उदाहरणार्थ, भारतातील राजकीय संस्कृतीत व्यक्त होणारी भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई आणि त्यावरील जनतेची प्रतिक्रिया हे त्याच्या राजकीय संस्कृतीचे एक प्रमुख घटक आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध उभारलेल्या विविध चळवळी, जसे की अण्णा हजारे यांची जन लोकपाल बिलासाठीची चळवळ, ही जनतेच्या सक्रिय सहभागाचे दर्शन घडवते. त्यांचे पुढे काय झाले हा भाग अलहिदा. हे सगळे राजकीय संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यातून जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे आहे. तसेच, लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत असे नागरिक संवाद आणि जबाबदारी हे भारतीय राजकीय संस्कृतीतील आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. नागरिकांना सरकारच्या निर्णयांमध्ये भाग घेण्याची आणि त्यावर प्रभाव पाडण्याची संधी देणारी ही व्यवस्था लोकशाहीच्या पायाभूत सिद्धांतांचे प्रतिबिंब आहे. म्हणून ठराविक काळानंतर निवडणूक महत्त्वाची आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे राजकीय संस्कृती ही केवळ सत्ताधारी आणि जनतेच्या दरम्यानच्या संबंधांचा अभ्यास करण्यासाठीचे फक्त साधन नाही तर ती एक समग्र सामाजिक आणि सांस्कृतिक प्रक्रिया देखील आहे. जी समाजाच्या सामर्थ्य आणि संघर्षाचे प्रमुख घटक म्हणून कार्य करते. यातून आपण देशाच्या राजकीय दिशा आणि त्याच्या सामाजिक धोरणांचे चिकित्सक मूल्यमापन करू शकतो. राजकीय संस्कृतीचा आणखी एक महत्वाचा पैलू म्हणजे ती नागरिकांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीवर आधारित आहे. उदाहरणार्थ, भारतात विविध आर्थिक पातळीवरील लोकांच्या राजकीय विचारांमध्ये फरक दिसून येतो. ग्रामीण भागातील लोकांची राजकीय संस्कृती वेगळी असते, तर शहरी भागातील लोकांची वेगळी. ग्रामीण भागात लोकांचा राजकीय संबंध अधिकतर त्यांच्या रोजगाराच्या स्थितीशी आणि सामाजिक स्तराशी संबंधित असतात, तर शहरी भागात शिक्षण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यावर अधिक भर दिला जातो. याचबरोबर, राजकीय संस्कृतीत लैंगिकता देखील एक महत्त्वाचा घटक आहे. भारतातील राजकीय संस्कृतीत महिलांची भागीदारी वाढवण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत, जसे की महिला आरक्षण. तथापि, सामाजिक रूढी आणि परंपरा यांच्या कारणामुळे अनेक ठिकाणी महिलांना राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी अडचणी येतात. शिक्षण आणि राजकीय संस्कृती यांच्यात देखील घनिष्ठ संबंध आहे. उच्च शिक्षित लोकसंख्या अधिक जागरूक असून, ते लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी अधिक सक्रिय भूमिका बजावतात. शिक्षणामुळे लोकांमध्ये स्वातंत्र्याची भावना वाढते आणि ते सरकारच्या कामकाजाचे समर्थन किंवा विरोध करण्यास सक्षम होतात. भारतीय राजकारणात शिक्षण आणि महिलांच्या सहभागाचे महत्त्व हे दोन महत्वाचे पैलू आहेत,



ज्यांचा थेट संबंध देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासाशी आणि लोकशाही सुदृढीकरणाशी जोडला गेला आहे. भारतीय राजकारणात शिक्षणाचे महत्त्व स्पष्टपणे दिसून येते. शिक्षण हे नागरिकांना सक्षम करण्याचे एक माध्यम आहे, जे त्यांना आपल्या हक्कांबद्दल जागरूक करते आणि त्यांच्या कर्तव्यांची जाणीव करून देते. शिक्षित नागरिक हे राजकीय प्रक्रियांमध्ये अधिक सक्रिय भाग घेऊ शकतात, कारण त्यांच्यात विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता असते. उच्च शिक्षणामुळे लोकांमध्ये सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करण्याची आणि त्यांच्या अधिकारांसाठी लढण्याची ताकद वाढते. महिलांचा राजकारणातील सहभाग हे भारताच्या लोकशाही सुदृढीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. दुर्दैवाने, ऐतिहासिकपणे भारतीय समाजात महिलांना अनेक क्षेत्रांमध्ये पुरुषांपेक्षा कमी महत्त्व दिले गेले आहे. परंतु, समाजातील बदलत्या भूमिकेनुसार महिलांचा राजकारणातील सहभाग वाढत चालला आहे, ज्यात आणखी वाढ होणे अपेक्षित आहे. महिला आरक्षण या धोरणाने निवडणूक क्षेत्रांमध्ये महिलांना अधिक स्थान मिळवून दिले आहे. त्याचबरोबर, महिला सशक्तिकरणाच्या विविध कार्यक्रमांमुळे महिला आत्मविश्वासाने आपल्या अधिकारांसाठी आणि समाजातील स्थानासाठी लढू शकत आहेत. अखेरीस, राजकीय संस्कृती ही केवळ एक देशाच्या आंतरराष्ट्रीय ओळखीसाठी महत्त्वाची नाही तर ती आपल्या देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात देखील महत्वाची भूमिका बजावते. राजकीय संस्कृतीचा विकास आणि त्यातील बदल हे समाजाच्या भविष्याच्या दिशा निर्धारित करण्यासाठी महत्त्वाचे असतात. त्यामुळे एका सुदृढ आणि सक्रिय राजकीय संस्कृतीची निर्मिती ही केवळ एक राजकीय गरज नाही तर एक सामाजिक आवश्यकता देखील आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# इतरांना शहाणपणा शिकवणे फार सोपे!



बबन गुळवे
मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**सकाळी साडे सहा वाजता लातूर येथील बसस्थानकातून निघालेली एसटी महामंडळाची बस नांदेडकडे धावत होती. बस प्रवाशांनी भरलेली होती. काही प्रवासी उभे होते. सवा सातच्या सुमारास ती बस लातूररोड येथील स्टॉपवर थांबली. बसमधील दोन प्रवासी उतरले. आणि लातूररोड येथील प्रवासी बसमध्ये चढू लागले.बसमध्ये पाय ठेवायला जागा नव्हती एवढी प्रवाशांची गर्दी होती. कंडक्टरने चार-पाच प्रवाशी घेतले व बाकीच्या प्रवाशांना मागील बसने येण्याची विनंती केली.हे पाहून एक प्रवासी कंडक्टरला शहाणपणा शिकवू लागला.तुम्हा कंडक्टर लोकांना बसमध्ये गर्दी नको असते.तिकीटे फाडायला तुम्ही कंटाळा करता. म्हणून एसटी महामंडळ तोट्यात आहे.गर्दीमुळे बसमध्ये उभा राहून प्रवास करणारा व्यक्ती कंडक्टरला आपले ज्ञान पाजळत होता!**

बिच्चारा कंडक्टर त्या व्यक्तीला बसमधील गर्दीची जाणीव करून देत होता तरीही तो व्यक्ती कंडक्टरवर तोंडसुख घेत होता.हा प्रसंग सांगण्याचा उद्देश एवढाच की आजकाल सत्य परिस्थिती जाणून न घेता फुकटचे ज्ञान देण्याची आणि इतरांना शहाणपणा शिकवण्याची प्रवृत्ती बळावली आहे.

सध्या लोकसभा निवडणूक सुरू आहे.प्रचाराच्या रणधुमाळीने वेग घेतला आहे.या अनुषंगाने सोशल मीडियावर राजकीय परिस्थितीचे भान न ठेवता व सत्य काय ते जाणून न घेता फुकटचे शहाणपण सांगितले जात आहे.मतदारांना मतदानाचा अधिकार संविधानाने दिला आहे, पण काही लोक याचे भान न ठेवता मतदारांना अतार्किक सल्ले देत आहेत.हे कुठेतरी थांबायला हवे.आपल्या घरात, समाजात,गावात असतात काही बोलघेवडे लोक जे नुसती बडबड करत असतात.अज्ञानी असुनही 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या म्हणीप्रमाणे इतरांना शहाणपणा शिकवतात. स्वतः मन लावून शिकायचे नाही आणि जे उच्च शिक्षण शिकत असतात किंवा जे उच्च शिक्षित आहेत त्यांची खिल्ली उडवणे अल्पशिक्षित लोकांना आनंद देत आहे.स्वतः निष्ठेने काम न करणारे लोक आणि कामचुकार लोक प्रामाणिक नोकरदारांना विनाकारण त्रास देत असतात. स्वतः वेळेचे बंधन कधीही पाळायचे नाही आणि दुसरा कधी काळी उशिरा आला की त्याचा फार मोठा बाऊ करायचा हे सगळ्या कार्यालयात सुरू आहे. स्वतःचे चारित्र्य जपायचे नाही आणि इतरांच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा.आपला भ्रष्टाचार झाकून ठेवायचा आणि दुसऱ्याने न केलेला भ्रष्टाचार मीठ मिरची लावून सांगायचा.स्वतः नीट वागायचे नाही आणि इतरांना चांगले वागा म्हणून सांगायचे.स्वतः घाणेरड्या भाषेत बोलायचे आणि इतरांना सभ्य भाषेत बोलायचा सल्ला दिला जातो.

स्वतः जातीयता पाळायची व धर्मभेद करायचा आणि दुसऱ्यांना माणूस हीच खरी जात आणि मानवता हाच खरा धर्म असे सोयीनुसार सांगायचे. आपले लेकरे परदेशात उच्च शिक्षणासाठी पाठवायचे आणि इतरांच्या लेकरांना पारंपरिक व्यवसायाचे फायदे समजावून सांगायचे.शेतीत सोनं पिकव म्हणून फुकटचा सल्ला द्यायचा!व्यसनावर पैसा बरबाद करणारे लोक घरी पत्नीला बचतीचे सल्ले देतात. काही नोकरदारांना उच्च पदावर नोकरी करण्याची संधी मिळाली की आपल्या हाताखालच्या नोकरदारांना सन्मानाने वागवत नाहीत.मनमानी कारभार करतात आणि ते पद गेले की आपल्या मूळ स्वभावावर येतात.एखाद्या कार्यक्रमात बोलण्याची संधी मिळाली की श्रोत्यांना



कंटाळा येईपर्यंत ज्ञान पाजळतात. अडचणीतल्या नातलगांना,मित्रांना कधीही मदत न करणारे महाभाग दुसऱ्यांनी आपल्या मदतीला धावून यावे अशी अपेक्षा बाळगतात. इतरांच्या वाढदिवसाला जायचे नाही,शुभेच्छा द्यायला मन मोठे करायचे नाही. आपल्या वाढदिवसाचे स्टेटस इतरांनी ठेवले पाहिजे अशी मागणी करायची.इतरांचा मान सन्मान जपायचा नाही आणि दुसऱ्यांनी आपली स्तुती करताना थकले नाही पाहिजे अशी इच्छा बाळगायची.हा सगळा दुटप्पीपणा,ढोंगीपणा सगळीकडे वाढला आहे. अनोळखी लोकांमध्ये गेल्यावर बढाया मारणारे काही लोक स्वतःचे कर्तृत्व इतक्या सफाईदारपणे सांगतात की ऐकणारे प्रभावीत होतात. आपल्या ओळखीचा एखादा व्यक्ती असा असतो की तो आपल्या मुलाचे लग्न मोजक्या लोकांच्या उपस्थितीत उरकून घेतो.परंतु, एखाद्या गरिबाच्या मुलीच्या लग्नात गावजेवण द्यायला भाग पाडतो.

अशा या विचित्र लोकांच्या दुनियेत मी काही चांगले लोक पाहिले आहेत.जे नेहमीच चांगले वागतात,चांगले बोलतात आणि नेहमी चांगले कर्म करतात.आपली नोकरी व व्यवसाय अगदी प्रामाणिकपणे करतात.जात व धर्माला महत्त्व न देता माणुसकीला जीवापाड जपतात.हे चांगले लोक कधी कोणाचा अपमान करत नाहीत.कोणी चुकीचे वागत असेल तर त्याला समजावून सांगतात.ते मुळात स्वभावाने प्रेमळ व समजूतदार असतात म्हणून इतरांना समजून घेतात, असे हे चांगले लोक आजही आपल्या अवतीभवती आहेत म्हणून हे जग टिकून राहिले आहे.जोपर्यंत असे चांगले लोक या जगात असतील तोपर्यंत हे जग अस्तित्वात राहणार आहे. ज्या दिवशी वाईटांचा सुळसुळाट वाढेल त्यादिवशी जगाचा अंत व्हायला वेळ लागणार नाही!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अमेरिकन विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा संताप



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**अमेरिकेतील विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा संप हा मागील पूर्वे इतिहासाचा अनोखा दाखला आहे. 'युद्ध नको शांतता हवी' अशी भूमिका घेऊन व्हिएतनाममधील युद्धविरोधात जशी निदर्शने झाली होती तशी आता इस्त्राईल- हमास युद्धविरोधात होत आहेत. विद्यार्थी संघटनांनी मानवतावादी भूमिका घेऊन युद्धाला विरोध केला आहे. पण जगातील स्वार्थी राजकारणी त्यातून काही बोध घेतील काय हा खरा प्रश्न आहे. विशेषतः अमेरिकेला दुटप्पी धोरण सोडावे लागेल. अमेरिकेतील लोकशाही ही जगातील एक जिवंत लोकशाही म्हणून ओळखली जाते. विशेषतः ज्या लोकशाही राष्ट्रामध्ये युवक वर्ग हा सतर्क आणि जागरूक असतो तेथे लोकांचे प्रश्न गतिमानपणे मांडले जातात.**

७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने मध्यरात्री इस्त्राईलवर आक्रमण केले आणि अमानुष अत्याचार केले. त्यामुळे संताप झालेल्या इस्त्राईलने लगेच प्रतिहल्ला सुरू केला आणि पॅलेस्टाईन व्याप्त भूमीवर प्रतिहल्ले झाले. हमासनेही त्यास निकराने झुंज दिली. जगातील अमेरिकेसह अनेक राष्ट्रांनी त्याच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध लढण्याचा इस्त्राईलला अधिकार आहे ही गोष्ट मान्य केली. इस्त्राईलने प्रतिशह म्हणून केलेले हल्ले कुठेतरी थांबायला पाहिजे होते. परंतु जवळजवळ ६ महिन्याचा कालावधी लोटला असला तरी अद्यापही इस्त्राईलचे हमास विरुद्धचे युद्ध चालूच आहे. ते कुठे, केव्हा आणि कसे संपणार याची चिंता जगातील अनेक राष्ट्रांना वाटत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने वारंवार ठराव करून सुरक्षा परिषदेत विचार-विनिमय करून दोन्ही पक्षांनी युद्ध थांबवावे आणि शांततेने तोडगा काढावा असा आग्रह धरला. परंतु दोन्ही बाजूंनी टोकाची भूमिका घेणे चालू ठेवले. हमास समर्थक लेबनान, सिरीया, इराण, तुर्की इत्यादी राष्ट्रांनी या ना त्या मार्गाने संघर्ष चालू ठेवला. हुथी बंडखोरांनी तर सुएझ कालव्याचा प्रवाहच अडवून ठेवला आणि येणाऱ्या जहाजांवर हल्ले सुरू केले. त्यामुळे चिडून जाऊन इस्त्राईलने सुद्धा युद्ध थांबविण्याऐवजी लांबविण्याचाच पवित्रा घेतला. अमेरिका, इजिप्त आणि इस्त्राईल तसेच हमास म्हणजे पॅलेस्टाईन यांनी एकत्र येऊन काहीतरी तोडगा काढावा आणि युद्ध थांबवावे, युद्धबंदी करावी असा आग्रह होता. विशेषतः रमझानच्या काळात युद्ध थांबेल असे वाटत होते. युद्ध थांबण्याची सूतराम शक्यता नाही आणि आता अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री ब्लिंकन हे युद्ध थांबविण्यासाठी आग्रही पवित्रा घेत आहेत. तथापि, युद्ध थांबण्याची काही चिन्हे दिसत नाहीत. हमासने जशी चूक केली तशी चूक इस्त्राईलही करत आहे. आजही हमासच्या ताब्यात इस्त्राईलचे १३४ पेक्षा अधिक ओलीस आहेत. त्यापैकी ४० जणांची सुटका करावी व टप्प्याटप्प्याने दोन्ही बाजूंनी ओलीस मुक्त करावेत असे ठरले होते. परंतु त्यात वेळकाढूपणा, चालढकल यामुळे तणाव अधिक वाढत आहे. जगातील संयुक्त राष्ट्रसंघासारखे व्यासपीठ असून किंवा भारतासारखा तटस्थ राष्ट्रांचा नेता असून या सर्वांनी दोन्ही बाजूंनी युद्ध थांबवावे, तोडगा काढावा व शांततेने प्रश्न सोडवावा असा आग्रह धरला आहे. इस्त्राईलने तर आता युद्ध न थांबविता राफेल या शहरावर हल्ला करून दक्षिण गाझापट्टी पूर्णपणे जिंकण्याचा आणि गाझा प्रदेश ताब्यात घेऊन पॅलेस्टाईनला नमविण्याचा पवित्रा घेतलेला दिसतो. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, युद्धाने प्रश्न सुटत नाहीत, ते बिकट होतात हे कळून सुद्धा दोन्ही बाजूंना वळत नाही. जिवीत व वित्तहानी एवढी झाली आहे की १० वर्षात पुन्हा पॅलेस्टाईनचे पुनर्वसन कसे करावयाचे हा खरा प्रश्न आहे. इस्त्राईल आणि पॅलेस्टाईनमधील संघर्ष सतत वाढत आहे, चिघळत आहे आणि तेवढाच तो चिंताजनक अवस्थेला पोहोचला आहे. हे लक्षात घेऊन २७ एप्रिल रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी तेथे तंबू ठोकला आणि 'युद्ध नको शांतता हवी' यासाठी आंदोलन सुरू केले. या आंदोलनाचे लोण उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पोहोचले. कोलंबिया विद्यापीठ हे आंदोलनाचे केंद्रस्थान बनले. तसेच न्यूयॉर्क सिटी कॉलेजातील विद्यार्थीही संपावर गेले. अगदी दक्षिणेतील फ्लोरिडा राज्यातील फ्लोरिडा विद्यापीठापर्यंत हा संप पसरत गेला. एखाद्या वावटळीप्रमाणे हां हां म्हणता अगदी नॉर्थ कॅरोलिना, मिशीगन अशा कितीतरी विद्यापीठातून अमेरिकेतील विद्यार्थी संपामध्ये उतरले. विद्यार्थ्यांच्या बरोबरच अमेरिकेतील सूज्ञ व जागृत प्राध्यापक वर्ग सुद्धा त्यांच्या बाजूने संपात उतरला आहे. आता इस्त्राईलने युद्ध थांबवावे, शांततेने प्रश्न सोडवावेत एवढीच विद्यार्थ्यांची मागणी आहे. पूर्व इतिहास मागे पाहिला तर असे दिसते की, अमेरिकेतील स्वातंत्र्य युद्धात सुद्धा तेथील विद्यार्थी उतरले होते. पुढे जाऊन अब्राहम लिंकन यांच्या काळात जो मुक्ततेचा जाहीरनामा निघाला व गुलामगिरी संपविण्यात आली, तेथे गुलामांना मुक्त करण्यासाठी सुद्धा विद्यार्थ्यांनी मोठी सकारात्मक भूमिका घेतली होती. मार्टीन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्त्वाखाली नागरी हक्काची मोठी चळवळ अमेरिकेमध्ये घडून आली. १९५० या दशकात व्हाईट हाऊसवर ८०,००० निग्रोंनी मोठा मोर्चा काढला व त्यापुढे मार्टीन ल्यूथर किंग यांनी माझ्या मनी एक स्वप्न वसत आहे. 'आय हॅव ए ड्रीम इन माय माईंड' या नावाचे





एक सुप्रसिद्ध गाजलेले भाषण केले व त्यांनी काळे व गोरे यांच्यामध्ये समानता यावी, दोघांची मुले एकाच शाळेत शिकावी. एके दिवशी काळा माणूस अमेरिकेचा अध्यक्ष व्हावा असा त्यांनी आग्रह धरला होता. तसेच कोरीयन युद्ध असो की व्हिएतनाममधील युद्ध असो यावेळी अमेरिकेतील तरुणांनी मोठ्या प्रमाणात निदर्शने केली, आंदोलने केली, संप घडवून आणले, 'युद्ध नको शांतता हवी' असा आग्रह धरला. अखेर व्हिएतनामवरील बॉम्बहल्ले थांबवून अमेरिकेला व्हिएतनाममधून आपले सैन्य माघारी घ्यावे लागले. १९७३ मध्ये जिमी कार्टर यांनी व्हिएतनाममधून लष्कर मागे घेण्याचा निर्णय घेतला आणि अमेरिकेच्या इतिहासात एक मोठी वळण देणारी घटना घडून आली. हा सर्व इतिहास असतानाही जो बायडेन यांच्या काळात नुकत्याच सिनेटमध्ये युक्रेनला सहाय्य म्हणून आणि इस्त्राईलला सहाय्य म्हणून काही कोटी डॉलर्सची मदत जाहीर करण्यात आली आहे. या पॅकेजमुळे अमेरिकेतील तरुण वर्ग अधिक वैतागला, संतापला आणि ते विद्यार्थी विद्यापीठातून संपावर गेले. विद्यार्थ्यांनी हा प्रश्न शांतता आणि मानवता या मार्गने हाताळण्याचे ठरविले. त्यांनी असा आग्रह धरला आहे की, शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडवा, युद्ध थांबवा आणि मानवतावादी दृष्टीने युद्धग्रस्त लोकांना पिण्याचे पाणी, औषधे, खाद्यपदार्थ पुरवण्यासाठी म्हणून प्रयत्न करा. बिचाऱ्या विद्यार्थ्यांनी केलेल्या मागणीत काहीही चूक नाही. त्यांचे म्हणणे खरेच आहे. खरेतर, युद्धाने प्रश्न सुटत नाहीत, ते बिकट होतात ही गोष्ट त्यांनी कळली पाहिजे. अमेरिकेतील विद्यार्थ्यांनी संपाला मोठा जोरदार प्रतिसाद दिला आहे. कोलंबिया हे या संपाचे केंद्रस्थान बनले आहे. पूर्णपणे कोलंबिया विद्यापीठ विद्यार्थ्यांनी जणू ताब्यातच घेतले आहे. तेथे न्यूयॉर्कमधील पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. शंभरहून अधिक तरुणांना अटक करण्यात आली आणि १९ मे पर्यंत तेथे पोलिस यंत्रणा असणार आहे. तेव्हा पोलिसांना विद्यापीठाच्या परिसरात पाठविण्याचा आदेश ही काही भूषणावह गोष्ट नाही. खरेतर, विद्यापीठे ही स्वायत्त असतात. तेथील प्रशासन त्यांना चालवित असते. तेथील कायदा व सुव्यवस्था बिघडली तर पोलिसांना पाठविण्याची वेळ यावी यासारखी दुर्दैवाची दुसरी गोष्ट नाही. अमेरिकेतील लोकशाही जिवंत आहे, जागरुक आहे, याचे विद्यार्थी आंदोलन हे उत्तम उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी आंदोलने करून सरकारची दुय्यम भूमिका उघडी केली. एकीकडे अमेरिकन सरकार इस्त्राईलला पाठीशी घालते, मदत करते आणि दुसरीकडे जो बायडेन म्हणतात की, नेतान्याहू हे चुकत आहेत. त्यांनी आपली चूक दुरुस्त केली पाहिजे. तेव्हा खाण्याचे आणि दाखविण्याचे दात यामधील फरक कळला पाहिजे. अमेरिकेला खरोखरच युद्ध थांबवायचे आहे का वरवर अमेरिका नेतान्याहू यांच्यावर टीका करते आणि प्रत्यक्षात मात्र युद्धासाठी हिरवा कंदील दाखवते असे तर काही नाही ना, असा प्रश्न पडतो. विद्यार्थी संघटनांच्या आंदोलनामुळे अमेरिकेच्या दुटप्पीपणावर चांगलाच प्रकाश पडला आहे आणि बायडेन प्रशासनाच्या धोरणाचे पितळ उघडे झाले आहे. तेव्हा अमेरिकेतील विद्यार्थ्यांनी योग्य वेळी संप करून हा प्रश्न ऐरणीवर आणला आहे एवढे मात्र खरे. उत्तर- दक्षिण व पूर्व-पश्चिम आंदोलन पसरत आहे. भविष्यकाळात अमेरिकेने शांतता व विकासासाठी सामुदायिक पवित्रा घ्यावा, खाण्याचे व दाखविण्याचे दात यातील फरक दूर करावा, जगात भांडणे लावण्यापेक्षा जगात शांतता कशी निर्माण करता येईल याचा विचार करावा. रशिया- युक्रेनमधील युद्ध असो की इस्त्राईल- हमासमधील युद्ध असो मनात आणले तर अमेरिका युद्ध थांबवू शकते. पण शस्त्रास्त्राची बाजारपेठ आणि युद्ध चालू ठेवणे यासारख्या अपप्रवृत्तींपासून दूर राहून अमेरिकेने जगाच्या, मानवाच्या कल्याणासाठी विचार करावा. रशिया- युक्रेनचा संघर्ष असो की इस्त्राईल- हमास संघर्ष असो, अमेरिकेला तो सोडविता आला नाही. उलट, शस्त्रास्त्रांची बाजारपेठ म्हणून त्याच्याकडे पाहून त्यांना शस्त्रे विकण्याचा, लढण्यासाठी मदत करण्याचा सपाटाच अमेरिकेने चालविला आहे. त्यामुळे अमेरिकेतील विद्यार्थ्यांनी हे सर्व खरे खोटे याची देही याची डोळा पाहिले आणि मानवतावादाचा आग्रह धरला, त्यासाठी त्यांनी संपाचे रणशिंग फुंकले. युवाशक्ती आणि प्राध्यापक वर्ग आता शांतता निर्माण करण्यासाठी दबाव निर्माण करत आहे. जो बायडेन शहाणे असतील तर त्यांनी उद्याची निवडणूक लक्षात घेऊन युद्धबंदीसाठी प्रयत्न करावा. नुसते नेतान्याहू यांना दोष देऊन प्रश्न सुटणार नाहीत. दबाव निर्माण करावा लागेल. त्यांना कोणत्याही प्रकारची मदत देता कामा नये. त्यांच्यावर फारतर बंधने लावा पण युद्ध थांबवा असा आग्रह विद्यार्थ्यांनी धरला आहे. परंतु दुटप्पी धोरण स्विकारणाऱ्या बायडेन सारख्या प्रशासनाला जाग येईल का आणि विद्यार्थी संपाचे अंजन त्यांच्या डोळ्यात विद्यार्थ्यांनी घातलेले आहे. हा संप म्हणजे अमेरिकेला घरचा आहेर आहे. अमेरिका यातून शहाणी झाली तरच तिढा सुटेल, नाहीतर नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे असेच म्हणावे लागेल. अमेरिकेतील प्रशासनाला संपाने एक मोठा धक्का दिला आहे. पण झोपेतून अमेरिका जागी झाली तरच त्यातून काही साध्य झाले असे म्हणता येईल.

# काव्यसंग्रहाची वाटचाल...

आधुनिक केसरी

लिखाण वाचनाची सवय शालेय जीवनापासूनच होती. परिस्थिती गरीब असल्याने प्राथमिक शिक्षण वाघोशी ता. खंडाळा, जि. सातारा, माध्यमिक न्यू इंग्लिश स्कूल अंदोरी व अकरावी व बारावी मालोजीराजे जुनियर कॉलेज लोणंद येथे घेतल्यानंतर आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेता आले नाही, मिळेल तिथे काम करून नोकरीसाठी अर्ज करायचा किंवा आर्मी सारख्या इतर भरतीला जाऊन नोकरीला लागायचं एवढंच ध्येय ठेवलं होतं. सन २००२ नंतर बारावी पूर्ण झाली आणि मिळेल ते काम करून डोंगरातून तर कधी रस्त्याने भरतीची तयारी करत-करत वर्तमानपत्र व इतर पुस्तके वाचत लिखाणात सातत्य ठेवले. त्यामुळे मला सकारात्मक बळ मिळत गेले आणि मानसिकता टवटवीत राहिली. त्यावेळी मी साप्ताहिक परिवर्तन मध्ये व दै. पुढारी यांसारखे वर्तमानपत्रांमध्ये लिखाण करीत होतो. कधी कविता, लेख, कथा यांचे लिखाण मी करीत होतो. रोजंदारीने काम करीत करीत तर कधी संध्याकाळी भरतीची तयारी झाल्यानंतर लिखाण करण्यास तर कागदही मिळत नव्हता तेव्हा मी हनुमान मंदिराच्या परिसरात असणाऱ्या वडाच्या झाडाखाली लेखन करीत असत आणि वडाच्या पानावर लेखन करायचो. मग कागद मिळाल्यावर त्यामध्ये लिहून पेपरच्या कार्यालयात पाठवीत होतो त्यावेळी मला साप्ताहिक परिवर्तन चे संपादक श्री. संतोष खरात व दै. पुढारी चे श्री. हरीश पाटणे सरांचा खास सहवास मिळाला. माझ्या आणि आई वडिलांच्या दृष्टीने नोकरीला लागणं हे ही तितकंच महत्त्वाचं होतं. सन २३ नोव्हेंबर २००६ रोजी बृहन्मुंबई पोलीस दलामध्ये भरती झाल्यानंतर आनंद गगनात मावेनासा झाला. मुंबई पोलीस दलात भरती झाल्यानंतरही लिखाणानं माझी साथ सोडली नाही. मिळेल त्या फावल्या वेळेत लिखाणाला जिवंत करण्याचा प्रयत्न केला. योगा, प्राणायाम आणि व्यायाम करत राहिलेले शिक्षण मी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी.ए. पोलीस प्रशासन मधून पूर्ण केले. त्यामुळे कर्तव्यामध्ये उत्सुकता वाढत गेली. क्षेत्र शिस्तीचे आणि संयमाचे असल्याने वेगवेगळे अनुभव मिळत गेले. लोकांच्या वेदना, सर्वसामान्यांचे जीवन, पोलिसांचे जीवन, शहर वस्तीचे हाल हे माझ्या मनाला टोचत राहिले. घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या या मुंबईकरांचं जीवन किती काठावरचं असतं याची वेळोवेळी जाणीव होत गेली. महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र 'दक्षता' व बालभारतीचे 'किशोर' मासिकमध्ये व नवाकाळ, सकाळ सारख्या वर्तमानपत्रांमध्ये कविता येऊ लागल्याने उत्स्फूर्तपणा वाढत गेला. पोलीस खात्यात असल्याने सततचा बंदोबस्त, ताण तणाव, रजेची अडचण एवढा सारा प्रपंच सांभाळत आठवड्यातून मिळणाऱ्या सुट्टीमध्ये तर कधी कर्तव्यावर दुपारच्या वेळी मिळणाऱ्या वेळेचा सदुपयोग करीत मी वेगवेगळ्या विषयांवर लिखाण करीत राहिलो.




वाकोला पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना कोरोना काळामध्ये वेगवेगळे अनुभव मिळत गेले. संपूर्ण जग स्तब्ध असताना सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाईन सुरू झाले आणि मोबाईल वरील एका मेसेजने वेगवेगळे व्हाट्सअप ग्रुप तयार झाले. त्यामध्ये महाराष्ट्रातील कितीतरी नामवंत साहित्यिक, कवी, लेखक यांचे ग्रुप तयार होऊन त्यामध्ये कविता लेखन कसे करायचे याचा अनुभव मिळत गेला. आणि वेगवेगळ्या विषयांवरील कविता, चित्रकविता, चारोळी यांच्या स्पर्धा होऊ लागल्या. रोजच कविता वाचन, शब्दांची जुगलबंदी त्यामध्ये मन रमत गेलं. आज या साहित्यिकांच्या ग्रुप मधुन एकूण १५० कवितांचे प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह मिळालेले आहेत. मोबाईल वाहनांवर वाहन चालवत असताना तर कधी रात्री आरामाच्या वेळेस लिखाण करीत राहिलो. गार्ड ड्युटी, लॉक अप ड्युटी करताना लिखाणाला जास्त वेळ मिळत गेला. दररोज अर्धा तास मेडिटेशन, एक तास वाचन आणि एक तास लिखाण करीत राहिलो. सर्वात महत्त्वाचं म्हणजे माझ्या लिखाणात आणि वाचनात सातत्य ठेवले. दररोज एक कविता तर कधी लेख लिहित होतो, मग लिहिलेले लिखाण वर्तमानपत्र व मासिका मध्ये पाठवीत राहिलो. हे सर्व लेखन दिवस पाळी तर कधी रात्रीच्या वेळी करीत होतो. जास्त लिखाण रात्रीच्या वेळी अनुभवयास मिळाले. लेखन प्रसिद्ध झाले की, लिखाणाला ताकद यायची. एक लिखाण दहा वेळा लिहायचं मग ते बरोबर आहे का, हे मन सांगायचं आणि मग त्यातील व्याकरण, वाक्यरचना यांच्या चुका, अलंकारिक भाषांतर मनातून तपासून फायनल करून मग ते पाठवित होतो. सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे कर्तव्य करीत असताना अधिकारी वर्ग व माझे मित्र सतत सांगायचे की एकदा काव्यसंग्रह पुस्तक आले पाहिजे मग काव्यसंग्रहाच्या तयारीला लागलो. मा.वपोनि राजेंद्र काणे सरांच्या कवितेत शब्द खूप छान आहेत एवढ्या शब्दाने अजून ताकद वाढत गेली. कधी कथा, लेख तर कधी कविता यांचा समतोल लिखाण चालू ठेवले. दहा ते बारा प्रकाशने शोधली परंतु आर्थिक कारणाने जमले नाही, त्यानंतर डॉ. गायकवाड निरा ता.पुरंदर यांना भेटल्यानंतर त्यांनी प्रकाशकाचे नाव सांगून मदत केली आणि परीस प्रकाशन पुणे यांच्याशी संपर्क करून काव्यसंग्रहाबद्दल चर्चा केली. मी लिहिलेल्या १५० कवितांपैकी शंभर कवितांचे परीक्षण करून घेणे मला खूप महत्त्वाचे होते. मुंबईला स्थायिक असणारे जेष्ठ साहित्यिक की ज्यांना मराठी साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा पुरस्कार म्हणजेच ज्ञानपीठ पुरस्कार व इतर अनेक पुरस्कार मिळालेले मा. श्री. भालचंद्र नेमाडे सरांची भेट घेऊन शंभर कविता त्यांना समीक्षणाकरिता सुपूर्त केल्या आणि जवळजवळ सहा महिने त्यांनी व्यवस्थित कवितांचे समीक्षण, व्याकरण आणि योग्य मार्गदर्शन करून काव्यसंग्रह काढण्यास खूप महत्त्वाचे मार्गदर्शन केले. अधून मधून त्यांच्याशी भेट घेताना साहित्य विषयी चर्चा, लिखाणाबद्दल त्रुटी, सुधारणा यांचं मार्गदर्शन मिळत गेलं आणि "अजून थोडं सोस मना" हा माझा पहिला काव्यसंग्रह एक वर्षाच्या परिश्रमातून वाचकांच्या भेटीला येण्याचे स्वप्न पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर खंडाळा, जि. सातारा येथील प्रसिद्ध साहित्यिक मा. श्री. विलास वरे सर की ज्यांची १५पुस्तके प्रसिद्ध असून विविध पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत, त्यांनी माझ्या या पहिल्या काव्यसंग्रहास प्रस्तावना दिली आणि ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री.भालचंद्र नेमाडे सरांनी समीक्षण व शुभेच्छा लेखन केले. हा पुस्तक प्रकाशन सोहळा माझ्या गावच्याच मातीत म्हणजे हनुमान जयंती उत्सवा दरम्यान सकाळी ०६:४५ वा. २५०० लोकांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ सदस्य व प्रसिद्ध साहित्यिक की ज्यांची आतापर्यंत ५५ पुस्तके व विविध पुरस्कार मिळालेले आहेत असे मा. श्री. जगन्नाथ शिंदे सरांच्या हस्ते व प्रसिद्ध साहित्यिक मा. श्री. विलास वर सरांच्या आणि समस्त ग्रामस्थ मंडळ वाघोशी, वाघोशी ता. खंडाळा जि. सातारा या ठिकाणी सर्वांच्या साक्षीने पार पडला हे माझं सर्वात मोठं स्वप्न. हा माझा पहिला "अजून थोडं सोस मना" हा कवितासंग्रह आपणा सर्वांना नक्कीच आवडेल ही आशा बाळगतो.

**पुस्तकाचे नावः अजून थोडंस मना पृष्ठेः ८८ प्रकाशनः परीस पब्लिकेशन,**
**पुणे किंमत :१५०रु.**
**सवलतीच्या दरात १००रु.**

दिलीप धायगुडे
७७३८०३९१९५

# तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**ज्याकडे जे आहे तेच तो इतरांना वाटू अथवा देऊ शकतो. आनंद, शांती, शुभेच्छा, सन्मान, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी ही उपजत मानवी मुल्ये सृष्टीने विनामुल्य आपल्या पदरात टाकून दिली आहेत. परंतु, आमची माय म्हणायची, "देव आला द्यायला अन् पदर नाही घ्यायला" तसं देवानं फुकटचे दिलेले हे सर्वच गुण आपण वाटतांना का कंजुषपणा करत असू बरं? असे एक ना अनेक प्रश्न सतत मनाला पडत राहतात अन् ते तुकाराम या अवलिया माणसांसोबत चर्चा करत राहणे हा मोठा आनंददायी प्रवास आहे. अलीकडे अनेक महापुरुष नित्य माझ्या सोबत अगदी हातात हात घालून चालत असतात. माझ्याकडे सर्व महामानव नित्य वास्तव्याला आहेत. त्यांचा अखंड सहवास माझा क्षणक्षण आणि कणकण प्रज्वलित करत आहे. दुर्दैवाने अलीकडे ह्या माणसांची माणसे भेटच घेत नाहीत, हे मोठे आश्चर्य आहे!**

आनंद हा मानवाचा स्थायी भाव आहे. असे असतांना प्रमाद आणि अप्रमाद हा संघर्ष माणसाने स्वतः पाठीमागे लावून घेतला आहे. प्रमाद म्हणजे अहंकार, मगरूरी, गर्विष्ठपणा, उन्मत्तपणा, माजोरी वृत्ती, अनावधानता, हयगय आदि दोष! अप्रमाद हा या सर्वांच्या उलट. अप्रमाद म्हणजे शांत, सहकार्य वृत्ती, नम्रता, सावधानता इत्यादी मानवाच्या मूलगामी अवस्था सदैव हृदयात असणे म्हणजे अप्रमाद! मुलतः अप्रमाद मानवाचा महत्वपूर्ण गुणधर्म! संसारात त्रस्त, व्यस्त आणि ग्रस्त लोकांचे प्रमाण नेहमीच वाढलेले असतांना अप्रमादी वृत्ती आपल्याला सर्वकाळ सुखी, आनंदी ठेवू शकते. संबोधि महात्मा गौतम बुद्ध आपल्या भिक्षुंना धम्मपदात

**अप्पमादो अमतपदं पमादो मच्चुनो पदं।**
**अप्पमत्ता न मीयन्ति ये पमत्ता यथा मता || धम्मपद २.१**

असा उपदेश करतात. याचा अर्थ असा की, अप्रमाद म्हणजे सावधान असणे. हा खरा अमृताचा (अमरत्वाचा) मार्ग अथवा स्थान आहे. प्रमाद म्हणजे बेसावधपणा, हा मृत्यूचा मार्ग अथवा स्थान आहे. जे अप्रमत्त आहेत ते मरत नाहीत; जे प्रमत्त आहेत ते मृतवत्, जणू काय मृतच आहेत. प्रमाद किती मोठा शत्रू आहे( ?) याचे नाथ बाबा आपल्या भागवतात, "जेथ कामक्रोधांची जोडी । प्रमाद कोडी क्षणक्षणां।" आणि ज्ञानेश्वरीत माऊली, "हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु।" अशी महत्वपूर्ण वचणे लिहून आपल्याला नित्य जागे करण्याचे काम करत असतात. प्रमादाचे सोबती कोण कोण आहेत? काम, क्रोध, झुंज इत्यादी बाधा त्याच्या सोबतच आहेत. तेंव्हा अप्रमाद वृत्ती किती अनमोल आहे( ?) याची जाण आपण ठेवावीच लागेल, अन्यथा सर्वकाही जवळ असून सर्वकाळ रिकामा रिकामा! त्यासाठीच तर या महान लोकांचे चरित्र आणि त्यांच्या अनमोल शब्दांची पेरणी सातत्याने समाजमनात करत राहणे ही सर्वकाळ काळाची गरज आहे. अप्रमादि म्हणजेच निरपेक्ष जगणे हे सर्वांसाठी अत्यंत लाभकारी, गुणकारी औषधच! असे असले तरीही निष्फळ, बाष्कळ बडबड, चिंता करत राहणारा माणूस स्वतःमध्ये कशी उर्जा जतन करून ठेवू शकतो बरं? आपल्या नित्य नित्य अजरामर, लोकप्रवाही हरिपाठ या केवळ अठ्ठावीस अभंग असलेल्या ग्रंथात माऊली

**अनंत वाचाळ बरळती बरळ त्यां कैंचा दयाळ पावे हरी ||**
**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान सर्वांघटीं पूर्ण ऐक नांदे ||**
**(हरिपाठ ७)**

असा खडा सवाल उपस्थित करतात. हे कडवे प्रमाण (वचन) सर्वांनाच पाठ आहे. त्यातील एकेक शब्द अनमोल आहे. आपले शब्द वाया घालवणारे, व्यर्थ बरळणारे सर्वकाळ आनंदी कसे




राहतील? धर्म, पंथ अथवा कालखंड कोणताही असो, महान लोकांसमोर जन सामन्यांचे कल्याण हा एकमेव हेतू होता हे लक्षात येते. धम्मपद, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, हरिपाठ इत्यादी महान ग्रंथातील शब्दांचे सूक्ष्मपणे चिंतन केल्यानंतर आपल्या सहजच जे लक्षात यायचे ते आले आहे. आनादी काळापासून या महान विचारांची पेरणी अनेक महानुभाव करत आलेत आणि नित्यनेमाने आजही करत आहेत. संसार मोठा विस्मयकारी आहे. तो आकर्षितही करतो आणि दुरही ढकलतो! सोडावा वाटतो आणि सुटतही नाही. एखाद्याने सोडला तर तो दुसरीकडे नव्या पद्धतीचा आणखी एक संसारच उभा करतो. एकाने वानप्रस्थ स्वीकारला आणि दुसरीकडे जाऊन पसारा जमा केला तर एकाने सन्यास घेऊन दुसरीकडे मठ उभा केला. तिथेहि तीच माणसे, जी रोजच्या संसारात सोबत होती! आता काय करायचे? कुठे जायचे? मोठा गहन प्रश्न? मग नेमके करायचे काय? त्यासाठी माणसाला संसार सुटत नाही हे अंतिम सत्य! त्यासाठी आहे तिथेच राहून, त्याच माणसांबरोबर जुळवून घेतांना सद्विचार आणि महान लोकांच्या विचार-ग्रंथांची संगती आणि उच्च विचारांचे चिंतन करणे एवढेच नेमाने केल्यास संसारातील दुःखे कमी न होता ती सौम्य वाटायला लागतील. आज उन्हातून चालतांना रुमाल बांधने किंवा छत्री घेऊन चालले म्हणजे ऊन संपले असे नाही तर आपण आपले संरक्षण करून घेतले, बाहेर जेवढे ऊन पडायचे तेवढे पडणारच आहे! त्याची व्यर्थ चिंता करून आपले स्वास्थ्य बिघडू द्यायचे नाही. आत्ताच दोन आठवडे उन्हाळ्यात पावसाळा होऊन गेला. माणसं बदलली, निसर्गही बदलला. याचाही अनेकांनी ताण घेतला. हे थांबले पाहिजे. हे थांबणे म्हणजे आपल्यातील संत विचारांची झालेली पेरणी उगवणे होय. व्यर्थ शब्द, व्यर्थ चिंता करून आपल्यातील उर्जा खाली जाऊ न देता संतांची संगत करत राहणे एवढे काम आपण सहज करू शकतो. असा विचार करतांना विविध ग्रंथांचे वाचन सुरु असतांना तुकोबांच्या

**नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही दावा ॥१॥**
**महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ॥ध्रु.॥**
**येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ॥२॥**
**तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥३॥ (१२८३)**

अशा एकेक अभंगरचना वाचनात येतात आणि पुन्हा त्यावर लिहावेसे वाटते. माणूस हा मोठा गुंतागुंतीचा प्राणी आहे. कितीही खोल समुद्राचा तळ शोधता येऊ शकतो परंतु माणसाचा थांग लागणे अशक्य! क्षणाक्षणाला माणूस बदलत असतो. त्यासाठी तुकोबांचा हा अभंग अत्यंत महत्वपूर्ण आणि कळीचा आहे. प्रत्यक्ष जीवन जगतांना तुकोबांनी कुणाशीही संघर्षाचा पवित्रा घेतला नाही. रस्त्याने चालतांना, भजन करतांना, कीर्तन करतांना तुकोबांना प्रस्थापितांनी मारले, परंतु तुकोबांनी कुणालाही विरोध केला नाही, उलट त्या दुष्टांना क्षमा केली. तुकोबाराय अनेकदा आपल्या जीवनात आणि इथे अभंगात स्वतःकडे कमीपणा घेतांना आज आपल्याला पथदर्शी झाले आहेत. इथे तुकोबा नीचपण हे चांगले आहे आणि त्याचे अनंत फायदे आहेत हे पुन्हा पुन्हा पटवून देतात. इथे नीचपण म्हणजे लहानपण असा अर्थ होतो. नीचपण म्हणजे दुष्ट, वाईट, उपद्रवी, समाज विघातक असा अर्थ नाही हे लक्षात घ्यावे. लहानपण कधीही चांगलेच. एखाद्या कार्यालयाचा प्रमुख आणि सेवक यात जमीन अस्मानचे अंतर आहे. कार्यालयाच्या कारभाराला कार्यालय प्रमुख संपूर्ण जबाबदार असतांना नौकर मात्र केवळ हुकुमाचा ताबेदार! त्यासाठी तुकोबांना लहानपण आवडते. आमचे एक गुरुजी आहेत, त्यांना, "सर, तुम्ही प्राचार्य का झाला नाहीत?" असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "विठ्ठल, प्राचार्य होणे म्हणजे रोजचे आपले काम सांभाळून इतरांकडून काम करून घेतांना त्यांच्यात बळजबरीने बदल करणे मला जास्त त्रासदायक वाटते, म्हणून मी लेखक, कवी, समीक्षक झालो, प्राचार्य होऊन अनावश्यक सन्मान, मान आणि ताण वाढवून घेतला नाही." सरांचे हे उत्तर मोठे विचार करण्यासारखे आहे. त्याचे उत्तर तुकोबांच्या या अभंगात आहे. लहान माणसाकडून कुणीही दावा म्हणजे जबादारीची अपेक्षा करत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मी आमच्या घरात सर्वात लहान असल्यामुळे मला पटकन कधीही कोणती मोठी जबादारी मिळाली नाही. मी सर्वच बाबतीत मोकळाच राहिलो आणि आजही आहे! हा लहानपणाचा सर्वोत्तम फायदा! लहानपण म्हणजे नम्रपणा हा आणखी एक महत्वाचा अर्थ! विनम्रता माणसाला सर्वत्र सहजतेने प्रसारित करते. त्यासाठी तुकोबाराय, "महापुरे झाडे जाती" सारखे महान वचन लिहून जातात. सहजतेने तुकोबांचे हे वचन लोकमनात एक म्हण किंवा वाक्प्रचार म्हणून रुजले आहे. ही एका कवीची महानता आपण लक्षात घ्यायला हवी. नम्रपणा माणसाला कितीही मोठ्या संकटातून वाचवतो. महापुरात मोठमोठे वृक्ष उन्मळून पडतात, वाहून जातात तर दुसरीकडे लव्हाळ नावाचे नदीतील नम्र, वाकणारे गवत अजन्म नदीत कायम टिकून राहते. पूर आला की गवत वाकते, वाकले की पुराचे पाणी निघून जाते. पूर ओसरला की; गवत पुन्हा ताठ उभे राहते. विनम्रता माणसाला आपली मुळे मजबुतीने टिकवून ठेवायला सहाय्यभूत ठरते. शेवटी तुकोबाराय अत्यंत मोलाचा संदेश देऊन जातात. नम्रपणा म्हणजे आनंदी जीवन जगण्याची कळ म्हणजे किल्ली आहे! कितीही मोठा अपराध झाला आणि त्या अपराधाबद्दल जर विनम्रतेने पुढील व्यक्तीचे पाय धरल्यास त्या अपराधाला क्षमा मिळतेच मिळते. शरण आल्याला मरण दिले जात नाही हा मानवतेचा वैश्विक न्याय असून तो आजही तेवढ्याच प्रभावाने प्रचलित आहे. माय-बाप वाचकहो, तुकोबाराय का महान लेखक, कवी, कीर्तनकार होत होत एक अजरामर कवी झाले? याचे प्रमाण म्हणजे त्यांचे महान लोकप्रवाही अभंग! सहजतेने लिहतांना ते नित्य नित्य जागे आहेत. संसारात राहूनच आपल्या सहचर संसारीकांना ते मोठ्या ताकदीने मार्गदर्शक जागले ठरलेत. असे असले तरी वर्तमानात चित्र निराळे आहे. आज सर्वत्र तुकोबांवर भजन, कीर्तन जोरात सुरु आहे; परंतु तुकोबा आपल्या रोमारोमात उतरले नाहीत. त्यामुळेच सगळीकडे वारकरी सांप्रदायिक कार्यक्रमांची रेलचेल असतांना समाजातील व्यसन, भांडण, व्यर्थ चिंता कमी होतांना दिसत नाही. त्यासाठी कृतीशील विचाराची पेरणी होतांना बोलणे-लिहिण्याला आपण सर्वांनीच कृतीची जोड द्यावी! असे होणे म्हणजे तुकोबाराय, त्यांची जीवन नीती आपल्याही जीवनात उतरणे होय. जय तुकोबाराय!

# तू चाल पुढं ....



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

आधुनिक केसरी

**तुझ्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा तुलाच निर्माण करायच्या आहेत . रस्ता नसेलच चांगला कदाचित, पण त्याही रस्त्यावर ठामपणे उभे राहत आपल्या पाऊलखुणा उमटतील आणि त्याची दखल समाज घेईल यासाठी तुला संघर्ष करावा लागेल. घट्ट पाय रोवून उभं राहावं लागेल , आपल्या पाऊलखुणा उमटेपर्यंत. या संघर्षाची सुरुवात कदाचित घरापासूनच असेल . पण तू डगमगू नकोस , तू थांबू नकोस, तू हताश होऊ नकोस आणि निराशही होऊ नकोस. स्वतःला सिद्ध करण्यासाठी सगळ्यात पहिले तू स्वतःमध्ये तो आत्मविश्वास निर्माण कर की , मी हे जग जिंकू शकते . सांग स्वतःला की माझ्यात ती क्षमता आहे . स्वतःमध्ये असलेल्या प्रतिभेला ओळख.**

ही प्रतिभा जगासमोर येईल यासाठी मला काय करावं लागेल याचा विचार कर आणि सतत पुढे चालत राहा . एक गोष्ट कायम लक्षात ठेव जगाने कधीच अशा लोकांची दखल घेतली नाही जे सरळ मार्गाने सरधोपटपणे चालत गेलेत . तर प्रवाहाच्या विरुद्ध जाणाऱ्या लोकांनाच समाजाने डोक्यावर घेतलं , त्यांच्या प्रवाहाविरुद्ध चालण्याचीच तर लोकांनी दखल घेतलीय . आणि आज यशस्वी व्यक्तिमत्व म्हणून ज्यांची ज्यांची नावं आपल्याला माहिती आहेत अशा सगळ्यांचा प्रवास जेव्हा आपण पाहतो त्यामध्ये हे लक्षात येतं की , यांनी प्रवाहाच्या विरुद्धच प्रवास केलेला आहे . झाशीची राणी असो की अहिल्याबाई होळकर, आनंदीबाई जोशी असो की सावित्रीबाई फुले, कल्पना चावला असो की सुधा मूर्ती, सायना नेहवाल असो की मिताली राज. त्या काळातील सरोजिनी नायडू असोत की इंदिरा गांधी, यमुना विनायक सावरकर असोत की भगिनी निवेदिताअशी अनेक नाव तुला सांगता येतील की ज्यांनी प्रवाहाच्या विरुद्ध जात स्वतःमधील क्षमतांना जगाच्या समोर आणून उभं केलं आणि , जग आज त्यांच्या नावाची दखल घेते आणि त्यांच्या नावाचे उदाहरण समाजाच्या समोर ठेवत जाते . म्हणून जेव्हा जेव्हा प्रश्न निर्माण होईल की मी काय करू ? कसा निर्णय घेऊ ? तेव्हा तेव्हा अशी चरित्रात्मक पुस्तक वाच की ज्यातून एक नवीन प्रेरणा मिळेल , विचारांना नवी दिशा मिळेल , त्यातून एक आत्मविश्वास निर्माण होईल आणि पुढे जाण्यासाठी हिम्मत मिळत राहील. स्वार्थाने बरबटलेल्या आजच्या या जगात आत्मसन्मानाने जगण्याचा प्रयत्न कर. आपला स्वाभिमान कायम जागा राहील याची काळजी घे. कारण स्वाभिमान हा असा एक दागिना आहे ज्याची किंमत कधीच करता येत नाही. स्वाभिमानाने जगणारा माणूस हा ताठ मानेने जगत असतो आणि स्वाभिमानाने जगणारा माणूस प्रसंगी मीठ भाकरी खाऊनही आपलं आयुष्य काढत असतो. आपली जीभ आहे ना ही फार चव चाल आहे. या जिभेला एकदा का पुरणाच्या पोळीची सवय लागली ना की , म तिला मीठ भाकरीची चव लागत नाही असे एक वाक्य खूप पूर्वी वाचनात आलं होतं. त्यामुळे आपल्या जिभेला मीठ भाकरीची ही चव आवडेल आणि प्रसंगी फोडणीचं वरण आणि पिठलं खाऊनही दिवस काढावे लागलेत ना तरी चालेल .पण , आपला स्वाभिमान गहाण ठेवून लाचारीने जीवन जगण्यापेक्षा चार पावलं संघर्ष करायची तयारी ठेव . तरच तुझे अस्तित्व या जगामध्ये लोकांना कळेल . तू स्त्री आहे म्हणून घाबरून जाऊ नकोस . तू महिला आहे म्हणून मागे राहू नकोस . तर स्त्री ही सृजनाची निर्मिती करणारी आणि अफाट क्षमता असणारी, एवढेच नव्हे तर मरणकळा सोसूनही प्रसंगी नवनिर्मिती करणारी ही स्त्री आहे . ही तुझी खरी क्षमता आहे हे कायम लक्षत ठेव . पण आजच सगळं वातावरण असं आहे की ही स्त्री पुढे गेलेली कोणालाच आवडत नाही . आपल्यापेक्षा सुंदर, आपल्यापेक्षा जास्त शिक्षित आणि आपल्यापेक्षा जास्त यशस्वी होत चाललेल्या स्त्रीला तिच्या घरूनच बरेचदा नको त्या प्रसंगांना, नको त्या शब्दांना, नको त्या टीकेला सामोरं जावं लागतं. एवढेच नव्हे तर प्रसंगी तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तीच मानसिक दृष्ट्या खच्चीकरणही करण्याचा प्रयत्न केला जातो . पण लक्षात ठेव तू जननी आहेस सृजनाची , तू क्षमता आहेस निर्मितीची , तू असुरांचा नाश करणारी आहेस, तू सरस्वती, तू शारदा नि प्रसंगी तूच दुर्गाही आहेस . अशी ही सर्वशक्तिमान तु स्त्री आहेस..... मातृ



शक्ती आहेस तू , या राष्ट्र कार्याच्या यज्ञामधील तू समिधा आहेस..... धगधगत्या अग्नीला ताब्यात ठेऊन स्वयंपाक करून तृप्त करणारी अन्नपूर्णा आहेस तू. एक स्त्री म्हणून अबला होऊन राहू नकोस तर, प्रसंगी दुर्गा होऊन असुरांचाही नाश करून समोर ये. या भारतमाते ला आज तुझी गरज आहे, या समाजाला आज तुझी गरज आहे, गरज आहे आजच्या कार्पोरेट सेक्टर ला नि अंतरीक्षालाही आज तुझ्याच कार्यकर्तृत्वाची गरज आहे. यासाठी प्रसंगी हातात विना घे किंवा संगणक पण, स्वतःमधील क्षमता गमावून न बसता, हतबल न होता तुला या समाजातील वाईट बाबींविरुद्ध, समाजातील वाईट, प्रवृत्ती विरुद्ध, वाईट माणसानंविरुद्ध लढायला उभं राहावं लागेल. कधी पत्नी असूनही, तर कधी प्रसंगी आई असूनही कठोर निर्णय घेण्याची तयारी तुला ठेवावी लागेल, प्रसंगोचित कधी कडक बहीण तर कधी निर्भीड मुलगी बनून उभं ठाकाव लागेल. तू आई, तू बहीण, तू पत्नी, तू मैत्रीण, तू प्रेयसी, तू सखी होऊन हे जग चालवते आहेस. तू सावरकरांच्या पाठीमागे उभी राहणारी यमुना आहेस, तू शिवाजी ला घडविणारी जिजाऊ आहेस, तू फुल्यांच्या मागे उभी राहिलेली सावित्री आहेस, तर आंबेडकरांच्या मागे उभी राहणारी रमा आहेस, तू सातासमुद्रापार जाणारी आनंदीबाई आहेस हे पुन्हा एकदा लक्षात ठेव आणि हे सगळं लक्षात ठेवूनच तू चाल पुढं सखी, तू चाल पुढं....

# जैसे कर्म केले तैसे फळाशी आलें | उपजले मेले ऐसें किती ||



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवन जगत असताना प्रत्येकालाच सुखदुःखांचा चढउतार जाणवत असतो. प्रत्येक जन्माला आलेल्या जीवाला या सुखदुःखांच्या फेऱ्यातून जावंच लागतं. परंतु ज्या जीवन चक्रात मी अडकत चाललो आहे, ते माझ्याच कर्माचे फलित आहे, हे मात्र अंगात रग आहे, हात पाय- सर्व इंद्रिय धड धाकट आहे तोपर्यंत कोणालाच याची जाणीव होत नाही. जीवन प्रवासात शेवटच्या वळणावर उभे राहिले की मग आठवतो तो बालपण, तरुणपण, प्रौढ पणातील अट्टाहासाने, स्व-इच्छेने, मनाचा मार्गाने केलेला उन्मत्त जीवन प्रवास. असा प्रवास की त्या प्रवासात थांबणं, समजून घेणं, आपल्या हितासाठी राबणाऱ्या हातांची जाणीव असणं ह्या सर्व गोष्टींचा सोयीस्कर विसर पडला होता. कळत असूनही वळलं मात्र कधीच नाही.**

म्हणून मी जन्माला आल्यापासून ते आतापर्यंत जे जे माझ्या वाट्याला आले ते ते सर्व क्षण मग ते सुखाचे असो की दुःखाचे ते सर्व माझ्याच कर्माचे फलित आहे हे मान्यच करावे लागेल. कारण संपूर्ण चराचरसृष्टीत मला दुःख द्यायला किंवा सुख द्यायला कोणीही समर्थ नाही. अगदी भगवंत सुद्धा नाही. भगवंत सुद्धा म्हणतो हे "मजिस्तव झाले परि म्या नाही केले, ऐसे जेणे जाणितले तो सुटला गा" याचाच अर्थ असा की भगवंत तत्त्व रूपाने प्रत्येक जीवात असल्याने जीवसृष्टी चालू असते. परंतु जीव जे कर्म करतो त्या कर्मापासून भगवंत अलिप्त राहतो, म्हणून प्रत्येक जीवाने खऱ्या सद्गुरूंना शरण जायचं आहे. विश्वाच्या बाजारात अनेक ढोंगी लोकांनी स्वतः चा बाजार मांडला आहे. आपल्याला कळतही असतं की हा फसवा आहे, पण अडचणींच्या महापुरात, आनंदाचे क्षण, आधाराचे स्थान, आपुलकीचे शब्द यामागे धावताना फसगत होते व देह भावनेने वरच्या अंगाने, रंगा रूपाला, थाटामाटालाच आपण भुलतो आणि शरण जातो. त्यामुळे आपण आपल्या जीवाची सुटका करून घेण्यापेक्षा अधिक कर्मकांडात अडकत जातो.जसे जप तप, उपासतापास, खेट्या, पारायणे यामध्ये अडकत जातो. परंतु खरे सद्गुरु आहेत ते या उलट असतात. ते या सगळ्या रहाटगाड्यातून बाहेर काढून मी कोण आहे? जगत काय आहे? अध्यात्म काय आहे? ईश्वर कोण आहे? याची ओळख करून देतात. मी जन्माला का आलो आहे?... आणि येऊ नये पण आलो आहे तर मग मी नेमकं काय करायला हवं? कसं जगायला हवं? याची ओळख सद्गुरु करून देतात. मी इतरांना जगण्या वागण्याचा उपदेश करण्यापेक्षा मी स्वतः सगळ्या गोष्टी आचरणात आणायला हव्यात. ढोंगी बाबा फक्त वैखरी वाणीने उपदेश करतात, दिसण्याचा राहण्याचा थाटमाट करतात. परंतु खरे संत कृतीतून जगण्या वागण्याचा मार्ग प्रकाशित करतात. यासाठी संत म्हणतात," मुख हलेना कंठ हलेना जिवा न सुमरे राम, राम हमारा जप करे, हम बैठे आराम". या तत्त्व रुपी रामाची ओळख करून देणारे खरे संत सद्गुरु होय. यासाठी मानवी जिवाने परमार्थाच्या मार्गाने जायला हवं. परेच्या पलीकडचा जो बोध काय आहे तो समजून घ्यायला हवा. कारण मन, बुद्धी, इंद्रिय, देह यांच्यामुळेच कर्मे घडतात व जिथे मन, बुद्धी, इंद्रिय, देह यांचा लय होईल तोच प्रबोध म्हणजे परेच्या पलीकडचा बोध होय. प्रबोध होण्यासाठी, हातून चांगली कर्म होण्यासाठी प्रत्येक गोष्ट प्रयत्नपूर्वक सहज सुलभ पणे करायला हवी. आपल्या हातून जी कर्मे घडतात त्याचं चिंतन- म्हणन करून त्या प्रत्येक गोष्टीतून आपण शिकत रहावं. कारण परमार्थत थांबायला शिकवतात व व्यवहारात चालायला शिकवतात. कारण व्यवहारात चालताना ज्यांना दिसणाऱ्या स्थूल गोष्टी उत्तम करता येतात, तेच परमार्थात न दिसणाऱ्या सूक्ष्म गोष्टी उत्तम करतात. तेव्हाच आपल्याकडे चर्मदृष्टी जाऊन समत्व दृष्टी येऊ शकते. म्हणजेच व्यवहार आणि परमार्थ या दोन्ही गोष्टी वेगळ्या नसून एकच आहे ही समत्वदृष्टी तयार होते. तेव्हा संत सांगतात," हे नरा, आत बघ जरा, जीव हा खरा, नव्हे ही माया, तू बुद्धी, दर्पणी, ब्रह्म रवीची छाया". सर्व कर्मे आणि परमार्थ हा मुळातच अंतरंगाचाच विषय आहे. बाह्य अंगाचा विषय नाही. उदा.भूक तहान आतून लागते, म्हणून अन्न सुद्धा आत मध्येच घेतो. वरती देहाला चोळून पोट भरत नाही. तसेच देवदर्शनाला गेल्यानंतर आपण उघड्या डोळ्यांनी देव पाहतच नाही, देवासमोर उभे राहिलो की आपोआपच आपले डोळे बंद होतात, म्हणजेच तो प्रत्येक जीवात स्वरूप स्थितीमध्ये तोच तो वास करतो आहे. यालाच संत म्हणतात, "काहो हिंडता रानोरानी, पुसा संतांसी जाऊनी, थोर संतांचा महिमा, आला बहुतांच्या कामा" . आपली जशी संगत असणार आहे तशीच कर्मयोगाने पंगत लाभणार आहे. संगत करे साधू की तो हो जाये दो दो बात, संगत करे गधे की तो मिल जाये दो दो लाथ" अगदी तद्वतच तत्त्वाने देहाचा संग केला की जरा आणि मृत्यू,



संत साहित्यातील तत्वज्ञान : भाग-५

प्राणाशी संग केला की भूक तहान, मनाशी संग केला की शोक भय आहेच आहे. देह, प्राण, मन यांपासून तत्व अलिप्त राहिले की आपण स्वर्गातच आहोत. या तिन्हीशी संग झाला की नरकयातना ठरलेल्या आहेतच आहे. म्हणून जो पूर्ण आहे त्याचा संग करायला हवा, देह अपूर्ण आहे आणि भगवंत पूर्ण आहे. म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात, "आम्हा एकांताचा वास, नाही गुणदोष अंगा येती." त्यासाठी नम्र व्हायला हवं, विचार अधिक सूक्ष्म व्हायला हवेत, म्हणजे देह म्हणजे मी नाही, मन- बुद्धी -चित्त- अहंकार म्हणजे मी नाही, मी या सर्वांना प्रकाशित करणारा असा आहे. मी जन्मालाही येत नाही, आणि मी मरतही नाही, असा जो मी आहे, तो तत्त्वाचा /भगवंत स्वरूप मी आहे. त्या एकाला जाणायला हवे. तेव्हाच जीव कर्म करून निष्कर्ष स्थितीत राहतो. केलेल्या कोणत्याच कर्माची बाधा जीवाला होत नाही. यालाच संत म्हणतात, "निर्गुणी येणे निराकारी जाणे, सदा माझे राहणे निरंजनी". जीवन जगत असताना संदेह, भ्रम येणार आहे, पण आलेला संदेह, झालेला भ्रम कळायला पाहिजे. त्यासाठी आपलं लक्ष स्थिर गोष्टींकडे म्हणजेच तत्त्वाकडे असायला हवे. आपण अस्थिर मन, अस्थिर जगत यांच्याकडे चर्मदृष्टीने पाहतो आणि आपणही अस्थिर होतो. यासाठी बुद्धीचा शार्पनेस वाढायला हवा. तेव्हाच बुद्धी परिपक्व होईल आणि बुद्धिपरिपक्व झाली की भय, चिंता कमी होतील. 'जो करेल तोच खाईल' हा विश्वास दृढ होऊ लागतो. जसं पाणी असलं तरच शेवाळ निर्माण होणार आहे. तसं तत्त्वरूपी भगवंत असेल तरच कर्मे घडणार आहेत. आपण फक्त सावध व्हायचं आहे, कारण माझ्या कर्माचे भोग हे मलाच भोगायला लागणार आहे याची जाणीव ठेवून वर्तन झाले तरच जीवन प्रवासातील खूप मोठे अडथळे दूर होणार आहेत. तेव्हा संत गोरा कुंभार म्हणतात त्याप्रमाणे, "घटाघटांचे रूप आगळे, प्रत्येकाचे दैव वेगळे, तुझ्याविना ते कोणा न कळे, मुखी कुणाच्या पडते लोणी, कुणा मुखी अंगार, तूच घडविशी, तूच फोडशी, कुरवाळीशी तू, तूच तोडीशी, न कळे यातून काय जोडीसी, देसी डोळे, परी निर्मिसी तयापुढे अंधार" म्हणूनच करता करविता तो एक भगवंत च आहे त्याला स्मरून कर्मे करत राहिले तर मोक्षाचा प्रवास सुरु होतो. जीवन प्रवासात मानवी मनाला फक्त घेणं, अपेक्षा ठेवणं एवढंच माहीत आहे, परंतु दाता बनलं तर कोणत्याच पद्धतीचं ऋण राहणार नाही व सतत जन्माला येऊन नरक यातनाही भोगाव्या लागणार नाहीत. म्हणून जीवन जगत असताना प्रत्येकाने जीवनात सरळ, सहज, आनंदी राहावं, म्हणजेच येणारा जाणारा श्वास सहज आहे त्यात आनंद आहे. प्राणायाम -योग साधना यांचा अट्टाहास आहे त्यामुळे तो अधिक काळ व सातत्याने केले जात नाही. त्यामुळेच मनावरील ताण वाढतो, सुखी जीव दुःख भोगतो. मनाचा स्वभाव आहे स्पर्धा करणं, तेव्हा आपण इतरांशी स्पर्धा न करता स्वतःची स्पर्धा करावी.म्हणजेच इतरांच्या कर्माची बाधा आपल्याला होणार नाही. साधुसंत आपल्याला शास्त्रातून मार्गदर्शन करतात, परंतु ते आचरणात स्वतःलाच आणायचं असतं, म्हणून प्रत्येक गोष्ट करताना समजून-उमजून करायला हवी. कारण अविचाराने फक्त दुःखच पदरी पडते, याला संत म्हणतात, "विचारूनही अहंकार सांडीजे, मग अस्तीच वस्तू होईजे", विचारपूर्वक व जाणीव ठेवून वर्तन केले तर तो सुखाचा सागर असणारा भगवंत सोबत आहेच आहे, "याच सुखा कारणे देव वेडावला वैकुंठ सोडूनी संत सदनी आला," या देहरुपी दुबळीचा सोहळा करण्यासाठी भगवंताने देहात प्रवेश रहित प्रवेश केला आहे.प्रवेश रहित प्रवेश म्हणजेच, जसे आपण आरश्यात पाहिले की आपले पतिबिंब जसे आरश्यात दिसते, बाजूला झाले की ते लगेच त्याच क्षणी नाहीसे देखील होते. त्यावेळी आपण जसे आरश्याच्या आत जात नाही तरीही दिसतो अगदी त्याचप्रमाणे भगवंतांने या देहात प्रवेश केला आहे. म्हणून या संधीचे सोने करून कर्म चांगली करायला हवी. कर्माचा सिद्धांत मनावर पक्का बिंबवला तर अकर्मे हातून घडणार नाही, सुखरूप असणारा जीव दुःख भोगणार नाही. तेव्हा संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात त्याप्रमाणे, "जैसे कर्म केले तसे फळाशी आले | उपजले मेले ऐसे किती ||"

# कर्म आपला उत्तराधिकारी स्वत: निर्धारित करत असते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जसं कर्म तसं फळ असतं जीवन म्हटलं कि कर्म करावाच लगत त्याला पर्याय नसतो.पण कर्म करताना निती धर्म,पाळला गेला तर सात्विक कर्म घडत आणि हेच सात्विक कर्म आपल्या जीवनाच उत्थान घडवत म्हणून जीवन उत्थान होण्यासाठी अहोरात्र जागृत राहून सात्विक कर्म केले पाहिजे. जेणेकरून निसर्ग सुद्धा आपलं काही बिघडवु शकणार नाही. आत्मा अमर असुन शरिर नश्वर आहे पंचमहाभूतांचे शरीर हे एक दिवस विसर्जित करण क्रमप्राप्त असत.पण यापैकी काहिच आपल्या अधिपत्याखाली घडत नाही हे विशेष मग नश्वर शरिर असताना देखिल आपण जीवनात कशा पद्धतीने आचरण करतो हे विचार कारयला नक्कीचभाग पाडणार आहे.**

आपल्या मुळे कोणत्याही जीवाला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही आणि जीवनातील जीवन आवश्यक बाबीचीं साठवण करताना निती धर्म साक्षीदार म्हणून असला पाहिजे.मानवी जीवन हे अनेक इच्छा अपेक्षांचे माहेर घर असले तरी सुद्धा आपण आपलं मन सदैव ज्ञान सदृश ठेवलं पाहिजे जेणेकरून आपल्या कडुन कोणत्याही प्रकारचे चुकीचे कर्म घडणार नाही.जसं कर्म तसं फळ हा निसर्गाचा नियम आहे.पण कर्म करताना हे कळत नाही हेच सगळ्यात मोठं मानवी जीवनातील दुर्दैव आहे. कर्मफळाला कोणीही अपवाद नाही. निसर्गाचा नियम कोणालाही बदलता येत नाही.महणुन आपल कर्म हे सात्विक असलं पाहिजे.सत्य निष्ठा आणि सात्विक कर्म असेल तर जेव्हा कर्मफळ मिळेल अथवा कर्म आपला उत्तराधिकारी आपल्याला ठरवेल तेव्हा आपल्याला फार मोठ्या अडचणी उद्भवणार नाहीत. आणि पश्चात्ताप पण करण्याची आवश्यकता पडणार नाही.सृष्टी वर अतोनात धन द्रव्य संपत्ती मिळवली तरी या पैकी काही सोबत घेऊन जाता येत नाही हे वास्तव आहे पण आपण केलेलं कर्म आपल्या सोबत येत . संसारातील सर्व बाबांनी अनुषंगीक वारसदार ठरलेले असतात.फक्त आपण केलेलं जे कर्म आहे त्याच वारसादर हे आपण स्वतःलाच व्हावं लागतं.या मध्ये इतर कोणीही वारसदार अथवा वारसाहक्काने कर्माचा वारसदार होता येतं नाही.महणुन आपलं दैनंदिन नित्य कर्म हे खुप विचार पुर्वक काळजीने केलं पाहिजे.कर्म आपला उत्तराधिकारी स्वतः निवडत असतं.आपण जसं कर्म करू तसं फळ हे निश्चित योग्य वेळी आपल्या पदरी पडत असत. फक्त मध्ये काही कालावधी असतो हा कालावधी बदला कि मग मात्र कर्म फळ आपलं रूप दाखवत या मध्ये कोणतीही शक्ति अथवा ताकद बदल करू शकत नाही.फक्त थोडा वेळ उसंत मिळते कितीही मोठा बलवान,धनवान, शक्तिवान,शक्तिशाली, सामर्थ्यवान असला तरी त्याला कर्म फळातुन सुट मिळत नाही.योग्य वेळी कर्म कोणालाही सोडत नाही. हे वास्तव आहे ते मान्य करणं अथवा न करणं हे आपल्या ज्ञान क्षमतेवर अवलंबून असते.आपण कर्म करताना आपल्या कर्माला नितिचा आधार ठेवलाच पाहिजे.निसर्ग योग्य वेळी सव्याज वसुल करतो.याची जाणीव ठेवून आचरण केल पाहिजे.आपली वसुली होऊ देयची नसेल तर आपला व्यवहार अगदी सात्विक ठेवला पाहिजे.दैनंदिन जीवनात आपण आपलं विहित कर्म करताना अंत्यंत काळजी घेण गरजेचं आहे कारण आपण जमवलेल्या संपत्तीला कोणीही वारसदार लाभु शकत.आपण मिळवलेली संपत्ती अथवा पिढ्या न पिढ्या चालत आलेली आपल्या वाट्याची संपत्ती वाटपावेळी ती आपण कोणालाही देऊ शकतो तो आपला अधिकार आहे. महणजे आपल्या संपत्तीचे वारसदार आपण ठरवू शकतो तो आपला अधिकार आहे.पण कर्माचे उत्तर अधिकारी म्हणून फक्त आपण स्वतःच असतो . कर्म फल कोणीही टाळू शकत नाही.ज्ञान आणि अज्ञान ह्या जीवनाच्या दोन बाजू आहेत ज्ञान असेल तर सगळं व्यवस्थित होत अज्ञान अवस्थेत अनेक गडबडीत होतात चुका होतात त्याचे परिणाम देखिल आपल्याला मोजावे लागतात पण या सगळ्या मध्ये मिळालेला जन्म सार्थकी लागला पाहिजे शरिराचे नाही तर आत्म्याचे कल्याण झाले पाहिजे हि जाणीव असेल तर मग आपलं प्रत्येक कर्म निसर्गाच्या नियमानुसार निती नुसार घडत या मध्ये शंका नाही. मुळात जीवनाचा उद्देश समजणं गरजेचं आहे उदेश समजला तर योग्य उचित आणि सात्विक कर्म आपल्या हातुन नक्कीच घडल्या शिवाय राहणार नाही.

# राज्यात लव्ह जिहादविरोधी कायदा लागू करावा


आधुनिक केसरी



मुंबईतील एकामागोमाग एक उघड होणाऱ्या लव्ह जिहादच्या घटना मन विषिन्न करत आहेत. केवळ मुंबईतच नव्हे तर राज्यासह देशातील अनेक भागांत हे रॅकेट सर्रासपणे सुरु आहे. या षड्यंत्राची भयावहता दर्शवणारा केरला स्टोरीज नावाचा चित्रपटही मध्यंतरी येऊन गेला तरीही हिंदू मुली आज जिहाद्यांच्या फसवणुकीला बळी पडत आहेत. स्वतःची ओळख लपवून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढणे, त्यांच्याशी जवळीक साधून त्यांचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडीओ बनववणे त्यांना ब्लॅकमेल करणे, त्यांच्याशी निकाह करण्यासाठी त्यांचे धर्मपरिवर्तन करणे, त्यांचा उपभोग घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडणे, त्यांना देहविक्रय करण्यास भाग पाडणे, त्यांच्यापासून झालेल्या अपत्यांची विक्री करणे, लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींची आखाती देशांत विक्री करणे आदी असंख्य प्रकार लव्ह जिहादच्या माध्यमातून घडत असल्याचे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. हिंदूंच्या वंशविच्छेदावर उठलेल्या या षड्यंत्राविरोधात कठोर कायदा करण्यात यावा अशी मागणी आज अनेक संघटनांकडून आणि पक्षांकडून केली जात आहे. राज्याच्या सत्तेत दोन हिंदुत्ववादी विचारसरणीचे पक्ष बहुमतात असताना या कायद्याला विलंब तरी का होत आहे ? पोटच्या मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपावे, तिला शिकवावे, तिचे सर्व हट्ट पुरवावे आणि वयात आल्यावर तिच्यासाठी सुयोग्य वर शोधून तिचे कन्यादान करावे अशी प्रत्येक आई वडिलांची माफक इच्छा असते. अशी लाडाप्रेमाने वाढवलेली मुलगी कोणाच्या तरी फसव्या प्रलोभनांना फसते आणि आई वडिलांना झुगारून धर्मपरिवर्तन करते हे कोणत्याही आई वडिलांच्या काळजावर घाव करणारेच आहे. मुलीने स्वतःच्या मनाने निवडलेला जोडीदार तिला सुखाने नांदवणारा आहे हे कळल्यावर पालकांचा राग उणावतोही; मात्र आपली लाडकी मुलगी एका जिहादी संकटाला बळी पडली असून तिच्या आयुष्याची पुरती फरफट झाल्याचे ऐकून त्या आईबापाचे हृदय किती पिळवटून निघत असेल याचा विचार कोणी केला आहे का ? आजतागायत अशा लाखो मुली या षडयंत्राला बळी पडल्या आहेत. गेल्या काही दिवसांत उघड होणाऱ्या घटनांमधून हे षडयंत्र आता भयावह स्वरूप धारण करत असल्याचे दिसत आहे. या पीडित मुलींच्या आणि त्यांच्या आई वडिलांच्या वेदनांकडे सरकार लक्ष देणार आहे की नाही ? मुलींच्या उठलेले लव्ह जिहादविरोधी कायदा राज्यात प्राधान्याने लागू करावा !

नरेश घरत,
चेंबूर

# राजर्षी शाहू महाराज: विषमतेविरुद्धचा आदर्श शासक



भीमराव सरवदे
संपर्क : ९४०५४६६४४१

आधुनिक केसरी

**राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केवळ २८ वर्षाच्या कारकिर्दीत शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणली. भारताला लोकशाही स्वराज्य तर हवेच होते; परंतु त्याआधी ते उपभोगण्यासाठी व राबविण्यासाठी प्रथम जनतेत पात्रता आली पाहिजे ही त्यांची भूमिका रास्तच होती. त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे या उद्देशाने प्रेरित होऊन खास करून वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक कार्याकडे प्रकर्षाने लक्ष घातले. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य मोठया प्रमाणावर हाती घेतले. म्हणून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ असे योग्य वर्णन केले असून महाराजांचा वाढदिवस सणासारखा साजरा करावा असे जनतेला त्यांनी आवाहवन केले होते.**

२६ जून १८७४ रोजी जन्मलेले कोल्हापूरचे थोर राजे राजर्षी शाहू महाराज हे १८९४ ते १९२२ या कालखंडात कोल्हापूर संस्थानचे राजे होते. एक आदर्श शासक, पुरोगामी नेता आणि दूरदृष्टी असलेले समाजसुधारक कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे कुटुंबात जन्मलेल्या शाहू महाराजांना यशवंतराव हे नाव देण्यात आले होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर यशवंतराव यांना बालवयातच राजाच्या विधवा आनंदीबाई यांनी दत्तक घेतले आणि त्यानंतर १८९४ मध्ये त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. राजर्षी शाहू महाराज यांनी सत्ता ग्रहण केली तेव्हा महात्मा ज्योतिबा फुले यांचा सत्यशोधक समाज कार्य करीत होता. हा समाज कनिष्ठ वर्ग, कामगार आणि शेतकरी यांच्यात सुधारणेसाठी कार्य करीत होता. न्याय व समता याविषयी प्रबोधन करीत होता. सार्वत्रिक शिक्षण, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व याविषयी जागृती करीत होता. या समाजाची उद्दिष्टे महिलांना सामाजिक अन्यायापासून मुक्त करणे तसेच कामगार व शेतकरी यांना पुरोहितवर्ग आणि नोकरशाही यांच्या दडपशाहीपासून मुक्त करणे हे होते. १८७३ मध्ये महात्मा फुले यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजाची वैशिष्टये म्हणजे ब्राम्हणी व्यवस्थेला विरोध करणे, बहुजन समाजात शैक्षणिक सुधारणा करणे, शुद्रांची गुलामगिरीतून मुक्तता करणे, धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे इत्यादी होती. एके दिवशी पंचगंगेवर शाहू महाराज स्नान करत असताना स्नानाच्या वेळेस मंत्र म्हणणाऱ्या नारायण भटाने पुराणोक्त मंत्र म्हणण्यास सुरुवात केली, ही गोष्ट तसेच नारायण भटाने स्नान केले नव्हते ही गोष्टही महाराजांच्या नजरेस आणून दिली. महाराजांनी नारायण भटास वेदोक्त मंत्र म्हणण्यास सांगितले. नारायण भटाने मात्र महाराज शुद्र आहेत असे स्पष्ट सांगत मंत्र म्हणण्यास नकार दिला. नारायण भट पुढे म्हणाले, धर्मानुसार ब्राह्मण श्रेष्ठ असतात आणि सर्व शक्तिमान ब्राह्मण समाज तुम्ही क्षत्रिय आहात हे जाहीर करेपर्यंत तुम्ही आमच्यासाठी शुद्रच आहात. नारायण भटाच्या या उद्धट वर्तनाने महाराज प्रचंड अस्वस्थ झाले होते. या कटू अनुभवामुळे राजर्षी शाहू महाराज ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध प्रचंड ताकदीने उभे राहिले. वेदोक्त प्रकरण हे केवळ शाहू महाराजांच्या जीवनातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक जीवनावर परिणाम करणारी एक महत्त्वाची घटना होती. टिळक पंथीय ब्राम्हण वर्गाने केलेल्या टिकेमुळे राजर्षी शाहू महाराज सत्यशोधक समाजाकडे ओढले गेले आणि या प्रकरणामध्ये त्यांची बाजू सत्यशोधक समाजाने उचलून धरली.

सत्यशोधक समाजाने वर्णव्यवस्थेच्या विरूद्ध चालविलेल्या लढ्याविषयी त्यांना आदर होता. त्यातूनच त्यांच्या वैचारिकतेची जडणघडण झालेली दिसून येते. त्यांनी सत्यशोधक समाज समजून घेतल्यानंतर त्यानुसारच कृती करण्यास सुरूवात केली. त्यांचे देव आणि भक्त या दोघांच्यामध्ये पुरोहित, दलाल नको याविषयी दोघांचेही मत एकच होते. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील ब्राम्हणी मक्तेदारी मोडून काढणे, जातीभेद निर्मूलन करणे, अस्पृश्यांचा उद्धार करणे, शिक्षणाचा प्रसार करणे यासाठी महाराजांनी प्रसंगी कठोर भूमिका घेतली होती. अर्थातच हे काम सत्यशोधक समाजाचे होते, म्हणूनच सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते शाहू महाराजांची वेदनिष्ठा व मूर्तीपूजा मान्य करुनही त्यांना सत्यशोधक मानत होते. यात महाराजांच्या कार्याचे वास्तव मूल्यमापन होते. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी सत्यशोधक समाजाच्या प्रसाराची गरज शाहू महाराजांना वाटत होती. शाहू महाराजांचा जागतिक परिस्थितीचा व युरोपीय वर्गलढ्याचा सखोल अभ्यास होता. युरोपियन कामगारांनी संघर्ष करून मिळवलेल्या अधिकारांची त्यांना जाणीव होती. शोषित, वंचितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची संधी प्राप्त करून देणे हे त्यांनी आपल्या आयुष्याचे मिशन बनविले होते. गिरणीतील कामगारवर्ग हाही शोषितच होता. तेव्हा या वर्गाला वगळून वंचितांचा व उपेक्षितांचा विकास होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणून कामगारांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यास त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. ब्रिटिश काळात भारतात समानतेचे व उदारमतवादाचे तत्त्व राबविण्यात आले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी समतेचा नवा संदेश भारतीयांच्या घरोघरी पोहचवला, असे शाहू महाराजांना वाटत होते. सर्वांना समान शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी कृतिशील प्रयत्न केले होते. महात्मा फुल्यांनी सामाजिक विषमता आणि जातीभेद यांना मूठमाती देऊन समता, बंधुभाव आणि स्वातंत्र्य या त्रिसूत्रीवर नवसमाजाची निर्मिती करून सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून अस्पृश्यांची मुक्तता फक्त शिक्षणच करू शकेल, असा विश्वास त्यांना वाटत होता. त्यांनी अंगिकारलेला हा मार्ग प्रशस्त करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला. सत्यशोधक समाजाच्या धोरणातील आपल्या विवेकबुद्धीला पटतील त्या चांगल्या गोष्टी स्वीकारून त्यांनी आपल्या विचारांचे अधिष्ठान निश्चित केले होते. त्यामध्ये सर्वांगीण धर्मसुधारणा घडवून आणणे, धर्माला सार्वत्रिक नीतीचे अधिष्ठान देऊन पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट करणे, सर्वसामान्यापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविणे, त्यासाठी प्राथमिक व मोफत शिक्षणाचा आग्रह धरणे, मागास जातींच्या जातीनिहाय चळवळी बांधणे, त्यांच्यामध्ये लोकशाहीची आस निर्माण करणे, त्यांची अस्मिता जागृत करणे, ब्राह्मणेतरांचे पक्ष स्थापून समाजसुधारणा व शेतीसुधारणा याचा आग्रह धरणे यासाठी इंग्रज सरकारची मदत घेणे, शाहू महाराजांनी आपल्या या विचारधारेच्या आधारावर विसाव्या शतकाच्या



पूर्वाधात राजकीय व सामाजिक जीवनात क्रांती घडवून आणली. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर अस्पृश्य-दलित समाजाच्या दारापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे त्यांचे कार्य शाहू महाराजांनी केले. सन १९१८ पासून राजर्षी शाहू महाराजांचे कार्य सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेत्तर प्रश्नांची चळवळ, अस्पृश्योद्धार चळवळ इत्यादींसाठी त्यांनी एकामागून एक क्रांतिकारी पावले उचलून अस्पृश्य समाजास युगानुयुगाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी अविरत कष्ट घेतले. ब्राम्हणेत्तर चळवळीची बीजे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतच अंकुरलेली दिसून येतात. ब्राम्हण पुरोहितशाहीविरूद्ध बंड करणारी ही महाराष्ट्रातील पहिली चळवळ असून सत्यशोधक चळवळीच्या पुनरूज्जीवनातून ब्राम्हणेत्तर चळवळीचा पाया शाहू महाराजांनी मजबूत केला व वेदोक्त प्रकरणातून त्याला लढाऊ स्वरूप दिले. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील मागासलेल्या जाती-जमातीच्या लोकांसाठी ५० टक्के राखीव जागा ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेऊन तो प्रत्यक्ष राबविण्यास सुरूवात केली. राखीव जागाचा जाहिरनामा काढणारा हा पहिला दूरदृष्टीचा राजा होता. ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी या पुढारलेल्या जातींव्यतिरिक्त इतर सर्व जातींना राखीव जागा देण्यात आल्या होत्या. शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीतील काही लोकांना वकिलीच्या सनदा दिल्या होत्या, त्या विरोधात उच्चवर्णीयांनी चांगलाच कांगावा केला होता. त्या संदर्भात बोलताना शाहू महाराज म्हणतात, महार, मांग वगैरे हलक्या मानलेल्या जातींना मी वकिलीच्या सनदा देतो, या योगाने उच्चवर्णीय लोकांचा अपमान होतो असे काही बड्या लोकास वाटते; पण ही त्यांची चूक आहे. विद्या घेऊन दोन तपे थांबून नंतर समाज बरोबरीचे हक्क देईल किंवा नाही या विचारात बुचकळ्या खात पडण्यापेक्षा त्यास एकदम दास्यत्वापासून मुक्त करून आजपर्यंत जगातील इतर कोणत्याही ठिकाणी दृष्टोत्पत्तीस न येणाऱ्या समाजाच्या जुलमाचा, जाचाचा आणि निर्दयपणाचा अंत करावा. या योगानेच खरे राष्ट्रकार्य होईल अशी माझी दृढ समजूत आहे व त्या मार्गानेच आपला कार्यभाग उरकला जाणार आहे. कोल्हापूर संस्थानातील धर्मकारणात व प्रशासनात ब्राम्हणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. आता त्यांच्या धार्मिक वर्चस्वाबरोबरच या ऐहिक वर्चस्वासही महाराजाी शह देण्याचे ठरविले. या जाहिरनाम्याच्या विरोधात विजापूरकरांचे समर्थ पत्रक व लोकमान्य टिळकांच्या केसरी पत्रकातून टिका होऊ लागल्या. २४ नोव्हेंबर १९११ रोजी सर्वात महत्त्वाचा आदेश काढला, या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले, याशिवाय अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना खास शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या. ७ एप्रिल १९१९ च्या एका आदेशान्वये अस्पृश्य लोकांची दैन्यावस्था ध्यानी आणून त्यांच्या शिक्षणास उत्तेजन द्यावे, या हेतूने महाराजांनी त्यांना पुस्तके, पाटया, पेन्सिली मोफत देण्यासाठी अडीच हजार रूपये मंजूर केले. राजर्षी शाहू महाराजांनी जुलै १९१३ मध्ये अनुदानपात्र असलेली सत्यशोधक शाळा स्थापन केली. **क्रमशः**

# बालकवींच्या कवितेतील सोज्वळ आणि निर्मळ स्त्री



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**हिरवे हिरवेगार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे; त्या सुंदर मखमालीवरती, फुलराणी ही खेळत होती. गोड निळ्या वातावरणात, अव्याज-मने होती डोलत; प्रणयचंचला त्या भ्रूलीला, अवगत नव्हत्या कुमारिकेला, आईच्या मांडीवर बसुनी, झोके घ्यावे, गावी गाणी; याहुनि ठावे काय तियेला, साध्या भोळ्या फुलराणीला ? निरागस अल्लड बालिकेने मनाच्या अंगणात खेळ खेळावेत एक दिवस अचानक आई-वडिलांना आपली कन्या तारुण्याचा उंबरठा गाठून लग्नायोग्य उपवर झाल्याची जाणीव व्हावी, अशा भावनेमधून निसर्गाच्या एकेका पैलूचे निरीक्षण करून बालकवीच्या कवितेमधील अल्लड मालिकेच्या रूपात फुलराणी लग्न सोहळ्यातील वागदत्त वधू च्या स्त्री रूपात उभे राहून वाचकाला भुरळ घालते.**

त्यानंतर रविकर म्हणजेच रविकिरण असल्यापासून अगदी लग्न सोहळा पर्यंत स्त्रीमनाची स्पंदनात उपवर मुलीचे भावविश्व कवितेमधून उभे केले आहे ते त्र्यंबक बापूजी ठोंबरे म्हणजेच बालकवी यांनी,बालकवीचा जन्म धरणगाव येथे 13 ऑगस्ट 1890 रोजी झाला. आता ही फुलराणी म्हणजे खरोखरच एखादी लग्नोत्सुक कुमारिका आहे आणि तिच्या लग्नाचा सोहळा कवीने शब्दाचा चित्रित केला आहे किंवा नैसर्गिक उर्मीने कळीचे फूल होणे या घटनेला कवीने उपवर तरुणीच्या लग्नाची प्रतिमा देऊन वर्णन केले आहे याचा शोध वाचकांनी आपापल्या परीने घेतलेला जास्त योग्य, मात्र गाउ लागले मंगलपाठ, सृष्टीचे गाणारे भाट, अशा शब्दांमधून एखाद्या अल्लड निरागस पालिकेच्या लग्नात की अनुभूती घेतल्याशिवाय राहात नाही इतकी काव्य सजीवता बालकवींच्या कवितांमध्ये आढळून येते.मराठी कवितेमधील एक विलोभनीय काव्य दालन म्हणजे बालकवींची कविता, त्र्यंबक बापूजी ठोंबरे म्हणजेच बालकवी एक निर्मळ झऱ्याप्रमाणे खळाळती कविता म्हणजे बालकवींची कविता होय. फुलराणी सह जीवनातल्या अनेक टप्प्यांवर औदुंबर, पारवा, चाफेकळी, माझे गाणे, आनंदी आनंद गडे, श्रावणमासी या कविता साथसोबत करत असतात औदुंबर, पारवा, आनंदी आनंद गडे अशा एकापेक्षा एक अजरामर कवितांची नितांत सुंदर पर्वणी म्हणजे बालकवींची कविता होय. श्रावणमासी हर्षमानसी या कवितेमधून श्रावण महिन्याचे वर्णन करतानाही बाल कवीच्या लेखणीतून निसर्ग झिरपत राहतो वेगवेगळ्या नैसर्गिक प्रतीके आणि प्रतिमा यांच्या वापरामुळे विलोभनीय ठरणारी कविता शेवटच्या कडव्या मुळे होत जाऊन अतिशय देखणी आणि रमणीय होते ती त्यातील स्त्रीच्या सोज्वळ दर्शनामुळे, या कडव्यामध्ये बालकवी म्हणतात, सुंदर परडी घेऊनि हाती पुरपकंठी शुद्धमती, सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले-पत्री खुडती. देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात, वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत स्त्रियांच्या देव दर्शनाला जाण्याच्या मोहक आणि उत्साही वर्णन कवीने



आपल्या शब्दातून केले आहे, हातामध्ये फुले वेचण्याची परडी घेऊन देवाला वाहण्यासाठी आणि केसात मारण्यासाठी फुले वेचणाऱ्या स्त्रियांचे जिवंत अनुभव देणारे चित्र बालकवींनी आपल्या या कवितेमधून उभे केले आहे. बालकवींच्या या शैलीमुळे त्यांचे निरीक्षण किती सूक्ष्म होते त्याचबरोबर श्रावण महिन्यामधील देवादिकांच्या आणि सणावाराच्या दिवसांमध्ये स्त्रियांमुळे समाजामध्ये कशी प्रसन्नता नांदते? याचेही स्मरण त्यांनी करून दिले आहे असे जाणवते. गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी! काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं?

तू तर चाफेकळी कवितेमधून बालकवींनी यमुनेच्या काठावर हरवलेले काहीतरी शोधणारी गोपिका आणि यमुनेच्या काठावर निसर्ग यांचा एक सुरेख मेळ घालून कविता लिहिण्याचा प्रयत्न केला मात्र का कुणास ठाऊक? पण ही कविता अपूर्ण अवस्थेत राहिली. ती वनबाला म्हणे नृपाळा सुंदर मी हो खरी, या ओळींमधून आपल्या सौंदर्याचे केलेले वर्णन किती यथार्थ आहे ते राजाला सांगून मी सुंदर आहेच असे निक्षून सांगणारे स्त्री बालकवींनी या कवितेमधून उभी केली असली तरी तिचे पुढे काय झाले? त्याचा सुगावा लागलेला नाही. मात्र फुलराणी - बालकवींच्या निवडक कविताया मध्ये या कवितेसंबंधी संपादकीय मध्ये कुसुमाग्रज यांनी बालकवींची कविता अपूर्ण असली तरी ही अपूर्णता तिच्या रसास्वादाला बाधक होत नाही. कोठल्यातरी संकल्पित कथाकाव्याचा हा छोटा तुकडा आहे असे वाटतेअसे मत मांडले आहे. नवनिर्मिती ही माती आणि स्त्री या दोघांनाही लाभलेली एक देणगी आहे. मातृत्व म्हणजे संपूर्ण स्त्रीत्व अशा धारणेतून समाज स्त्रीयांकडे पाहत असतो, आपल्या कवितेमधून फुलाला सृष्टी चे तान्हेबाळ अशी उपमा देऊन सृष्टीला स्त्री रूपात शब्दबद्ध करून कवीने स्त्रीत्व आणि मातृत्व या दोन्हींचाही गौरव केला आहे. पुढे बाळाचे कौतुक पाहू कौतुकाने असणारी आई म्हणजेच मधु वंदना सृष्टी होय. हे फुल या उडत्या स्वर्गातील माणिक हे बाई झुलते आहे ! हे तान्हे सृष्टीचे गोजिरवाणे कौतुकली मधुवंदना हसली वदली- स्वच्छंदी फूलपांखरा ! आनंदी माधविका पाठविते तुज या लोका अशा शब्दांमध्ये निसर्गातील लहान मोठ्या घटकांना स्त्री रूपामध्ये प्रतिकात्मक आकार देत बालकवींची निसर्ग कविता बहरत गेली आहे. अप्सरांचे गाणे हीसुद्धा अशीच एक निसर्ग वर्णन करणारी कविता बालकवीच्या प्रतिभाशक्तीची ओळख करून देणारी आहे. अप्सरा म्हणजे अतिशय सुंदर , मोहक अशी स्त्री होय... या अप्सरेचे गाणे म्हणजे एक वर्णन आहे. सांभाळून उतरा बाई वेळ गडे! स्नानाची ही... अशा ओळींमधून नाजूक अप्सरांच्या पुष्करणीतील जलक्रीडेची आठवण व्हावी इतक्या तरलतेने ही कविता सुरू होते, मग स्नान करणाऱ्या यौवना आणि फुलं झाडावरील कळ्या फुलांवर पडणारा पाऊस यांचे व्यामिश्र वर्णन बालकवींच्या शब्दातुन रसिकांना ओलेचिंब करीत राहते. जलकणिका त्यांच्या पडती! थंडगार अंगावरती, स्नान करू झडकरी बाई पूनीतही गंगामाई ... आंघोळ केल्यावर गंगास्नानाची पावन अनुभूती घेणाऱ्या ललना प्रमाणे पाऊस येऊन गेल्यावर वृक्षवेलीही पवित्र आणि ताजेतवाने होऊन बसतात अशा पद्धतीने एकमेकात ही प्रतीके आणि प्रतिमा गुंतलेली दिसतात. त्यानंतर रवी किरणांचे नवरंगी रम्य झगे घालून बसणारी, नवतरुण स्त्री की झाडावर शहारून बसणारी कलिका अशा विचारात वाचक गुंगून जातो. तारकांचे गाणे, संध्या रजनी, बहिणीकरिता गाणे.. अश्या काही कवितांमधून बालकवींच्या कवितेतील स्त्रीचे रूप पाहायला मिळते. वयाच्या तेराव्या वर्षी पहिली कविता लिहिणारा हा बालकवी शंभर वर्षांपूर्वी फक्त अठ्ठावीस वर्षांचा असताना खानदेशातल्या रखरखत्या उन्हाळ्यात रूळात पाय अडकून मालगाडीच्या अपघातात यावा आणि 5 मे 1918 रोजी त्याचा मृत्यू व्हावा, ही फार मोठी शोकांतिका आहे. 1907 च्या मराठी साहित्यसंमेलनात अध्यक्षांनी त्यांना बालकवी ही पदवी द्यावी कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी ठोंबऱ्यांनाबालकवीही पदवी दिली हीदेखील एक काव्यमय घटना होय. ह्या बालकवीने त्या पदवीवर अवघ्या दहा वर्षांत साज चढवला, निर्झरास या कवितेमध्ये खळखळ वाहणाऱ्या झऱ्याचे त्यांनी जे वर्णन केलेले आहे ते त्यांच्या जीवनासाठी खऱ्या अर्थाने लागू होते, बालकवीची कविता खळखळणाऱ्या निर्मळ झऱ्याप्रमाणे प्रवाही होती. निर्झरास या कवितेत ते म्हणतात त्याप्रमाणे, दिव्य तयाच्या वेणुपरी, तूहि निर्झरा! नवलपरी गाउनि गे झुळझुळ गान, विश्वाचे हरिसी भान! गोपि तुझ्या हिरव्या वेली, रास खेळती भवताली! तुझ्या वेणुचा सूर तरी, चराचरावर राज्य करी... हिरव्या वेलींना गोपीची उपमा देऊन निसर्गातील ही रासक्रीडा तन्मयतेने मांडणाऱ्या ह्या बालकवीच्या कवितेमधील स्त्रिया जणू यमुनेकाठी खेळणाऱ्या कृष्णसख्या आहेत असे वाटते. कितेक मानव झटती, करिती हाडाचेही पाणी,

अनंत वसुधा आजवरी हो परी मोजली कोणी! म्हणोत कोणी आम्ही गणिला हा ग्रह- हा तारा, परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा? अशी सृष्टीच्या विश्वरूपदर्शनाने स्तिमित होणारी कविताही बालकवींनी लिहिली तर कधी औदुंबर सारख्या गूढार्थ तून तपस्वी जीवन व्यक्त केले, पारवा, उदासीनता अशा कवितांमधून भग्न मनाचे प्रतिबिंबही त्यांनी रेखाटले, त्यांच्या बहुतांश कवितांमध्ये सृष्टीचे वर्णन करताना स्त्री विषयक प्रतीके, प्रतिमा वापरली गेली आहेत. मात्र त्यांच्या कवितेत स्त्री कोठेही आक्रस्ताळेपणे समोर येत नाही. कोणताही अन्याय अत्याचार झाल्याचे सांगत नाही. कदाचित 5 मे 1918 रोजी रेल्वेखाली मृत्यू झाल्याने कवीला लाभलेले अल्पायुष्य ह्यामुळे कवीला स्त्री जीवनाची ती बाजू पाहता आली नसावी. मात्र त्यांच्या कवितेमध्ये स्थिती लावण्यवती, मोहक, प्रणयोत्सुक पण सोज्वळ आणि सुशील0 अशी आहे हे आपल्या लक्षात येते. अगदी त्यांच्याच शब्दशैलीत सांगायचे तर अलवार कोवळे अंग, जशि काय फुलांची मूस इतकी नितळ आणि नाजूक अशी त्यांची कविता आणि त्यांच्या कवितेत स्त्री वर्णने होती. बालकवींच्या ह्या निस्सीम आणि नाद, लय, रुपगंध जागृत करणाऱ्या काव्यप्रतिभेला मनापासून सलाम!



# नीलेश लंके यांनी घेतले अण्णा हजारे यांचे आशीर्वाद

आधुनिक केसरी न्यूज

**राळेगणसिद्धी :** लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी गुरुवारी राळेगणसिद्धी येथे येत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लंके यांनी निवडणूक प्रक्रिया दरम्यान राबविलेल्या यंत्रणेबाबत हजारे यांना माहिती दिली. दोन-अडीच महिन्याच्या कालावधीत मतदार संघातील गावा गावात संपर्क केल्याचे लंके यांनी सांगितल्यानंतर इतक्या मोठ्या मतदार संघात केलेल्या संपर्काविषयी हजारे यांनी आश्चर्य व्यक्त केले. हजारे म्हणाले सध्या मोठ्या प्रमाणात उष्णता असून उन्हाची काळजी घेऊन प्रचार करा असा सल्ला हजारे यांनी लंके यांना दिला. हजारे म्हणाले आमदार म्हणून काम करताना नीलेश लंके यांनी गेल्या साडेचार वर्षात भरीव काम केले आहे. मतदारसंघातील जनतेपुढे त्यांचे काम आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पारनेर तालुक्याचा प्रतिनिधी लोकसभेत जाण्याची यंदा संधी आहे. संधीचे सोने करा असा सल्ला अण्णा हजारे यांनी यावेळी दिला. अलीकडेच या निवडणुकीतील भाजपाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे हे आपल्या भेटीला आले होते. निवडणुकीतील सर्वच उमेदवार आपल्या भेटीसाठी येतात. आपण त्यांना आशीर्वाद देतो, परंतु विखे यांच्या काही कार्यकर्त्यांनी आपले विखे यांना समर्थन असल्याचा खोटा संदेश सोशल मीडियावर व्हायरल केला. हे योग्य नाही. गैरसमज पसरविणे चूकीचे नसल्याचे सांगत हजारे यांनी नाराजी व्यक्त केली.

# वाढता दहशतवाद रोखण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या

## संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर

आधुनिक केसरी न्यूज



**नगर :** समाजिक भान भेवून समाजहितासाठी संभाजी ब्रिगेड यांनी नैतीन जबाबादारी समजून समाजाचा गाडा हाकला, काम उभ केले आता येणऱ्या निवडणुकीमध्ये एक राष्ट्र, एक हित समजून राष्ट्राच्या हितासाठी मान, पान बाजुला ठेवून एक स्वतंत्र लढा आपल्याला लढायचा असून वाढता दहशतवाद रोखायचा असेल तर आपल्याला महाविकास आघाडीला निवडून आणण्या शिवाय पर्याय नाही. जिल्हयात महाविकास आघाडीच्या पाठीमागे ठाम उभे राहण्याची गरज असून त्यासाठी एकदिलाने कामाने लागा असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर यांनी केले. दरम्यान विदर्भाच्या शैलीमध्ये कराळे मास्तर यांनी मोदींवर सडकुन टीका करत वाभाडे काढले.
संभाजी ब्रिगेडच्या वतीने नगर येथे माऊली सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात ही जिजाऊ वंदनेने करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेद्र फाळके, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, उपजिल्हाप्रमुख गिरीष जाधव, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, माजी महापौर अभिषेक कळमकर, संदिप कडलग, कराळे मास्तर, संभाजी ब्रिगेडचे दक्षिण जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, उत्तरेचे शिवाजी पवार, आपचे जिल्हाध्यक्ष राजुभाऊ आघाव, निलेश मालपाणी आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खेडेकर म्हणाले की, केंद्र सरकारमध्ये बसलेले अनेक खोटे नाटे आश्वासने देवून खोटे आकडे लोकांच्या समोर मांडत आहे. एकीकडे विकास केला म्हणून दाखवायचा आणि दुसरीकडे देश हा कर्जाच्या खाईत लोटला गेला. आज आपल्या देशावर 205 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. पदावर बसलेला माणूस याबद्दल काहीच सांगत नाही, त्यामुळे आता आपल्याला आकाशवाणी करण्याची गरज असून तळागाळातील माणसाला यांचा खरा चेहरा दाखवून द्यायचा असून आपल्याला ताकदीने समाजामध्ये हे मांडायचे आहे असे ते म्हणाले. आज बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. मोठा फौजफाटा त्याचा तयार झाला आहे. त्यातुनच मुलाना नैराश्य आले आहे. नोकऱ्या नाहीत म्हणून लग्न होत नाही. त्यामुळे व्यसनाधीनता वाढत चालली आहे. देशामध्ये ही भयान परस्थिती आता निर्माण झाली. आगामी काळात लुटालुट, दंगे असे प्रकार वाढत जाणार आहे. हे सर्व थांबवायचे असेल तर आपल्याला म्हणजेच संभाजी ब्रिगेडला नैतीक जबाबदारी म्हणून समाजासाठी जे काही आपण करत आलेलो आहोत. ते कार्य आपल्याला पुढे घेवून जायचे असेही ते म्हणाले. आज कुठेही मोबाईल, टीव्ही, पेपर पाहिला तरी या सत्ताधाऱ्यांचा फोटो दिसतो व खोटे आकडे हे सांगितले जातात. त्यामुळे आपल्याला हे हाणून पाडायचे आहे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकोप्याने येवून कामाला लागा असे खेडेकर म्हणाले. कराळे मास्तर यावेळी बोलताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलं की मी कितीही चांगलं संविधान लिहिलं तर संविधानानुसार वागणारे लोक जर या देशात नसतील तर असे दाढीवाले (मोदी) बदमाश असतील तर या देशाचा सत्यानाश होईल. याच काय कोणत्याही देशाची घटना जर टिकवायची असेल तर पंडित जवाहरलाल नेहरूंनी म्हंटले की, लोकशाही ही तेंव्हाच जिवंत राहू शकते जेंव्हा सत्तेत असणारी लोकं विरोधी पक्षाच्या मताचा आदर करतील, मात्र हा चोट्टा आदर करायला तयार नाही. हे स्वतःच्या भाषणात म्हणतात की, मै फकीत हूँ झोला लेक चल पडूंगा, तो आपल्यालाही भिकारी बनवणार हेपक्क ध्यानात घ्या. तुम्हाला अहमदनगर लोकसभेसाठी निलेश लंकेच्या स्वरूपात एक चांगला उमेदवार मिळाला आहे. त्यांनी कोरोना काळात केलेले काम सर्वांना हे सर्वांना प्रेरणा देणार आहे असे ते म्हणाले.
शिवसनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी म्हणाले की, संभाजी ब्रिगेडचे कार्य व शिवसेनेच कार्य हे जवळपास सारखे आहे. आपल्याला आता मित्र मिळाला आणि तो ही तोडीचा, ज्याच्या बरोबर आम्ही पंचविस वर्ष काम केले भाजपा आमच्या जिवावर मोठी झाली. मात्र, त्यांनी आता विश्वासघात केला. त्यामुळे त्यांना आता त्यांची दाखवून देण्याशिवय पर्याय नाही असे दळवी म्हणाले, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके म्हणाले आज आपण खेडेकरांना जी पगडी घातली ती ज्योतीबा फुले यांची ती पगडी त्यांचा विचार हा सर्वसामान्यांपर्यंत पोहचवायचा आज बापाला बाप म्हणायचे नाही अशा पध्दतीचे राजकारण आपण येवून पाहतोय त्यामुळे महाराष्ट्रामध्ये त्याचा रोष आहे असे सांगून शरद पवार यांनी जो विचार दिला तो विचार आम्ही आता सर्वांपर्यंत पोहचवत आहोत.

# वारं...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग 47

नळी फुंकली सोनारे ,इकडून तिकडे गेले वारे". काही गोष्टी सांगितल्या नंतर जेव्हा एखाद्याच्या डोक्यावरून त्या निघून जातात किंवा सांगितलेले मनावर न घेता तीच ती कृती पुन्हा करतात अशावेळी त्या निरढावलेल्या व्यक्तीबाबत नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे असे म्हणतात.
खेड्यात चुलीत जाळ फुंकण्यासाठी एक लहानसा लोखंडी पाईप असतो. त्याला फुकणी असे म्हणतात. बासरी सारखं तोंडाजवळ धरून एका बाजूने त्यात फुंकर मारतात. दुसऱ्या बाजूने तोंडातली हवा त्यातून बाहेर पडते व चुलीत जाळ तयार होतो .ती फुकणी म्हणजेच इकडून तिकडे गेले वारे. ग्रामीण भागात एखाद्या व्यक्तीसाठी यडी फुकनी, यडा फुकणा,असे संबोधन वापरतात. त्यांना नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे एवढी मोठी म्हण माहित नसते. मग त्याला पर्यायी म्हणून ते ही म्हण वापरतात. आणि ते एकदम बरोबर आहे. एखाद्याच्या डोक्यात यशाची हवा गेली असं आपण म्हणतो. ग्रामीण भागात वारं गेलं म्हणतात .शहरी भागात जे काही शब्द वापरतात ते थोडे हलकेफुलके असतात.
असं मला वाटतं. पण खेड्यातील लोक जे शब्द वापरतात ते सर्व शक्ती एकवटून असतात. वारं गेलं म्हणजे बस.....आता सगळं संपलं.... त्याच्या डोक्यात वारं गेलं तो आता वाऱ्याच्या वेगाने वाऱ्यासारखंच वागणार. असा त्यांचा अर्थ होतो. वाऱ्याला ज्याप्रमाणे हातात धरता येत नाही, तो दिसत नाही तसंच आपलं मानसिक संतुलन बिघडलेल्या व्यक्तीचं असतं. डॉक्टर कदाचित त्याला मनोरुग्ण म्हणत असतील, पण ग्रामीण भागात त्या व्यक्तीला एवढा मोठे दूषण लावण्यापेक्षा फक्त एवढेच म्हणतात की त्याच्या डोक्यात वारं गेलं आणि शास्त्रीय दृष्ट्या ते खरं पण आहे कधीकधी आपल्या शरीरातून अशी काही लकेर जात असते की कोणाला पक्षघात होतो, कोणी मनोरुग्न होतो, कुणाला लकवा होतो, कुणाला हृदयविकार... काहीही असो पण हे वारं तसं घातकच आहे. उन्हाळ्यात अंगाला झोबंणारा गार वारा सर्वांना हवाहवासा वाटतो. मंद मंद गार वाऱ्याची झुळूक अंगाला स्पर्शून जाते तेव्हा स्वर्गीय सुखाचा आनंद होत असतो. पण बुद्धीचं , सौंदर्याचं ,पैशाचं वारं जेव्हा डोक्यात जातं तेव्हा या लोकांना सावरणं, त्यांना सामोरे जाणे फार अवघड होतं. अशावेळी गार गार मंद मंद हवा परवडली पण सोसाट्याचं वारं, वादळ नको....

# महावीर जयंतीनिमित्त वेरूळ येथे जैन अलर्ट ग्रुप छत्रपती संभाजीनगरतर्फे माठ वितरण

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ येथे गोरगरीब व्यक्तींना पिण्याच्या पाण्यासाठी मठाची वाटप करण्यात आली. समाजातील गोर-गरीब व्यक्ती प्रति आपले सामाजिक दायित्व भावना जोपासण्याचे काम गेली अनेकवर्षापासून वेरूळ व संभाजीनगर येथील जैन अलर्ट ग्रुप करीत आहे. महावीर जयंती निमित्त दरवर्षी जैन अलर्ट ग्रुप तर्फे गोरगरिबांना चादर/ब्लॅकेट , गरजू शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश, धान्य, दिवाळीला मिठाई व इतरही उपयोगी साहित्य वाटप करण्याचे काम करीत असते. या वर्षी महावीर जयंती निमित्त उन्हाची तीव्रता पाहता जैन अलर्ट ग्रुप तर्फे वेरूळ येथील गरीब लोकांचा फ्रिज म्हणजे नळाचीतोटी असलेला माठ, माठासाठी आवश्यक असणारा स्टॅन्ड, दोन स्टील ग्लास, एक प्लेट व मिठाई बॉक्स वाटप=वेरूळ येथील गरजू व्यक्तीच्या सानिध्यात संपन्न करण्यात आला. यावेळी जैन अलर्ट ग्रुपचे वेरूळ येथील प्रमुख कार्यकर्ते नरेंद्र साहुजी यांच्या पुढाकाराने गावातील गोरगरिबांना मोठ्या उत्साहात वाटप करण्यात आले. यावेळी गरजू व्यक्तींच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून जैन अलर्ट ग्रुप मधील सर्व सदस्यांचे समाधान झाले.

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

**नारळाची कुल्फी :** टेंडर कोकोनट आईस्क्रीम, कुल्फी आता जवळपास सर्व उत्तम आईस्क्रीम पार्लर्स मध्ये उपलब्ध असतात. खूप जणाना मनापासून आवडतात. उन्हाळ्यात नारळ तर तब्येतीसाठी वरदानच ! म्हणूनच आज आपण नारळाची मस्त, थंडगार कुल्फी बनवू.ही बनवायला एकदम सोपी, चवदार,असून आपण घरातही आता सहज बनवू शकतो. कुल्फीचा साचा असला तर उत्तमच, नसेल तरी काही हरकत नाही. उत्तम कुल्फी बनतेच. चला, पाहूया ना मग ? **साहित्य :** 1 नारळ, 2 वाट्या दुध, 2 चमचे मिल्क पावडर, 2 चमचे फ्रेश क्रीम किंवा फेटून घेतलेली साय, 4 चमचे खडीसाखर, अर्धा चमचा वेलदोडे आणि जायफळ यांची पूड. **कृती :** प्रथम नारळाच्या वाट्या करवंटीच्या पासून वेगळ्या काढून त्याच्या पाठीची साल काढून त्याचे बारीक तुकडे करावेत. मिक्सरच्या भांड्यात खडीसाखर आणि तुकडे घालून थोडे फिरवून बारीक करावेत. लवकर व्यवस्थित बारीक होण्यासाठी थोडे थोडे दूध घालून फिरवून छान एकदम बारीक वाटून घ्यावे. मग त्यामध्ये मिल्क पावडर, फ्रेश क्रीम, जायफळ व वेलदोडा यांची पूड घालावी व मिश्रण पुन्हा एकदा फिरवून घ्यावे म्हणजे सर्व छान एकजीव होईल. आता कुल्फीचा साचा असेल तर त्यामध्ये हे मिश्रण भरावे व वरून ॲल्युमिनियमची फॉईल लावावी. नंतर मोल्डच्या प्रत्येक कुल्फीच्या मध्यभागी कुल्फी पकडण्यासाठी सुरीने छोटे छिद्र करावे व त्यात कुल्फीची काडी घालावी व फ्रीझर मध्ये सेट होण्यासाठी 7..8 तास ठेवावी. जर आपल्याकडे कुल्फीचा साचा नसेल तर चहाचे पेपर कप असतील तर त्यात हे मिश्रण भरावे, वरून ॲल्युमिनियमची फॉईल लावून त्याला छिद्र पाडून त्यात लाकडी काडी धरण्यासाठी घालावी व नंतर हे सेट होण्यासाठी फ्रीझरमध्ये ठेवावे. सेट झाल्यानंतर बाहेर काढून मोल्ड असेल तर पाण्यात थोडासा बुडवावा व फॉईल काढुन कुल्फी अलगद बाहेर काढावी. चहाच्या कपात लावली असेल तर बाहेर काढल्यावर दोन्ही हातात धरून थोडीशी घुसळावी. म्हणजे ती लगेंच सुटते. मग बाहेर काढून खाण्यास द्यावी. **वैशिष्टय :** ही कुल्फी करण्यास अगदीच सोपी, टेस्टी लागते. वेलदोडे, जायफळाचा मस्त स्वाद येतो आणि नारळामुळे तर खूपच मजा येते. नारळाची चव अप्रतिम लागतेच पण त्यामुळे सॉफ्ट सुद्धा बनते. त्याच्या बरोबर आंबा, लिची, स्ट्रॉबेरी, केळी, संत्रे यासारखी आपल्याला आवडणारी फळे किंवा ड्रायफ्रुट्स सुद्धा घालू शकतो. मनसोक्त खाऊही शकतो. मग आता नक्की करणार ना ?



# मातृपक्षाशी धोकेबाजी करणाऱ्यांना कायमचे हद्दपार करा

## महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सुरळीत चाललेला महाराष्ट्रातील शिवसेना व मित्रपक्षाचा राज्यकारभार सहन न  झाल्याने पक्ष फोडण्याचे कुटील कारस्थान करण्यात येऊन धोकेबाजी करण्यात आली. मातृपक्षाशी गद्दारी करणाऱ्यांना दुर ठेवा तर काही ठग जुमलेबाजी करून देशातील जनतेच्या डोळ्यात दिवसा ढवळ्या धुळफेक करीत आहेत. असा धोकाबाजांना येत्या लोकसभेच्या निवडणुकीत कायमाचे हद्दपार करण्यासाठी मोठ्या संख्येने महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी केले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथे येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते. या व्यासपीठावर लोकसभा समन्वयक माजी महापौर नंदकुमार घोडेले, माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते किशोर पाटील, काँग्रेसचे माजी आमदार नामदेवराव पवार, शिवसेनेचे आमदार उदयसिंग राजपुत, उपजिल्हा प्रमुख राजेंद्र आदमाने पाटील,



अवचितनाना वळवले, देवीदास जाधव, आम आदमी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुभाष निकम, सलिम पटेल, अल्पसंख्याक सेलचे नेहरी, युवक संघटनेचे संतोष जायभाय, तालुका प्रमुख संजय पाटील मोटे, तालुका संघटक डॉ. आण्णासाहेब शिंदे, शिवाजी थेटे, शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख बाबासाहेब मोहिते पाटील, महिला आघाडीच्या सुनिता आऊलवार , सुनिता देव, उपजिल्हा प्रमुख हर्षली मुठ्ठे, शहर संघटक उज्वला बिरारीस, तालुकासंघटक रुपाली मोहिते, कडुबाई वाघ, लताबाई सोनवणे, दीपक बोडखे, संजय राजपुत, निवृत्ती पाटील बारसे, ज्ञानेश्वर रावते, गोकुळ गोरे, बबनराव मोगल, चांगदेव पाटील सावडे, भारत हार्दे,काकासाहेब सोनवणे, आसिफ पठाण, अरूण सोनवणे, आकाश उबाळे, अनिल करगळे, अंनता पवार, शकिल कुरैशी, संदिप गोरे, प्रदीप दिवेकर, आसिफ कुरैशी, गणेश सोनवणे, राहुल पाटील बोरसे, गणेश गायकवाड, निलेश गोंधळे, भागीनाथ रावते, भावलाल मुळे, रवि बडोगे, बाळु गवळी,संतोष गवळी, रियाज शेख, मुजीब सय्यद,अयुब शेख, अंबादास सवाई, भगवान तांगडे, प्रकाश तांगडे, भाऊसाहेब देसाई, नवनाथ गोरे, साईनाथ गोरे, नारायण हिवाळे, गणेश तांगडे, बाळु वेताळ, जयदिप वेताळ, रईस कुरैशी, तुकाराम गाधु, विजय मोगल, रावसाहेब शिरसे, कैलास पवार, गणेश पवार, तुषार पवार,भास्कर पवार, बंडु भिंगारे, भरत आहेर, भगवान बारगळ, गणेश तांगडे, विशाल तांगडे, सत्तार मनियार, मुक्तार काजी,मनोज दिवेकर, कुणाल दिवेकर, सुनील आल्हाट, अमोल वडगावकर, संतोष साळवे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी, नागरीक उपस्थित होते.



# जाकापूर तांड्यास टँकरने पाणीपुरवठा

## स्थानिक अधिकाऱ्यांचे दूर्लक्ष : ग्रामस्थांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** उन्हाळ्याच्या अंतिम चरणात तापमानात वाढ झाल्याने तालुक्यात पाणी टंचाईने डोके वर काढले आहे.तालुक्यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वताह लक्ष देवून आढावा घेतला आणि त्वरित टंचाईग्रस्त जाकापुरतांडा येथे टॅकरने पाणी पुरवठा सुरू केला आहे. येथील अधिकारी मात्र याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. घर व  शेतीची कामे बाजूला सारून घडाभर पाण्यासाठी भुक तहान हरपावी लागत आहे, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.

तालुक्यातील दरवर्षी पाणी टंचाई निवारणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी चूराडा केला जातो तरी जनतेला उन्हाळ्यात घोटभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. जलसंधारण, जलजिवन मशिनची कामे झाले असले तरी त्यांचा फारसा परिणाम दिसून येत नाही. सिंचना सोबत पाणी टंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे दिसून येत आहे.यंदा उन्हाळ्यात अधुनमधून गारपीट, वादळी वारे, अवकाळी पाऊस झाल्याने उन्हाची तीव्रता जाणवली नाही. सध्या मे महिन्याच्या सूरूवातीलाच उन्हाची तीव्रता ४० ते ४२ पर्यंत गेल्याने जीवाची लाही लाही होत असून वन्यप्राणी, पशुपक्षी, जनावरे आणि नागरीकांना यांचा मोठा फटाका बसतो आहे. गाव, वाडी तांड्यावर ग्रामीण भागात पाणी टंचाईने डोके वर काढले आहे. मागील अनेक वर्षांपासून तालुका टॅकरमुक्त झाला होता यावर्षी मात्र जाकापुर तांड्यावर टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे.

तालुक्यात ऐन उन्हाळ्यात दरम्यान लोकसभा निवडणूकीची धामधूम आणि ग्रामीण भागातील पाणी टंचाईच्या झळा अशी परिस्थिती निर्माण झाल्याने स्थानिक पातळीवरील अधिका-यानी टंचाई निवारणासाठी ठोस पाऊले उचलली नाहीत.मतदान संपताच नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी तालुक्यात टंचाईग्रस्त गावांना भेटी देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला व गैरसोय टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना केली. शहरातील उपविभागीय महसूल अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, राजकीय मंडळीनी मात्र ग्रामस्थांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांत संताप व्यक्त केला जात आहे.

# शोभाताई बच्छाव यांना ऑल इंडिया मोमीन अन्सार समाजाचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोकसभा निवडणूकीच्या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार शोभाताई बच्छाव यांना आज ऑल इंडिया मोमीन अन्सार समाजाच्या वतीने बिनशर्त पाठिंबा देण्यात आला आहे, अशी माहिती आज ऑल इंडिया मोमीन अन्सार सभेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खलील अन्सारी यांनी आयोजित पत्रकार परिषदेतून दिली आहे. देशात मुस्लिम समाजातील सर्वात मोठा समाज असलेला मोमीन अन्सारी समाज देशात सर्वत्र विखुरलेला आहे. समाजाला एकत्र करण्यासाठी, त्यांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी, त्यांचा व्यवसाय, रोजगार, आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती बळकट करण्यासाठी 2010 मध्ये लखनौ शहरात मोहमद अक्रम अन्सारी यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय मोमीन अन्सार सभा स्थापन झाली. सध्या ही सभा देशातील 18 राज्यांमध्ये मोमीन अन्सार समाजाच्या प्रगतीसाठी कार्यरत आहे, ज्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, पंजाब, उत्तराखंड, झारखंड, गुजरात, बंगाल इत्यादी राज्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यात देखील मोमीन अन्सार समाजाच्या विकासासाठी ऑल इंडिया मोमीन सभा कार्यरत झाली आहे. तसेच समाजाच्या विकासाबाबत भाजपाने केवळ आश्वासने दिली आहे. प्रत्यक्षात भाजपाने कुठलेही काम न करता समाजाची फसवणूक केली आहे.त्यामुळेचं धुळे लोकसभा इंडिया आघाडी व महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार शोभाताई बच्छाव यांना ऑल इंडिया मोमीन अन्सार समाजाचा बिनशर्त पाठिंबा असल्याची माहिती ऑल इंडिया मोमीन अन्सार सभेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खलील अन्सारी यांनी पत्रकार परिषदेतून दिली आहे.



# महाराष्ट्र एक्स्प्रेसमध्ये अनधिकृतपणे खाद्यपदार्थ विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाराष्ट्र एक्स्प्रेसमध्ये अनाधिकृतपणे खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या सहा विक्रेत्यांना रेल्वे सुरक्षा दलाने अटक केली तर दोन विक्रेते पळ काढण्यात यशस्वी झाले. नागपूर रेल्वे स्थानकावरून बिर्याणी घेतलेल्या काही प्रवाशांना विषबाधा झाली होती. रेल्वे प्रवाशांना अन्नातून विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आल्याच्या पार्श्वभूमीवर रेल्वेने खाद्यपदार्थांची तपासणी तसेच विक्रेत्याबाबत कडक कारवाईस सुरूवात केली आहे. महाराष्ट्र एक्स्प्रेसमध्ये तपासणी दरम्यान आठ अवैध खाद्यपदार्थ विक्रेत आढळून आले. ही गाडी बडनेरा-नागपूर दरम्यान असताना काही विक्रेते खाद्यपदार्थ विकत असल्याचे दिसून आले. त्यांना ओळखपत्र दाखवण्यास सांगण्यात आले. त्यांच्याकडे आयआरसीटीसीने उपलब्ध करून दिलेले ओळखपत्र नव्हते. मात्र, हे आठही विक्रेते स्वतःला आर अँड के असोसिएट्सचे सहयोगी असल्याचे सांगत होते. कागदपत्रांची कसून पडताळणी केल्यावर कोणाकडेही आयआरसीटीसीने दिलेले ओळखपत्र नसल्याचे उघड झाले.

# संत तुकडोजी महाराज आदर्श पत्रकारिता पुरस्कार पत्रकार सुधीर चव्हाण यांना प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** संत तुकडोजी महाराज यांच्या नावाने जनकल्याण फाउंडेशनच्या वतीने संत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून देण्यात येणारा आदर्श पत्रकारिता पुरस्कार नेवासा येथील पत्रकार सुधीर चव्हाण यांना सपत्नीक प्रदान करण्यात आला. नेवासा तालुक्यातील गोंडेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रम प्रसंगी शब्दगंध साहित्य परिषदेचे सचिव सुनील गोसावी, कामगार नेते कॉ. बाबा आरगडे, कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोकराव ढगे, शिवशाहीर विजय तनपुरे, शिवशाहीर भरत गाडेकर,बाबूजी आव्हाड महाविद्यालया चे प्राचार्य जी.बी.ढाकणे, शब्दगंध साहित्य परिषदेचे नेवासा शाखा अध्यक्ष डॉ.किशोर धनवटे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कवी सुभाष सोनवणे, जनकल्याण फाऊंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे, सचिव सुरेश रोडगे, कवी आनंदा साळवे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरचा पुरस्कार सन्मानाद्वारे पत्रकार सुधीर चव्हाण व सौ. संगिता चव्हाण यांना सपत्नीक  प्रदान करण्यात आला. संत तुकडोजी महाराज यांच्या नावाने देण्यात येणारा आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार सुधीर चव्हाण यांचे विविध स्तरावर अभिनंदन होत आहे



# आयुष्यात जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही

## पंकजाताई मुंडे : नांदूरघाटच्या विराट सभेत पंकजाताईंना मिळाले खंबीर पाठबळ

आधुनिक केसरी न्यूज

**नांदूरघाट :** जिल्ह्याची पालकमंत्री असताना मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून अनेक ठिकाणी रस्ते मंजूर केले. 25/15 ची कामे केली. अनेक ठिकाणी शाळा वर्ग खोल्या बांधल्या. शेतकऱ्यांना देशात सर्वाधिक विमा मिळवून दिला. दुष्काळी अनुदान दिले.ही सर्व कामे करत असताना जिल्ह्याच्या विकासाचा पाया मी मजबूत केला. जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग बनवले.

राज्य महामार्ग मंजूर केले. लोक म्हणतात, मुंडे साहेबांपेक्षा जास्त विकास पंकजाताई तुम्ही केला, तेव्हा मला माझ्या केलेल्या कामाचे समाधान वाटते. या जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी सर्वसामान्यांसाठी मला अजूनही काम करायचे आहे त्यामुळे एक संधी म्हणून ५ वर्षे द्या, बीड जिल्हा विकसित करून तुमच्या मतरुपी प्रेमाची परतफेड करेन, आयुष्यात मी जातीपातीचे राजकारण कधीच केले नाही. सर्वांना सोबत घेऊन मानवता वादाची भूमिका माझी आहे. एक एक मताचे सतपात्री दान करा, माझ्यावर विश्वास ठेवा, मी जिल्हयाच भाग्य उजळून टाकल्याशिवाय राहणार नाही. असे आवाहन महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी केले. दरम्यान नांदूरघाट पंचक्रोशीतून सभेला विराट गर्दी ज्यातून पंकजाताईला मताधिक्य देण्याचा निर्धार ग्रामस्थांनी पक्का केल्याचे चित्र दिसून आले. भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांची आज नांदुरघाट (ता.केज) येथे जाहीर सभा झाली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर आ. नमिताताई मुंदडा, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, संतोष हांगे, भगवान केदार, वासुदेव नेहरकर, सुमंत धस, शिवाजी जाधव, पंजाब देशमुख, सुनील आबा गलांडे, संतोष जाधव, सुनील जाधव, पांडुरंग चांगण, दत्ता हंगे, पांडुरंग गोंदरे, आदींची उपस्थिती होती. प्रारंभी आ. नमिता मुंदडा, संतोष हांगे यांची समयोचित भाषणे झाली.

बीड जिल्ह्यासाठी तीन महत्वाची कामे करा,असे मी खासदार झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदीजींना सांगणार असून यात बीड जिल्हा कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी मोठी योजना मंजूर करून घेणार आहे. याबरोबरच बीड जिल्ह्यात दरवर्षी ऊसतोड मजूर ऊसतोडणीसाठी दुसऱ्या जिल्ह्यात आणि दुसऱ्या राज्यात स्थलांतरित होतात, त्यामुळे गावे ओस पडतात. या मजुरांना बाहेर जिल्ह्यात जाण्याची वेळ येऊ नये जिथे जास्तीत जास्त ऊसतोड कामगार आहेत तिथे किमान १० हजार कामगारांना रोजगार देणारा प्रकल्प उभारा हे मी मोदीजींना सांगणार आहे. जिल्ह्यात असे दोन ते तीन प्रकल्प उभारून जिल्ह्याच्या ठिकाणीच रोजगार उपलब्ध करून देण्याचे माझे ध्येय आहे. याबरोबरच मला बीड जिल्ह्यात मोठे कॅन्सर रुग्णालय उभारायचे आहे. यामुळे गोरगरिबांच्या खिशाला बसणारी आर्थिक झळ मला थांबवायची आहे. गरिबांना मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उपलब्ध करून दिल्यास त्यांचा निश्चितच पैसा वाचेल असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.



जिल्ह्याच्या विकासाचा पाया यापूर्वी पालकमंत्री असताना मजबूत केला. विविध योजना राबवल्या. रेल्वेचे काम येत्या दीड- पावणे दोन वर्षात पूर्णत्वास जाईल. एकदा रेल्वेचे जाळे निर्माण झाले की, मोदीजींना विनंती करून वंदे भारत ट्रेनही जिल्ह्यातून धावण्यासाठी प्रयत्न आणि विनंती मी करणार आहे. ही सर्व कामे करण्यासाठी मला आगामी पाच वर्ष जिल्ह्याची सेवा करण्याची संधी द्या असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, या निवडणुकीत मतदारांनी बुद्धीभेद करणाऱ्यांपासून सावध रहावे. केंद्र सरकारने बनवलेले सर्व कायदे हे देश हितासाठीचे आहेत, ते मुस्लिम समाजाच्या विरोधात नाहीत. हे आमच्या मुस्लिम बांधवांनी समजून घ्यावे, विरोधक मात्र चुकीच्या पद्धतीने या निवडणुकीत प्रचार करत आहेत. याबरोबरच जातीवादाचा मुद्दा पुढे करत आहेत. वास्तविक बीड जिल्ह्याच्या भवितव्यासाठी हे राजकारण योग्य नाही. जनता आमच्या विरोधकांना थारा देणार नाही, त्यामुळे तुम्ही सर्वांनी एका १३ तारखेला कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून मला जिल्ह्याच्या विकासासाठी आगामी ५ वर्ष संधी द्या असे आवाहनही याप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी केले.या सभेला नांदूरघाट शिवाय सर्कल मधून अनेक गावच्या ग्रामस्थांची उपस्थिती होती.



## वकिलांच्या बैठक व्यवस्थेच्या समस्येसह अन्य प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करू : डॉ. शोभाताई बच्छाव

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मागील अनेक वर्षांपासून धुळे जिल्हा न्यायालयात वकिलांची संख्या वाढल्याने सद्य परिस्थितीत अनेक वकिलांना बैठक व्यवस्था नसल्याने मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर धुळे जिल्हा न्यायालयास सुमारे पाच एकर जागेत नवीन जिल्हा न्यायालयाच्या इमारत साठी जागा देण्यात आलेली आहे. सदर जागेत नवीन जिल्हा न्यायालयाच्या इमारतीचा प्रारूप नकाशा शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. सात मजली इमारतीत वकिलांना मात्र आज मीतीस उपलब्ध असलेल्या जागेपेक्षा कमी जागा दर्शवण्यात आलेली आहे. त्यामुळे वकिलांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. वकिलांना नवीन इमारती त आवश्यक तेवढी जागा देण्याचे आश्वासन यावेळी डॉक्टर शोभाताई बच्छाव यांनी दिले आहे. तसेच वकिलांना संरक्षण देण्यासाठी कायदा पारित होण्या कामी संसदेत आवाज उठवणार असल्याचे यावेळी आश्वासित करण्यात आले. सुसज्ज लायब्ररी साठी देखील योग्य तो निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शोभाताई यांनी दिले आहे.

यावेळी धुळे जिल्हा बद्दल संघाचे अध्यक्ष ॲड. राहुल पाटील साहेब यांनी वकिलांच्या विविध समस्यांवर निवडून आल्यानंतर देखील शासन स्तरावर व पक्ष पातळीवर मदत करण्याचे आव्हानित केले. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा संघटक ललित माळी यांच्या समन्वयाने धुळे जिल्हा वकिल संघाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा धुळे लोकसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या आधिकृत उमेदवार माजी मंत्री डॉ.शोभाताई बच्छाव यांच्या कडून करण्यात आला.

यावेळी धुळे जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राहुल पाटील, उपाध्यक्ष ॲड. मधुकर भिसे, महिला उपाध्यक्ष ॲड. भावना पिसोळकर, महिला सचिव ॲड. सुधा जैन, सचिव ॲड. बळीराम वाघ, सचिव ॲड. उमेशकांत पाटील, ज्येष्ठविधीज्ञ ॲड. एम एस पाटील, ॲड. एस आर पाटील, ॲड. डी. जी. पाटील, ॲड. रवी दादा देसर्डा, ॲड. बी.डी पाटील, ॲड. बी पी पवार, ॲड. हितेंद्र कबाडे, ॲड. वाल्मीक कचवे, कार्यकारणी सदस्य ॲड. सारंग जोशी, ॲड. दिनेश देवरे, ॲड. ललित महाले, ॲड. अमोल बडगुजर, ॲड. विशाल पाटील, ॲड. जुबेर अन्सारी, ॲड. जयेश बाविस्कर, ॲड. मधुकर भिसे यांनी प्रस्तावना केली. ॲड. सुधा जैन यांनी आभार प्रदर्शन केले. ॲड. जगदीश सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.

## इंडिया आघाडीच्या सोयगाव शहरात प्रचार सभेला उसळला जनसमुदाय

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात दि.०२ रोजी असंख्य कारकर्त्यांच्या व नागरिकांच्या अति उत्साहामध्ये इंडिया आघाडीची सभा पार पडली. या सभेत अनेक भाजपाच्या कार्यकर्ते यांनी महा विकास आघाडीमधे जाहीर प्रवेश केला.तसेच शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष मा. राजाभाऊ राठोड यांच्या हस्ते सोयगाव येथील महाविकास आघाडीच्या प्रचार कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रचार कार्यालयाच्या माध्यमातून आपण सगळेजण माझ्यासोबत जोडले जाणार आहात, असे मत मा.डॉ.कल्याण राव काळे यांनी मांडले खरंतर कॉंग्रेस पक्ष हा सर्व जाती धर्माचा गोर-गरिबाचा. शेतकरी. शेतमजुरांचा पक्ष आहे या कॉंग्रेस पक्षला अनेकांनी संपवायचा पर्यत्न केला ते संपले मात्र सर्वांना सोबत घेऊन जाणारा आपला कॉंग्रेस पक्ष नाही संपला आणी म्हणून एवढ्या ताकतीने एवढा जनसमुदाय येथे आलाय गेल्या दहा वर्षात जो काही विकास या मतदारसंघाचा राखडाला आहे तो पूर्ण करण्याचे काम आपण करू याप्रसंगी माजी खासदार जयसिंग काका गायकवाड, मा.आ.नामदेव पवार साहेब, लखुसिंग नाईक, शिवदीप काळे, राजेंद्र राठोड, राम बाहेती, दत्तात्रय पांढरे, अजित पाटील, रघुनाथ चव्हाण, सय्यद अनिल, प्रताप चव्हाण, भास्कर घायवट, सुदर्शन अग्रवाल, विठ्ठल बदर, दिलीप मचे, इंद्रसिंग सोळंके, रवी काळे, विमलताई खैरनार, हरिदास शेलार, गुलाबराव कोलते, रवी काळे,दिलीप देशमुख. सुनील चोरमले म.आरिफ म.लुखमण सुग्रीव मुंडे, राजेंद्र काळे, दिनेश हजारी, भरत पगारे, शोभाताई पगारे, एकनाथ दौंड आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.



## चित्रकला स्पर्धेमध्ये आयएसओ जि. प. उच्च प्राथमिक शाळा मल्हारा येथील विद्यार्थ्यांना पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राज्यस्तरीय रंगभरण चित्रकला स्पर्धा, भारवी कला अकादमी अचलपूर व अध्ययन समाचार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेली राज्यस्तरीय रंगभरण चित्रकला स्पर्धेमध्ये ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा, पंचायत समिती अचलपूर येथील दोन विद्यार्थिनी चित्रकला रंगभरण स्पर्धेत इयत्ता 4 थी तील माही विकास सोनटक्के हिला द्वितीय पुरस्कार व नंदिनी दादाराव मावस्कर हिला उत्तेजनार्थ पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थिनींना शाळेतील उच्च श्रेणी मुख्याध्यापक शीला सोळंके, शिक्षक रतिराम मावस्कर, आदर्श शिक्षक बबलू कराळे, किरण साकरकार, आदर्श शिक्षक श्रीकृष्ण उघडे, आदर्श शिक्षिका कल्पना चौधरी, दिनकर राऊत, रश्मी पानझाडे, बबीता पंडित यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी आपल्या यशाचे श्रेय सर्व गुरुजन आई वडील यांना देतात. विद्यार्थिनींना पुरस्कार मिळाल्याबद्दल शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# जनतेच्या चेहऱ्यावरच विजय दिसू लागल्याने, मी निवडून येणारच

## पंकजाताई मुंडे : पिंपळवाडीच्या जाहीर सभेला जनसागर उसळला, राजेंद्र मस्केंनी ताकद दाखवली





आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंनी लिंबागणेश सर्कल मध्ये पिंपळवाडी मध्ये काल महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना समर्थन देण्यासाठी आयोजित केलेल्या जाहीर सभेला पंचक्रोशीतल्या डोंगर पट्ट्यातून जनसागर उसळला. बालाघाटावर मस्केंची राजकीय ताकत पाहायला मिळाल्या नंतर सभेत बोलताना उमेदवार पंकजाताईने प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात मला खऱ्या अर्थाने मतदार तथा सामान्य जनतेच्या चेहऱ्यावर आशीर्वादाचे बळ दिसत असल्याने माझा विजय निश्चित झाला. वातावरण चांगले, उमेदवार चांगला, लोकांच्या मनातला उमेदवार हे सार असताना एक संधि मला द्या. मी आपल्या जिल्ह्याचे भाग्य बदलून टाकणार या शब्दात त्यांनी ग्रामस्थाना आवहान केले. निवडणूक एक युद्ध असून सत्यापानची स्थापना करण्यासाठी तुमची साथ महत्वाची वाटते असेही त्यांनी सांगितले. पिंपळवाडी येथे आयोजित केलेल्या जाहीर सभेत त्या बोलत होत्या. व्यासपीठावर माजी आमदार जणार्धन तुपे, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, डॉक्टर योगेश क्षीरसागर, सर्जेराव तांदळे, डॉक्टर अभय वणवे, कल्याण आखाडे, अमर नाईकवाडे, नवनाथ शिराळे, जयश्री मुंडे, संध्याताई राजपूत, शांतीनाथ डोरले, ह. प. प. सहदेव महाराज, उपसरपंच गणेश बहिरवाळ, रवींद्र कळसाने, विशाल पाखरे, शरद बडगे, शंकर तुपे, महादेव बहिरवाळ आदि मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी ग्रामस्थानच्या वतीने पंकजाताई मुंडे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. उपस्थित जनसमुदया समोर बोलताना पंकजाताईने भूमिका स्पष्ट केली. आपल्या जिल्ह्यातील सर्व सामान्य माणूस प्रामाणिक असून लोकांनी ठरवल्या नंतर राजकीय चमत्कार घडवून दाखवतात. जणार्धन तूपे तात्यांना आमदार केलेच होते. मी तुमच्या समोर सेवा करण्यासाठी संधि मागत असून, माझ्या विरोधात कुणाची तक्रार नाही, उमेदवार पसंतीचा आहे. तर मतदानाच्या रूपाने आशीर्वाद द्या. संधि मिळाल्या नंतर जिल्ह्याचा विकास करून दाखवणार. रोजगार, पाणी, सिंचन, रस्ते सर्व प्रश्न मार्गी लावणार. विजयाचा मला आता आत्मविश्वास निर्माण झाला. लोकांच्या चेहऱ्यावर विजय दिसत असून, आपला जिल्हा पुरोगामी विचाराचा असल्याने राजकारणात महिलांना संधि देऊन, सन्मान केला जातो. कोणी आडवे आले तरी महिलांच्या पाठीमागे लोक खंबीरपने उभे राहतात. माझे राजकारण सर्व समावेशक गरिबांच्या कल्याणासाठी आसून, विरोधात बोलण्यासाठी बुद्धीभेद करने एवढाच विषय विरोधकांच्या हातात आहे. माझ्या आयुषात जातीपतीचे राजकारण मी कधीच केले नाही. पाच वर्ष संधि देऊन बघा. विश्वासाला तडा जाऊन देणार नाही. माजी आमदार जनार्धन तूपे म्हणाले की, जात पात पाहू नका, विसंगत वागू नका, मराठा समाज सर्वांना सोबत घेऊन जाणारा ही आपली मूळ ओळख आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा विकासाचा वारसा पंकजाताई खंबीरपणे चालवतात म्हणून आम्ही त्यांच्या पाठीशी राहू ही ग्वाही त्यांनी दिली. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंनी डोकेवाडा साठवण तलाव स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी मंजूर केला म्हणून, डोंगरात हरित क्रांति झाली. पंकजाताईने पालवण चौक ते लिंबागणेश चोवीस किलोमीटर रस्ता केला. पिंपळवाडी ते भाळवणी पाच कोटीचा पूल मंजूर केला. डॉ. योगेश क्षीरसागर, कल्याणराव आखाडे, अमर नाईकवाडे यांची जोरदार भाषणे झाली. कार्यक्रमाचे बाहरदार सूत्र संचालन मारुतीराव तिपाले यांनी केले.

# उन्हाच्या काहिलीत ऊल्लेवाड परिवाराकडून थंड पाणपोयीची सोय

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत असल्याने तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो आहे.अशातच नागापूर (ता.भोकर) येथील भुमीपूत्र गोविंद ऊल्लेवाड यांनी स्वखर्चाने आईच्या स्मरणार्थ ग्रामस्थांना थंड पाण्याच्या कूलरची व्यवस्था करून दिल्याने ग्रामस्थांत समाधान व्यक्त केले जात आहे. ऊन्हाच्या तीव्रतेने जिवाची लाही लाही होत असल्याने जनतेचा घसा कोरडा पडतो आहे. ऊन्हापासुन सूटका करण्यासाठी थंड पेय, शरबत, मठ्ठा, रसवंती गृहाकडे नागरीकाची गर्दी होत आहे.

ग्रामीणभागात घोटभर पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे, अशा परिस्थितीत नागापूर येथील रहिवासी तथा शासकीय कंत्राटदार गोविंद ऊल्लेवाड यांनी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ (कै.मंजूळाबाई सटवाजी ऊल्लेवाड) या नावाने गावातील ग्रामस्थांना थंड पाण्याचे कूलर बसवून



पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असल्याने ग्रामस्थांत समाधान व्यक्त केले जात आहे. सदरील पाणपोईच्या ऊदघाटन प्रसंगी सरपंच दत्ता व्यवहारे, ऊपसरपंच बालाजी शानमवाड,ग्रामसेवक नरेंद्र काळे, गोविंद ऊल्लेवाड यांची उपस्थिती होती.

# कडक उन्हात पाण्यासाठी पायपीट

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** कडक उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे हातपंप, नद्या, प्रकल्पासंह विहिरींनी तळ गाठला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. जिल्ह्यातील २०० गावांपेक्षा अधिक गावात पाणीटंचाईचा अंदाज असून जिल्हा प्रशासनाने १६६ कोटींचा कृती आराखडा तयार केला आहे. मात्र बहुतांश गावे पाणीटंचाईने होरपळत असताना प्रशासन उपयायोजना कधी करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरवर्षी उन्हाळयाच्या दिवसात जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या उद्भवते. बहुतांश गावातील नागरिकांची मदार विहिरी, हातपंप व खासगी नळ योजनांवर अवलंबून आहे. मात्र कडक ऊन तापत असल्यामुळे गावातील विहरी, हातपंप, नदया कोरडया पडल्या आहेत. तर बहुतांश गावात जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाईपलाईनचे खोदकाम करण्यात आल्यामुळे गावातील पाईपलाईन फुटल्याने पाण्याची समस्या निर्माण झाली आहे.

# रासायनिक पदार्थ तयार करणाऱ्या कंपनीला आग

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** शहरातील फुलचुर नाका परिसरात एका केमिकल कंपनीत भीषण आग लागल्याची घटना आज (दि. ४) सकाळ ७ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. सुदैवानं या आगीत कुठलीही जीवितहानी झाली नसली तरी आर्थिक नुकसान मात्र मोठ्या प्रमाणात झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.गोंदिया-गोरेगाव मार्गावर फुलचुर टोलनाका परिसरात गोंदियातील अविनाश बजाज यांच्या मालकीची ही केमिकल कंपनी असून याठिकाणी फर्निचर करिता वापरण्यात येणारे केमिकल, पॉलीश आदी साहित्य असल्याचे त्यांनी सांगितले. शॉटसर्किटमुळे ही आग लागली असावी अशी शक्यता त्यांनी यावेळी व्यक्त केली. बजाज यांच्या मते यात त्यांचे जवळपास ५० लाख रुपयांहून अधिकचे नुकसान झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. सकाळी फूल तोडण्यासाठी गेलेल्या काही लोकांना कंपनीतून आगीचे लोट बाहेर येताना दिसले. याची माहिती त्यांनी बजाज यांना दिली त्यांनी कंपनीकडे धाव घेत नागरिकांच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत आगीने रौद्र रूप धारण केले होते. त्यामुळे आग विझविण्याच्या प्रयत्नात एक युवकही किरकोळ भाजल्याची माहिती पुढे येत आहे.



# आयपीएस अधिकारी अब्दुल रहमान यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## वंचित बहुजन आघाडीची धुळ्यात सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शुक्रवार 3 मे रोजी वंचित बहुजन आघाची उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांच्याकडे दाखल करण्यात आला अर्ज दाखल करताना उमेदवार अब्दुल रहमान यांच्या समवेत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अरविंद निकम जिल्हा संघटक शंकर खरात यांच्यासह इतर प्रतिनिधी उपस्थित होते अर्ज दाखल केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय आवारात माध्यम प्रतिनिधींशी बोलताना अब्दुल रहमान म्हणाले की दलित आदिवासी वंचित मुस्लिम कष्टकरी समाजाचे अनेक प्रश्न आजही सुटलेले नाहीत या प्रश्नांवर अभ्यास करून त्यांची सोडवणूक करण्याकरिता वंचित बहुजन आघाडी तर्फे तुम्ही निवडणूक लढवीत आहे आजही जनतेला पुरेशा मूलभूत सुविधा मिळत नाहीत या समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहेत त्या समस्या सोडवून सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे मोफत आणि दर्जेदार शिक्षण याबरोबरच उत्कृष्ट सेवा सुविधा देण्यावर आमचा भर आहे आणि म्हणूनच मी या निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे असेही रहमान यांनी स्पष्ट केले अर्ज दाखल केल्यानंतर अब्दुल रहमान यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन आघाडीची रॅली काढून जिजामाता शाळेजवळ रॅलीचा समारोप करण्यात आला या ठिकाणी रॅलीचे सभेत रूपांतर झाले या रॅलीला अनेक नेत्यांनी संबोधित करून वंचित चे उमेदवार अब्दुल रहमान यांना विजयी करण्याचे आवाहन केले याप्रसंगी मंचावर फारुख अहमद, अरविंद निकम, कपिल अहिरे, दिलीप बोरसे, शंकर खरात, अँड संतोष जाधव,आबासाहेब खैरनार, चंद्रमणी वाघ, अमोल पवार, भैय्या साहेब पारेराव, योगेश जगताप, फक्रऊद्दीन खाटीक, राहुल पाटोळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.





# 'मतदान जनजागृती'साठी धावले रवळा, जवळा येथे अजिंठा वनविभाग

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील विविध गावांमध्ये दि.२/५/२०२४ रोजी मतदान विषयी जनजागृती करण्यात आली.रवळा, जवळा येथे जालना व छत्रपती संभाजीनगर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना विधानसभा अंतर्गत मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी आणि छत्रपती संभाजीनगर निवडणूक विभागाच्या संयुक्त विद्यमाने वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील विद्यार्थ्यांनी रवळा,जवळा मध्ये मतदान जनजागृती रॅली काढून सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो..., वोट देणे जाना है... देश को आगे बढाना है... अशा घोषणा देत परिसर दुमदुमून टाकला. यावेळी नागरिक, या मतदार लोकांना या रॅलीतून मतदान करण्यासाठी जागृती करण्यात येत होती. रॅलीमधील विद्यार्थी जनजागृती करीत असल्याचे पाहून मतदारांमध्ये एक प्रकारचा उत्साह रवळा, जवळा येथे निर्माण झाला.शाळेच्या प्रांगणापासून रॅलीला सुरुवात झाली.पुन्हा गावात व शाळेच्या च्या प्रांगणात येऊन रॅलीची सांगता करण्यात आली. रॅलीमध्ये मतदार जनजागृती वनविभागाचे पथक प्रमुख निलेश सोनवणे, वनपाल अविनाश राठोड यांनी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी गावोगावी जावून मतदानाचे महत्तव व मतदान आपला हक्क बजावण्याची माहीती वनविभागाच्या कर्मचाम्यांनी दिली. सदरील कार्यक्रमास वनपाल पी.क.शिंदे वनरक्षक शितत्य जाधव,वनरक्षक पी.ए. गवळी, व वनमजूर राजू काळे, व गावातील ग्रामस्थ जसे संभाजी पवार, कृपाल नाईक, नवनाथ सांगळे, दिनेश जाधव इ. उपस्थित होते, अशी माहिती संभाजी पवार यांनी बोलताना दिली.

# हास्यविनोद बेतला जीवावर; लोकलमधील सशस्त्र हल्ल्यात शहापुरातील एकाचा मृत्यू

## क्रिस्टल केअर रुग्णालयाचा उपचारात हलगर्जीपणा

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील साजीवली येथील दत्ता भोईर आपले सहकारी प्रदीप सूरोसे, तुषार विदे व पुंडलिक सूरोसे हे मित्राच्या हळदीला उल्हासनगर येथे गेले होते. परतीच्या प्रवासात शहाड येथे त्यांनी शेवटची कसारा लोकल पकडली, त्याचवेळी आंबिवली स्थानकात चौघेजण त्याच डब्यात चढले, प्रवासात हास्य विनोद करीत असताना त्या अनोळखी चार इसम यांस आपल्यावरच विनोद चालू असल्याचा राग येऊन त्यांनी भोईरसह तिघांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली त्याचे पर्यवसन हाणामारीत झाले. या झटापटित भोईर भांडण सोडविण्याच्या उद्देशाने मध्यस्थी पडले. त्यावेळी त्यांच्यावर व प्रदीप सुरोसे वर हल्लेखोरांनी चाकू हल्ला केल्याने ते गंभीर जखमी झाले. यातील दत्ता भोईर ( वय ५५ )यांचा ठाणे येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. टिटवाळा ते वासिंद स्थानका दरम्यान चालत्या लोकलमध्ये हा थरार घडला. यातील चार हल्लेखोरांपैकी दोन





**क्रिस्टल केअर रुग्णालयाचा हलगर्जीपणा** : या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या दत्ता व प्रदीप यांना शहापुरातील क्रिस्टल केअर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता दोन दिवस ऍडमिट ठेऊन ही योग्य उपचार न करता अत्यवस्थ झाल्यावर त्यांना ठाणे येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आल्यानंतर गुरुवारी सकाळी त्यांचे उपचारा दरम्यान निधन झाले .दत्ता भोईर यांच्यावर क्रिस्टल केअर रुग्णालयाच्या डॉक्टरांनी उपचारात हलगर्जी पना केल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे .

पसार झाले असून अमोल परदेशी व तनुज जुमवाल यांना रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. कल्याण कसारा रेल्वे पॅसेंजर सोसिएशन च्या पदाधिकाऱ्यांनी घेतली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरी कांदे यांची भेट घेऊन प्रवाश्यांच्या सुरक्षे संदर्भात उपनगरीय लोकल मध्ये सुरक्षा गस्त वाढविण्यात यावी अशी मागणी केली असता वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.पंढरी कांदे यांनी आपल्या सहकार्यांना दोन पोलीस देण्याचे आदेश दिले. यावेळी कल्याण कसारा रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे अध्यक्ष शैलेश राऊत,सह प्रसिद्धी प्रमुख महेश तारमळे,सल्लागार जितेंद्र विशे उपस्थित होते.

# बाभळेश्वर जवळ निर्मळपिंपरी शिवारात बसला उन्हामुळे आग

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील निर्मळ पिंपरी शिवारात हॉटेल साई आदर्श समोर नगर मनमाड रोडवर पुण्यावरून राजस्थानकडे निघालेल्या बसला वाढत्या उष्णतेमुळे दोन मे रोजी दुपारच्या वेळी आग लागून लक्झरी बस प्रवासाच्या डोळ्यासमोर जळून खाक झाली मात्र सुदैवाने यातील असलेले प्रवासी हे जेवनासाठी जवळच्या हॉटेलमध्ये उतरलेले त्यातील काही प्रवासी भोजन चहापान नाष्टा करत होते. त्याचवेळी प्रवासी नसलेल्या मोकळ्या बसला अचानक आग लागली त्यामुळे या आगीत कुठल्या प्रकारची जीवित हानी झाली नाही यामुळे समाधान मानावे लागेल प्रवाशांनी आपण बचावलो यातच समाधान मानले. मोठ्या प्रमाणावर उष्णता वाढल्यामुळे वाहनांचे मशीन देखील मोठ्या प्रमाणावर गरम होत असते त्यातूनच बहुतेक या लक्झरी बसचे मशीन प्रवासामुळे गरम झाल्याने बहुदा शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली असावी अशी शक्यता यावेळी व्यक्त करण्यात आली या बसमध्ये अनेक प्रवाशांचे साहित्य बॅगा चीज वस्तू देखील आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे काहींचे आर्थिक नुकसान देखील झाल्याची चर्चा प्रवाशी व्यक्त करीत होते. आगीची घटना तात्काळ जवळपासच्या नगरपालिका व सहकारी साखर कारखान्याना माहिती मिळताच त्यांनी लागलेल्या बसच्या आगीला बुजवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला पण आग मोठ्या प्रमाणावर पसरल्याने मात्र ह्या आगीत फक्त आता बसचा सागाडा शिल्लक असल्याचे चित्र दिसून येत होते घटने प्रंसगी राहता पोलीसांनी देखील गर्दी आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले यावेळी मोठ्या प्रमाणावर गर्दी देखील झाली होती या घटनेत किमान बसचे ४०ते ५०लाख रुपयांचे नुकसान झाले असावे असा अंदाज आहे सदरची लक्झरी बस नवीन दिसत होती तर मग या बसने पेट कसा घेतला अशी चर्चा प्रवाशी व्यक्त करत होते.



# जिंतूरच्या जवानांचा हॉटेलमध्ये मारहाणीत मृत्यू; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील शिवाजी चौक येथील सपना हॉटेलमध्ये (एमएसएफ) च्या जवानांचा नाश्ता लवकर देण्याच्या कारणावरून हॉटेलमधील काहींनी केलेल्या मरहणीत जवाणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली शे.अजगर शे.खाजा वय 33 असे मृत जवानाचे नाव आहे. याप्रकरणी चौंघा विरुद्ध जिंतूर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. शेख अजगर शेख खाजा हे मुंबई येथे (एमएसएफ) मध्ये कार्यरत असून कामानिमित्त ते केळी तालुका औंढा नागनाथ येथे आले होते. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार अजगर चा भाऊ केळी येथे असतो त्यांना मिळालेल्या माहितीनुसार अजगर हे शुक्रवारी सकाळी जिंतूर शहरातील सपना हॉटेलमध्ये नाश्ता करण्यासाठी गेले होते. नाश्ता मागणीची पूर्तता लवकर करायला सांगितल्यावर त्यांचा राग येऊन एवढी घाई करतो का अदी कारणावरून वाद झाल्याचे कळते या वरुन हॉटेल मालक शेषराव लक्ष्मण आव्हाड व त्यांचा मुलगा अमोल आव्हाड , कर्मचारी बालाजी रणखांबे, इमरान कुरेशी यांनी अजगर यांना जबर मारहाण केली त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अन्य काही जणांच्या सांगण्यावरून हॉटेल मालक व अजगर यांच्या बिलांच्या कारणांवर झाल्यांची कळते या प्रकरणी हॉटेल मालक शेषराव आव्हाड यांच्यासह चार जना विरुद्ध जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून चारही संशयित आरोपी पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. दरम्यान घटनेनंतर पोलीस ठाण्यात जमलेल्या जमावाशी पोलीस अधीक्षक रविंद्र सिंह परदेशी स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अशोक घोरबांड यांनी चर्चा केली.

# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथील साईबाबांच्या समकालीन साईभक्त श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट व आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एक मे २०२४ रोजी भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले गरजू वयोवृद्धांसाठी मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर सकाळी ९ ते २ या वेळेत आयोध्या हॉस्पिटल बिल्डिंग शिर्डी येथे संपन्न झाले शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घेतला अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गायकवाड विश्वस्त संगीता गायकवाड साईराज गायकवाड यांनी दिली. अरुण गायकवाड म्हणाले की गरजु अनाथ गोरं गरिब सर्व सामान्य माणसाला वाढता वैद्यकीय खर्च परवडत नाही म्हणून श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून प्रति महिन्याला सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून अशा प्रकारचे शिबिराचे आयोजन करण्यात येत असून हे तीसरे शिबिर आहे दोन हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली जवळपास १७५ लोकांवर आत्तापर्यंत मोफत नवी मुंबई येथे शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून लोकांना नेत्र तपासणी करून मोफत चष्मे देखील वाटप करण्यात आले होते अशा प्रकारे प्रत्येक महिन्याला असे मोफत शिबिर होणार आहे पुढील शिबिर २जुन रोजी होणार आहे शिर्डी येथील श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टने १५ हजार लोकांच्या मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिर करणार असल्याचा संकल्प केला आहे.

# प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात पंकजाताई मुंडे आघाडीवर ..!

## विकासाचा मुद्दा प्रभावी ठरत असल्याने सहानुभूतीची लाट पसरली ..!

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** बीड लोकसभा मतदार संघात तिरंगी लढतीचा सामना होत असून निवडणूक प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी सर्वत्र आघाडी घेत त्यांच्या नेतृत्वाबाबत सहनुभूतीची लाट पसरली. जाती पातीच्या राजकारणाचा मुद्दा गळून पडत असल्याने सर्व सामान्य माणसांच्या मनात विकासाच्या मुद्द्यावर क्षमता असलेले नेतृत्व म्हणून पंकजाताई याच पसंतीच्या उमेदवार ठरवू लागल्या. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार त्यांच्यासमोर आपल्या खासदारची होणारी उठ बस जिल्हयाच भाग्य बदलणारी असून, दुसऱ्या टप्प्यात विकास हाच प्रश्न प्रभावी ठरवू लागला. पालकमंत्री असताना ज्या प्रकारे सर्व समावेशक कारभार जिल्ह्यात केला. गांव तिथे विकास हा अनुभव प्रत्यक्ष लोकांनी घेतला. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ताईंना दिल्लीला पाठवलेच पाहिजे हा विचार पुढे आलेला दिसतो. महिला वर्गही मोठ्या प्रमाणावर त्यांना पाठिंबा देत आहे. या मतदार संघात तिरंगी लढतीचा सामना अटळ असून, वंचितकडून अशोक हिंगेनी देखील प्रभाव पाडायला चांगलीच गती घेतली. डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या जाहीर सभेनंतर अशोक हिंगेची बाजू देखील भक्कम होताना दिसते. महावीकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ही निवडणूक केवळ जाती पातीच्या राजकारणा भोवती फिरवली असल्याने मतदारांना सहन न होण्या पलीकडचे झाले. 2019 च्या निवडणूकित देखील सोनवणे यांनी आपल्या राजकीय भवीतव्यासाठी जाती पातीची खेळी केलीच होती. बीड जिल्ह्याचा



राजकीय मागोवा घेतला तर पुरोगामी विचाराच्या जिल्ह्यात जाती पेक्षा कर्तुत्वाला लोकांनी महत्व दिले. स्व. केशर काकू, सौ. रजनीताई पाटील, डॉ. खा. प्रीतमताई मुंडे या महिलांनी मिळालेल्या संधीचा उपयोग जिल्हा पुढे घेऊन जाण्यासाठी केला. पंकजाताई हे नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर काम करत असून, विकासाची दृष्टी त्यांच्याकडे आहे.

प्रचाराच्या काळात लोकांना त्यांनी केलेल्या विकास कामाची पावलो पावली आठवण होते. दोन उमेदवाराची तुलना लोक जेव्हा करतात त्यावेळी बजरंग सोनवणे पेक्षा पंकजाताई सर्व श्रेष्ठ नेतृत्व असून विकास क्षमता त्यांच्यात आहे. केंद्रात नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार त्रिवादी सत्य असल्याने त्यांच्याकडून बीड जिल्ह्यासाठी पंकजाताई विकास गंगा खेचून आणू शकतात. वर्तमान देशात नरेंद्र मोदींनी दहा वर्षात केलेला कायापालट, राष्ट्रीय स्तरावर रेंगाळत पडलेले प्रश्न, अयोध्येत राम मंदिर, काश्मीर मधील 370 कलम, तीन तलाक, जगाच्या पाठीवर आपल्या देशाची प्रतिष्ठा वाढवली. त्याच पार्श्वभूमीवर पंकजाताईकडे पाहणे महत्वाचे हा सारासार विचार आता शहरपासून गावखेड्या पर्यंत पुढे आला.

परिणामी हाच विचार सर्वत्र सुरू झाल्याने पंकजाताईने प्रचारात प्रचंड मुसंडी मारलेली दिसते. या मतदार संघात आष्टी, गेवराई, बीड, केज,परळी माजलगाव विधानसभा मतदार संघात पंकजाताईसाठी आम जनता रस्त्यावर आली आहे. सोनवणे यांनी जात अस्त्र सुरवातीला काढले मात्र आता वैचारिक पातळीवर मतदार विकासाच्या बाजूने झुकलेला दिसतो. म्हणूनच उघडपणे अठरा पगड जाती धर्माचे लोक पंकजाताईला विजयी करण्यासाठी प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष कठोर परिश्रम घेताना दिसत आहेत.



# बाजारसावंगी सर्कलमध्ये विविध कामांवर वाळुऐवजी दगडी चुरा; नागरिकांत संभ्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात ठिकठिकाणी सुरू असलेल्या विविध विभागांच्या विविध कामांवर कुठे वाळु तर कुठे दगडी चुरा पावडराचा वापर होत असल्याने नागरिक संभ्रमीत आहे तर ठेकेदार पुढारी असल्याने अधिकारी कर्मचारी हतबल दिसून येत आहे.यासंदर्भात नागरिकांनी नेमकी तक्रार कुणा कडे करावी असा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील बाजार सावंगी सर्कलमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सद्या १०-१५ छोटेमोठे पुलकामे सुरू आहे.तर अनेक पुल कामे पुर्ण झाली आहे.तर जलसंधारण विभाग लघुपाटबंधारे विभागाचे चारपाच सिमेंट बांध कामे सुरू आहे. काही सिमेंट बांध बांधकामे पूर्ण झाली आहे. यात काही ठिकाणी वाळुचा वापर होत आहे नाममात्र तेही (माती मिश्रीत वाळुचा) परंतु अनेक ठिकाणी अधिकचे वाळु ऐवजी सर्रासपणे दगडी चुरा पावडरचाच वापर होताना दिसत आहे.

यासंदर्भात दैनिकांने वेळोवेळी वरिष्ठ व विभागाला अवगत केले आहे.मात्र ते मुग गिळून आहे.तर तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांनाही फोनद्वारे कळवुण अवगत केले.मात्र त्यांच्याकडून वाळु ऐवजी दगडी चुरा पावडर चा समर्थन होत आहे. व ते दगडी पावडर चालतं असे म्हणत आहे.त्यात दुसरीकडे मात्र वाळुचा वापर दिसून येतो मग हा संभ्रम का? त्यात वाळु दगडी चुरा संदर्भात तक्रार करून ही अधिकारी कर्मचारी हतबल दिसून येत आहे.यात सुरु असलेले कामे ठेकेदार कम पुढारी असल्याने काहीच कारवाई होताना दिसत नाही. त्यातअधिकारी, लपून छपून ठेकेदाराचे संमर्थन करत असल्याने नागरिकांनी तक्रार कुणाकडे करावी असा प्रश्न समोर उभा राहिला आहे.व यांतून गडगंज कमाई होताना दिसत आहे.यात शासन तथा जनतेच्या निधीचा असाच वापर होणार का? शेतकऱ्यांच्या पाणी सिंचन व रस्ते पुल कामाचे अंदाजपत्रकाप्रमाणे अधिकारी व कर्मचारी कामे का म्हणून करून घेत नाही व यास कोण जबाबदार जिल्हाधिकारी यांनी या संदर्भात खुलताबाद तालुक्यातील झालेल्या व होत असलेल्या कामा संदर्भात समिती स्थापन करुन योग्य ती चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी शेतकरी तथा नागरिकांतून होत आहे.

# गावठी हातभट्टीवर फर्दापूर पोलिसांचा हातोडा; पंचाहत्तर हजारांचे रसायन उद्ध्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** फर्दापूर गावाला लागुन असलेल्या वाघूर नदी वस्ती शेजारी असलेल्या नदीत अवैधरित्या गावठी हातभट्टी दारु निर्मिती केली जात असल्याची माहिती फर्दापूर पोलिस स्टेशनला मिळाली होती. त्या आधारे या हातभट्टीवर फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२/५/२४ रोजी सकाळी पाच वाजता पोलिस उपनिरीक्षक सुग्रीव चाथे व दारुबंदी पथक यांच्या वतीने हातोडा चालवून उद्ध्वस्त करण्यात आली. तसेच येथून दोन जणांना ताब्यात घेण्यात आले. गावठी हातभट्टी दारू तयार करण्याचे रसायन पकडले आहे. जवळपास ८०,००० रुपये किंमतीचे ३५ लिटर रसायन पोलिसांनी जप्त केले असून आरोपीविरोधात फर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम 65(क), (फ) प्रमाणे दोन जणांवर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फर्दापूर येथे वाघूर नदी जवळ सकाळी आरोपीने एक 3,000 लिटरची लोखंडी टाकी व 4,000 लिटरचा मोठा मातीत खोदलेला खड्डा व त्यावर नायलॉनची ताडपत्रीवरील गावठी हातभट्टी दारू तयार करण्याचे रसायन असे एकूण १५०० लिटर रसायन असा



जवळपास ७८ हजार रुपये किंमतीचा माल बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरला आहे. घटनास्थळी पोलिसांना रसायन व भट्टी तयार करून ठेवलेली मिळाली आहे. आज सकाळी आम्ही ,सोबत PSI चाटे व स्टाफसह पोलीस ठाणे हद्दीत सकाळी 05.00 ते 7.00 वाजण्याच्या दरम्यान वाघूर नदी पात्रात चालू असलेल्या हातभट्टीवर रेड करून 1500 लिटर रसायन किंमती 75,000/- रुपये व तयार झालेली 35 लिटर दारू किंमती 3500/- रुपये असा एकूण 78,500/- रुपये मुद्देमाल जप्त केला असुन 180 ML दारू व रसायने चे CA सँपल कामी नमुने घेऊन सदरचा मुद्देमाल नाशवंत असल्याने उर्वरित रसायन व दारू जागेवरच पंचासह नष्ट करण्यात करण्यात आली आहे.सदर ठिकाणी मिळून आलेल्या दोन आरोपींना पोलीस ठाणे येथे घेऊन आलोत.त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायद्या प्रमाणे गुन्हा नोंद करीत आहोत.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव चाथे करीत आहेत.

# 'शेतीतील केळीप्रमाणे फुलवली शाळा'

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** जामनेर शेतात ज्याप्रमाणे केळीला वेळोवेळी विविध खतं देऊन मशागत करावी लागते, तद्वतच मी शाळेत विद्यार्थी घडविण्यासाठी, शाळेचा मळा फुलविण्यासाठी गेली 32 वर्षे अविरत प्रयत्नशील राहिलो , शाळेचा निरोप घेताना मला गहिवरून आले असल्याचे प्रतिपादन मावळते मुख्याध्यापक एस.व्ही. पाटील यांनी व्यक्त केले.

पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी संचलित आर.टी. लेले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक एस. व्ही. पाटील ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले. काल महाराष्ट्र दिनी त्यांचा संस्थेने सेवापूर्ती सोहळा आयोजित केला. संस्थेचे व्हाईस चेअरमन साहेबराव पाटील अध्यक्ष स्थानी होते. प्रारंभी सरस्वती देवी, संस्थापक अध्यक्ष किसनराव पाटील, कॅप्टन दादासाहेब डॉ. एम. आर. लेले यांच्या प्रतिमांचे पूजन करून विद्यार्थिनींनी स्वागत गीत आणि इशस्तवन सादर केले. याप्रसंगी शिक्षिका डॉ. ज्योती चौधरी, जी. एच. भामेरे, निवृत्त मुख्याध्यापक व्ही. जी. भालेराव,



आर. बी. पाटील, मुख्याध्यापक एस. आर . सोनवणे, ॲड. एस. आर. पाटील, डॉ. तेजस्विनी पाटील आदिंनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मुख्याध्यापकपदी निवड झाल्याबद्दल एस. आर. सोनवणे व पर्यवेक्षक पदी निवड झाल्याबद्दल एम . बी . पवार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विविध संस्था - संघटनांनी पाटील यांचा सपत्नीक सत्कार केला. प्रा. आर. सी. राजपूत, निवृत्त मुख्याध्यापक एस. एस. गावंडे, व्ही. के. बडगुजर, ए. आर. खांजोडकर, सी. टी. पाटील, आर. एम. कलाल, संस्था प्रतिनिधी किशोर पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजधर पांढरे, भास्कर पाटील, शरद बेलपत्रे, लक्ष्मण गोरे, रामेश्वर पाटील, श्यामराव सावळे, उपसरपंच शरद पांढरे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.सूत्रसंचालन आर . टी . देशमुख यांनी केले तर एम . एस . आगारे यांनी आभार मानले . या वेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आप्तेष्ट माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंदोरी येथे बाबासाहेबांच्या जीवनावर परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** १४ एप्रिल हा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस महिनाभर मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतो. अनेक ठिकाणी अगदी बुद्ध पौर्णिमे पर्यंत हा जयंतीचा माहोल पाहायला मिळतो.नुकताच अंदोरी ता.खंडाळा येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. लहान मुला मुलींमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अधिकची माहीती व्हावी,म्हणून जयंतीचे औचित्य साधून जय भीम तरुण मंडळ अंदोरी (सिद्धार्थनगर) येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर आधारित परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.या मध्ये प्रथम क्रमांक सानिका मनोज खुंटे आणि सम्राट कांतीलाल खुंटे या दोघांनी मिळविला.तसेच द्वितीय क्रमांक समीक्षा गणेश खुंटे,तृतीय क्रमांक सिद्धी रणजित खुंटे आणि चतुर्थ क्रमांक सार्थक सिद्धार्थ खुंटे व सम्यक कांतीलाल खुंटे आदींनी प्राप्त केला.या यशाबद्दल त्यांना बक्षीस देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.प्रथम क्रमांक बक्षीस



डॉ.गौतम कंकाळ,द्वितीय क्रमांक बक्षीस दादासो खुंटे, तृतीय क्रमांक बक्षीस सिद्धार्थ खुंटे ( अंदोरी) (पोलीस पाटील) आणि चतुर्थ क्रमांक बक्षीस श्यामराव खुंटे आदींनी दिले.तसेच एक वही एक पेन तुषार खुंटे यांनी दिले. या परीक्षेत अथर्व खुंटे,प्रथमेश खुंटे, रोहन खुंटे,योगेश बाराते, अवंतिका खुंटे,मंथन खुंटे,अभिजित खुंटे, साईराज घोंगडे, आर्यन खुंटे, प्रज्ञा खुंटे,श्र द्धा खुंटे आदी परीक्षार्थीनी सहभाग घेतला होता. डॉ.गौतम कंकाळ, सिद्धार्थ खुंटे (अंदोरी पो. पाटील), यशवंत खुंटे (भारतीय बौद्ध महासभा) खंडाळा तालुकाध्यक्ष,कांतीलाल खुंटे,मनोज खुंटे,निलेश खुंटे, रामचंद्र खुंटे आदींच्या उपस्थित बक्षीस वितरण करण्यात आले. ही परीक्षा एकूण १०० गुणांची घेण्यात आली होती.तसेच प्रत्येक प्रश्नास दोन गुण देण्यात आले होते.तसेच चार पर्याय सुद्धा देण्यात आले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी किती पदव्या प्राप्त केल्या? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एम ए ची पदवी कोणत्या विद्यापीठातून मिळविली? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणाला आपले गुरु मानले? यांसारखी अनेक स्वरूपाची प्रश्न विचारण्यात आली होती.ही परीक्षा घेण्यासाठी किंवा प्रश्नावली तयार करण्यासाठी विशेष मेहनत घेतली होती.

# रावसाहेब दानवे पाटील यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा

## दादांचा विजय निश्चित : ईद्रीस मुलतानी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे परिसरात आगामी लोकसभा निवडणूक 2024 च्या निमित्ताने संपूर्ण भारतामध्ये निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहे त्यानिमित्ताने गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत एकच चर्चा सत्ता कोणाची बसणार आणि पंतप्रधान कोण होणार कोणत्या जिल्ह्याचे कोणत्या मतदारसंघाचे कोण खासदार होणार कोण कोणाला पाणी पाजणार आणि कोण कोणाला पाडणार अशा विविध चर्चेने प्रत्येक गावापासून शहरा पर्यंत खूप चर्चा रंगलेले असताना आज या पुढच्या सभेची रणधुमाळी म्हणून सावळदबारा व परिसरात जालना जिल्हा लोकसभेचे अधिकृत महायुतीचे उमेदवार विद्यमान खासदार व केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्या प्रचार निमित्ताने सावळदबारा व पंचक्रोशीतील सर्व बाराखड्यांमध्ये कॉर्नर सभा व विविध कार्यकर्ते व पदाधिकारी मनोमिलनाची स्नेह भेट आयोजित करण्यात आल्या होत्या या निमित्ताने सर्व महायुतीचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते आपल्या मनातील सर्व स्थानिक दोष बाजूला ठेवून या कॉर्नर सभेसाठी उपस्थित असल्याचे दिसून आले या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्यांक सेलचे प्रदेशाध्यक्ष ईद्रीस जी मुलतानी यांची उपस्थिती खूप महत्त्वाची होती त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कॉर्नर सभेस व्हीजेएनटी सेलचे भाजपा प्रदेशाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण , माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव बुढाळ, भाजपा तालुकाध्यक्ष बद्रीनाथ राठोड, उप तालुकाध्यक्ष विनोद ठिकारे, अनुसूचित जाती जमाती तालुकाध्यक्ष शांताराम खराटे , बीजेपी सेल तालुका अध्यक्ष प्रदीप चव्हाण भाजपा उपजिल्हाप्रमुख उत्तम चव्हाण भाजपा शिक्षक व संस्थाचालक प्रकोष्ट जिल्हाध्यक्ष भाऊराव कोलते व इतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांची प्रामुख्याने उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे सर यांनी केले व कार्यक्रमाचे सर्व रुपरेषा सर्वांसमोर मांडली आगामी येऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्याने तलाकाळापर्यंत माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या सर्व विकासात्मक कामाची व अखंड हिंदुस्तानाची स्वप्न पूर्ण कशी केली याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले तसेच मुलतानी यांनी बोलताना सांगितले की खासदार रावसाहेब दानवे पाटील म्हणजे विकासाचा वनवे कसा आहे याचे अनेक उदाहरण आपण आपल्या परिसरामध्ये पाहिले रस्ता वीज व पाणी या मूलभूत गरजा पूर्ण करणारा हा नेता आज गावातील तळागाळातील सर्व कार्यकर्त्यांना व मतदारांना ओळखतो हीच यांची खास केली आहे प्रत्येक गावातील प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्ता यांच्या समस्याशी त्यांची नाळ जोडलेली आहे विजय हा केवळ विकासाच्या



कामानेच होतो त्यामुळेच मागील पाच पंचवार्षिक त्यांनी लाखांच्या फरकाने जिकला आता त्या विकासाचा सिक्सर मारण्याची वेळ आलेली आहे विजय हा झालेलाच आहे केवळ चार जून रोजी त्याची औपचारिकता बाकी आहे परंतु त्यासाठी कोणीही गाफील न राहता प्रत्येक कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त आपल्या भागातून खासदार रावसाहेब दानवे पाटील यांना मतदान कसे होईल यासाठी जास्तीत जास्त मतदान आपल्या परिसरातून करून घ्यावे तसेच तळागाळापर्यंत मोदीजींच्या योजना व होऊ घातलेल्या विकासाच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचाव्या असे सांगून दादांच्या विकासाचा पाढा वाचला त्यानंतर अनेक पदाधिकारी यांनी सविस्तर मार्गदर्शन करून तेरा मे रोजी जास्तीत जास्त संख्येने मतदान करावे अशी विनंती केली आलेल्या सर्व मतदारांचे व कार्यकर्ते पदाधिकारी सर्व पत्रकारांचे आभार जीवन कोलते यांनी मानले.



# भगवान विश्वकर्मा मंदिरात मासिक भंडारा

## कार्यक्रमानिमित्त आरती - महाप्रसादाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथे दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी आयोजित मासिक आमटी भाकरी भंडारा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या निमित्ताने भगवान विश्वकर्मा मंदिरात अशोक वाबळे व सौ.नीलिमाताई वाबळे यांच्या हस्ते सपत्नीक आरती करण्यात आली.यावेळी शेकडो भाविकांनी भंडाऱ्यातील आमटी भाकरी प्रसादाचा लाभ घेतला. भंडारा उपक्रमाच्या अन्नदानासाठी दात्यांनी पुढे यावे, असे आवाहन भगवान विश्वकर्मा मंदिराचे प्रमुख इंजिनियर सुनीलराव वाघ यांनी केले. यावेळी बोलताना इंजिनियर सुनीलराव वाघ म्हणाले की गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज व हभप महंत श्री उध्दवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या प्रेरणेने व त्यांच्याच मार्गदर्शनाखाली भगवान विश्वकर्मा मंदिर निर्मिती पासून येथे महिन्याच्या पहिल्या येणाऱ्या बुधवारी आमटी भाकरी उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व समाज एकत्रित यावा धार्मिकता वाढीस लागावी असा त्या मागचा उद्देश होता आज या उपक्रमाला दात्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून तीर्थक्षेत्र नेवासे नगरीच्या वैभवात भर घालणारे हे मंदिर सर्व धर्मीय भाविकांचे श्रद्धास्थान बनले असल्याचे सांगून सुरू असलेल्या भंडारा उपक्रमासाठी अन्नदात्यांनी पुढे यावे असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी आमटी भाकरी प्रसादाचे अन्नदाते मराठा कुणबी महासंघाच्या अध्यक्षा सौ.नीलिमाताई वाबळे व अशोक वाबळे यांचा मंदिर व्यवस्थापक इंजिनियर सुनीलराव वाघ यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी सुभाष कडू पाटील, अशोक महाराज बर्डे, इंजिनीयर संजय खर्डे, माऊली कॉम्प्युटरचे प्राचार्य नितीन धस, निलेश कडू, भगवान विश्वकर्मा देवस्थानचे सेवेकरी राजेंद्र परदेशी, बबनराव काकडे, बाबासाहेब मोरे, बबन राजे, जोगिंदर वर्मा, सूरज परदेशी ज्ञानेश्वर वाघ यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनी बार्टीकडून राष्ट्रीय परिषद संपन्न

## डॉ. नरेंद्र जाधव यांची लाभली प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लंडन या ठिकाणी १३ आणि १४ एप्रिलला दोन दिवसाची आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली आणि त्यानंतर लगेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधान आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान या विषयावर नॅशनल स्टॉक एक्सचेंज मुंबई या ठिकाणी राष्ट्रीय परिषदेचे महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून आयोजन करण्यात आले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत बाबासाहेबांचे अर्थशास्त्रज्ञ म्हणून जागतिक दर्जाचे कर्तुत्व डॉ नरेंद्र जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले.द प्रॉब्लेम ऑफ द रुपी इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन या प्रबंधाचा आधार घेत बाबासाहेबांचा अर्थशास्त्रज्ञ तसेच अर्थव्यवस्थापक म्हणून असलेला दृष्टिकोन त्यांनी आपल्या शब्दांत विशद केला.१९२७ नंतर बाबासाहेबांनी अर्थशास्त्रात जरी लिखाण केले नसले तरी संविधान निर्माण करत असताना जास्तीत जास्त आर्थिक तरतुदींवर बाबासाहेबांमधील अर्थशास्त्रज्ञाने भर दिलेला असल्याचे जाणवते असे मत डॉ नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.आज रोजी दलाल स्ट्रीटवर उभ्या असलेल्या बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इमारतीच्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातून भारतात परतल्या नंतर १९१७ मध्ये स्टॉक अँड शेअर्स या कंपनीची स्थापना केली व शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक कशी करावी यासंबंधी सल्ला देण्याचे कामकाज केले असे अभिमानाने नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना सांगितले. यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ रवींद्र कुलकर्णी, गोखले इन्स्टिट्यूटचे कुलगुरू डॉ अजित रानडे, ICCAA चे संचालक सुनिल झोडे यांनीही मार्गदर्शन केले.चार सत्रांमध्ये झालेल्या या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेस विविध मान्यवरांनी आपला सहभाग नोंदविला. सर्व मान्यवरांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा व मराठी अनुवादित द प्रॉब्लेम ऑफ द रुपी हे पुस्तक भेट देऊन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी सन्मानित केले.तसेच यापुढेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय कार्यांना उजाळा देण्याचे कार्य बार्टी मार्फत सुरू ठेवणार असल्याचे प्रतिपादन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी केले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# पत्र्यांचे छत असलेल्या मतदान केंद्रांचे तापमान नियंत्रणात आणण्यासाठी पाचट टाकावे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने पत्र्यांचे छत असलेल्या मतदान केंद्रांचे आतील तापमान नियंत्रणात आणण्यासाठी अशा मतदान केंद्रांच्या छतावर १० मे पूर्वी पाचट टाकण्यात यावेत. अशा सूचना शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिल्या आहेत. शिर्डी लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदारसंघातील सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेला आदेश देण्यात आले आहेत. शिर्डी लोकसभा मतदारसंघात अकोले, संगमनेर, शिर्डी, कोपरगाव, श्रीरामपूर व नेवासा या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होता. यात एकूण १७०८ मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. ज्या मतदान केंद्रावर पत्र्याचे छत आहे. अशा केंद्रावर काम करणारे कर्मचारी तसेच मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना वाढत्या उकाड्यापासून दिलासा मिळून सुसह्य वाटावे, तापमानामुळे या यंत्रात बिघाड होऊ याची दक्षता घेणेही गरजेचे आहे. तेव्हा पत्र्याचे छत असलेल्या मतदान केंद्रांच्या आतील तापमान कमी करण्याच्या अनुषंगाने अशा छतांवर उसाचे पाचट/ गवत/ज्वारी/ बाजरीचे तडस टाकण्याचे काम १० मे पूर्वी करण्यात यावे. तसेच छतांवर टाकलेले पाचट/गवत/तडस जोराचा वारा आला तर उडून जावू नये, अशा तऱ्हेने पक्के बांधून ठेवण्याची दक्षता घ्यावी. शिर्डी लोकसभेच्या सर्व विधानसभा मतदार संघातील सर्व तालुक्यात ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, तलाठी, मंडळ अधिकारी, सेक्टर ऑफीसर यांनी संयुक्तपणे व समन्वयाने प्रथम प्राधान्याने तात्काळ आपल्या गावातील पत्र्यांचे छत असलेल्या मतदान केंद्राच्या छतावर उसाचे पाचट/गवत/ज्वारी/बाजरीचे तडस टाकण्याचे काम मुदतीत पूर्ण करावे.

# नीलेश लंके समर्थकांना पोलिसांच्या माध्यमातून दिला जातोय त्रास

## सरपंचावर कारवाईसाठी पाठवला अतिरेक्यांसारखा मोठा फौज फाटा

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** नगर दक्षिण मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या समर्थकांना आता पोलिसांच्या माध्यमातून त्रास देण्यास सुरुवात झाली आहे. राजकीय दबावातून हे सर्व घडवून आणले जात आहे. नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील ग्रामपंचायतचे सरपंच शरद पवार यांच्यावर कारवाई साठी तर अतिरेक्यांना पकडण्यासाठी पाठवतात तसा मोठा फौज फाटा पाठवून गावात पोलिसांमार्फत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न मंगळवारी (दि.३०) करण्यात आला.

याबाबत सरपंच शरद पवार यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात त्यांनी म्हंटले आहे की, नगर तालुका पोलिस ठाण्यात दाखल एका गुन्ह्यात आपणास मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे. यात जामिनात गावात प्रवेशास मनाई करण्यात आलेली आहे. मात्र मी गावचा सरपंच असल्याने ग्रामपंचायतच्या सर्व बैठका, पाणीपुरवठा विभागाच्या बैठकांना ग्रामपंचायत कार्यालयात येण्यास मुभा देण्यात आलेली आहे. या आदेशाची प्रत आपण नगर तालुका पोलिस ठाण्यात दिलेली असतानाही मंगळवारी (दि.३०) सकाळी आपण ग्रामपंचायत मध्ये मिटिंगला गेल्यावर नगर तालुका पोलिसांनी मोठा फौजफाटा गावात आणला. स.पो. नि. प्रल्हाद गिते यांनी ग्रामपंचायत कार्यालयात येवून आपणाला बाहेर आणले. पोलिसांच्या मोठ्या फौजफाट्या समोर लगेच गाडीमध्ये बसून पोलीस स्टेशनला यायचं असे धमकावताच ग्रामस्थांनी विचारणा केली असता पोलिसांच्या बोलण्यामध्ये विसंगती दिसून आली.

याबाबत सरपंच शरद पवार व कार्यकर्ते यांनी आक्रमक होत सांगितले की, निलेश लंके यांच्या समर्थकांना याप्रकारे खोट्या बोगस कारवाईमध्ये लोकसभा निवडणुकीच्या हेतूने गुंतवण्याचे काम चालू आहे. जर निवडणूक डोळ्यासमोर ठेवून षडयंत्र करत असाल तर आम्ही स्वस्त बसणार नाहीत, व नगर तालुक्यात अनेक ठिकाणचे बेकायदेशीर धंदे, वाढती गुन्हेगारी, चोऱ्या याकडे जाणीवपूर्वक पोलीस दुर्लक्ष करून राजकीय दबावातून आमच्या सारख्यांना खोट्या गुन्ह्यात गुंतवण्याचा प्रयत्न होत आहे. याबाबत आता आम्ही स्वस्त बसणार नाहीत, पोलिसांची ही दबंगगिरी थांबली नाही तर पोलीस अधीक्षक राकेश ओला, नाशिक परिक्षेत्रचे विशेष पोलिस महानिरीक्षक बाळासाहेब शेखर यांच्याकडे दाद मागणार आहोत, आणि त्या ठिकाणी न्याय मिळाला नाही



तर न्यायालयात या पोलिसांविरुद्ध दाद मागणार असल्याचे सरपंच शरद पवार यांनी सांगितले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संदेशभूमी येथे श्रामणेर शिबिराचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील संदीप भूमी येथे भारतीय घटनेचे शिल्पकार बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त संदेशभूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समिती धुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी बहुउद्देशीय संस्था धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर श्रामणेर शिबिरामध्ये धुळे जिल्ह्यातील विविध गावांतील २५ श्रामनेर व चार महिला अनाकारिक बसले होते. बुद्ध धम्म व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचे अध्ययन केले. बुद्ध धम्म हा मानसाला मानवतेची शिकवण देतो व जगाला युध्दाची गरज नसून बुद्धाची गरज आहे. दहा दिवसांत शिबीरात डॉ बाबासाहेबांनी लिहिलेल्या भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे सर्व अध्याय शिकविले गेले तसेच बुद्ध तत्त्वज्ञान ज्या त्रिपिटक ग्रंथात आहे त्याचे अध्ययन केले गेले त्याच बरोबर सकाळी ४ वाजता सर्व श्रामणेरांना उठवून त्याना ५ ते ६ विपश्यना शिकवली गेली. दहा दिवसांत त्याना बुद्ध धम्म आचरना विषयी माहिती देण्यात आली. सदर शिबिरामुळे शहरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते तर काल सायंकाळी शिबिराचा समारोप करण्यात आला. सदर शिबीराचे प्रशिक्षिक म्हणून पुज्य भंन्ते आनंद थेरो उपस्थित होते तसेच शिबिर यशस्वी करण्याकरिता संदेश भूमी संरक्षण आणि संवर्धन कृती समिती धुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश भूमी बहुउद्देशीय संस्था धुळेचे अध्यक्ष आनंद सैंदाणे,उपाध्यक्ष दिपक नगराळे, सचिव रविकुमार शिंदे, रविंद्र नगराळे, कोषाध्यक्ष विजय सुर्यवंशी, सन्माननीय सदस्य बाळासाहेब अहिरे, नाना साळवे, चंद्रभान लोंढे, विजय भामरे, चंद्रकांत बागुल, राहुल वाघ, वैशाली सैंदाणे, सुनीता शिंदे, शितल नगराळे, सुलोचना सूर्यवंशी, शितल नगराळे, नंदा गजभिये, भटूकुमार वाघ, लक्ष्मी वाघ, प्रशिक भामरे, अरिहंत सरदार, योगेश बिर्हाडे, देवा घोडसे आशाबाई भामरे बबीताताई सुर्यवंशी बाळासाहेब उशीरे आदींनी परिश्रम घेतले. कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध द्यावी हि विनंती.

# घनकचरा विलगीकरण शेड कामे थंडावली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात स्वच्छता अभियान अंतर्गत राबविण्यात येत असलेले घनकचरा विलगीकरण शेड प्रकल्प कामे थंडावली असल्याचे चित्र आहे. तालुक्यात स्वच्छता अभियान अंतर्गत घनकचरा विलगीकरण व्यवस्थापण शेड प्रकल्प कामे मोठ्या उत्साहात सुरु झाली होती. तालुक्यात ठिकठिकाणी घनकचरा व्यवस्थापन विलगीकरण शेड प्रकल्प उभारण्यात आली. रंगरंगोटी, सुबक पेंटिंगस, कार्टून आदिने प्रकल्प आकर्षित करण्यात आली.माझा कचरा माझी जवाबदारी, सुका कचरा,ओला कचरा तर काच कचरा,लेदर कचरा, मेडिकल कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा आदिने विलगीकरण व्यवस्थापण शेड प्रकल्प उभारण्यात येत होती यात तालुक्यात काही ठिकाणी जसे झरी, वडोद खुर्द, भडजी सह ठिकठिकाणी गावागावांत घनकचरा विलगीकरण व्यवस्थापण शेड प्रकल्प उभारण्यात आली व रंगरंगोटी पेंटिंग करण्यात आली त्यामुळे गावात शेड प्रकल्प आकर्षित करत आहे.तर काहींची कामे बाकी आहे.काही तसेच पडून काहींची रंगरंगोटी नावे टाकणे बाकी आहे. नवीन कामे थंडावली आहे.याकडे गटविकास अधिकारी यांचे दुर्लक्ष आहे. तीच स्थीती जिल्हा परिषद आरोग्य विभाग अंतर्गत गावागावांत बालविवाह प्रतिबंधक वॉलपेंटींगची झाली.तालुक्यात ज्यांना ज्यांना कडक आदेश केले त्यांनी बालविवाह प्रतिबंधक वॉलपेंटींगस केली. काही महाभाग गावे वॉलपेंटींगचे अद्याप कोरेच आहे. कार्यक्रमाकडे वरिष्ठांचे दुर्लक्ष झाले की ग्रामस्तरावर कामे थंडावती असल्याचे चित्र आहे हे विशेष.




# कोपरगाव शहरात मतदार जनजागृती अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** येथील कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित के.बी.रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने नुकतीच मतदार जनजागृती अभियानांतर्गत मोठ्या उत्साहात प्रभात फेरी काढण्यात आली आहे.

मतदान महत्त्वाचे आहे कारण लोकांसाठी त्यांच्या सरकारमध्ये मत मांडण्याचा आणि त्यांच्या आवडीचे प्रतिनिधित्व करणारे अधिकारी निवडण्याचा हा एक मार्ग आहे. लोकांसाठी त्यांच्या सरकारला जबाबदार धरण्याचा हा एक मार्ग आहे. मतदानामुळे लोकांना त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये आवाज मिळू शकतो. मतदान हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून आपल्या लोकशाहीच्या आरोग्यासाठीही महत्त्वाचा आहे. जेव्हा लोक मतदान करत नाहीत,तेव्हा ते प्रभावीपणे स्वतःला शांत करतात आणि जे मतदान करतात त्यांना सत्ता सोपवतात. यामुळे वाईट निर्णय घेतले जाऊ शकतात जे प्रत्येकावर परिणाम करत असतात.शेवटी,मतदान महत्त्वाचे आहे कारण ते आमच्या निवडून आलेल्या अधिकाऱ्यांना संदेश देते की आमच्या देशात काय घडते याची आम्हाला काळजी आहे आणि आम्ही आमच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या समस्यांकडे लक्ष देत आहोत.जेव्हा मोठ्या संख्येने लोक मतदान करत नाहीत,तेव्हा ते संदेश पाठवते की आम्ही आत्मसंतुष्ट आहोत आणि ते काहीही करू शकतात. सध्या सर्वत्र लोकसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरू असून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदार जनजागृतीचे काम विविध स्तरावर सुरू आहे.याचाच एक भाग म्हणून के.बी.रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीसाठी कोपरगाव शहरात प्रभात फेरी काढली. या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी "मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो !" अशा घोषणा देऊन जनजागृती केली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीचे संदेश फलक हातात घेऊन प्रभात फेरीत घोषणाही दिल्या आहेत.

सदर प्रसंगी प्रभात फेरी महाविद्यालयातुन सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज स्मारक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक,छत्रपती संभाजी महाराज स्मारक यामार्गे निघून कोपरगाव तहसील कार्यालय येथे समाप्त झाली आहे. सदर प्रसंगी तहसीलदार संदीपकुमार भोसले,गटशिक्षणाधिकारी श्रीमती शबाना शेख यांनी प्रभात फेरीत सहभागी होऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले आहे.मतदार जनजागृती प्रभात फेरीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस. यादव,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.बी.आर.सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या प्रभात फेरीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.




शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर